(ACER 1) H 4108

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५**

# महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४

(दिनांक २८ जून २०१३ पर्यंत सुधारित)

Maharashtra Act No. XXXV of 1994

# THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994

(*As modified upto the 28th June 2013*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याद्वारे प्रकाशित
२०१५

[ **किंमत :** रु. ]

# महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४

## (सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५)

## अनुक्रमणिका

**उद्देशिका** पृष्ठ क्रमांक

**कलमे.**

प्रकरण एक

**प्रारंभिक**


१. संक्षिप्त नाव, व प्रारंभ .. .. .. ..

२. व्याख्या .. .. .. .. ..


प्रकरण दोन

**विद्यापीठे**


३. विद्यापीठांचे विधिद्वारे संस्थापन .. .. .. ..

४. विद्यापीठाची उद्दिष्ट्ये .. .. .. .. ..

५. विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये .. .. .. ..

६. विद्यापीठाची अधिकारिता आणि त्याचे विशेषाधिकार बहाल करणे .. ..

७. स्त्री-पुरुष भेद, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान धर्म किंवा मतप्रणाली, इत्यादी विचारात न घेता विद्यापीठ सर्वांना खुले असणे. ..

८. राज्य शासनाचे व विद्यापीठांचे नियंत्रण .. .. .. ..


प्रकरण तीन

**विद्यापीठाचे अधिकारी**

**(क) कुलपती**


९. कुलपती आणि त्यांचे अधिकार .. .. .. ..


**(ख) विद्यापीठाचे इतर अधिकारी**


१०. विद्यापीठाचे इतर अधिकारी .. .. .. ..

११. कुलगुरु व प्रतिकुलगुरु .. .. .. ..

१२. कुलगुरुची नियुक्ती .. .. .. .. ..

१३. प्रतिकुलगुरुची नियुक्ती करण्याची रीत .. .. .. ..

१४. कुलगुरूचे अधिकार व कर्तव्ये .. .. .. ..

१५. विद्याशाखांचे अधिष्ठाता .. .. .. .. ..

१६. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ .. .. ..

पृष्ठ क्रमांक

१७. कुलसचिव .. .. .. .. ..

१८. परीक्षा नियंत्रक .. .. .. .. ..

१९. ग्रंथपाल .. .. .. .. ..

२०. वित्त व लेखा अधिकारी .. .. .. .. ..

२१. विद्यार्थी कल्याण संचालक .. .. .. ..

२२. संचालक. प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा .. .. ..

२३. विद्यापीठाचे अधिकारी, त्यांच्या प्राधिकरणांचे, संस्थांचे सदस्य आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे. ..

प्रकरण चार

**विद्यापीठाची प्राधिकरणे**

२४. विद्यापीठाची प्राधिकरणे .. .. .. .. ..

२४क. विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा शासनाचा अधिकार. ..

२५. अधिसभा .. .. .. .. ..

२६. अधिसभेची कार्ये व कर्तव्ये .. .. .. ..

२७. व्यवस्थापन परिषद .. .. .. .. ..

२८. व्यवस्थापन परिषदेचे अधिकार व कर्तव्ये .. .. ..

२९. विद्यापरिषद .. .. .. .. ..

३०. विद्यापरिषदेचे अधिकार व कर्तव्ये .. .. .. ..

३१. परीक्षा मंडळ .. .. .. .. ..

३२. परीक्षा मंडळाचे अधिकार व कर्तव्ये .. .. .. ..

३३. विद्याशाखा .. .. .. .. ..

३४. विद्याशाखेचे अधिकार व कर्तव्ये .. .. .. ..

३५. महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ .. .. ..

३६. महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे अधिकार व कर्तव्ये .. ..

३६क. विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळे .. .. .. ..

३७. अभ्यास मंडळ .. .. .. .. ..

३८. अभ्यास मंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये .. .. ..

३९. प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा मंडळ .. .. ..

४०. विद्यार्थी परिषद .. .. .. .. ..

४१. प्राधिकरणाचे अधिकार, कामे व कर्तव्ये .. .. .. ..

पृष्ठ क्रमांक

४२. प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी .. .. .. ..
४३. सदस्यत्वाची समाप्ती .. .. .. .. ..
४४. प्राधिकरणाचा सदस्य असण्याबद्दलच्या निरर्हता .. .. ..
४५. लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीकरता सदस्य असण्यास अपात्र असणे .. ..
४६. प्राधिकरणाच्या निर्णयाची निर्णायकता .. .. .. ..
४७. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाद्वारे निवडणूक घेणे .. .. ..
४८. सदस्यत्वाचा राजीनामा आणि प्रासंगिक रिक्त पद भरणे .. ..
४९. प्राधिकरणाची बैठक .. .. .. .. ..
५०. प्रासंगिक रिक्त पद व ते स्थायी समितीने भरणे .. .. ..

प्रकरण पाच

**परिनियम, आदेश आणि विनियम**

५१. परिनियम .. .. .. .. ..
५२. परिनियम कसे करावयाचे .. .. .. .. ..
५३. आदेश व त्यांचे विषय .. .. .. .. ..
५४. आदेश व ते तयार करणे .. .. .. .. ..
५५. विनियम व नियम .. .. .. .. ..

प्रकरण सहा

**महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद**

५६. महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद .. .. .. ..

प्रकरण सात

**अध्यापक आणि कर्मचारी**

५७. तक्रार निवारण समिती .. .. .. .. ..
५८. विद्यापाठ व महाविद्यालय न्यायाधिकरण .. .. .. ..
५९. अपील करण्याचे अधिकार .. .. .. ..
६०. न्यायाधिकरणाचे सर्वसाधारण अधिकार व कार्यपद्धती .. .. ..
६१. उचित अनुतोष व निदेश देण्याचे न्यायाधिकरणाचे अधिकार .. ..
६२. न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असणे .. .. ..
६३. न्यायाधिकरणाच्या निदेशांचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल व्यवस्थापनाला शास्ती. ..
६४. विधी व्यवसायींना हजर राहण्यापासून वगळणे .. .. ..

पृष्ठ क्रमांक

प्रकरण आठ

**प्रवेश, परीक्षा व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर बाबी**

६५. प्रवेश .. .. .. .. ..

६६. प्रवेश न्यायाधिकरण .. .. .. .. ..

६७. तरतुदींसाठी अर्ज करणे .. .. .. .. ..

६८. गाऱ्हाण्याची योग्य दाद मागण्यासाठी हक्क असणे .. .. ..

६९. न्यायाधिकरणाचे अधिकार .. .. .. ..

७०. उचित अनुतोष व निदेश देण्याचे न्यायाधिकरणाचे अधिकार .. ..

७१. परीक्षा .. .. .. .. ..

७२. निकाल जाहीर करणे .. .. .. .. ..

७३. अनुसूचीचे पालन न केल्यामुळे परीक्षा अवैध ठरणार नाही .. ..

७४. क्रीडा व अभ्यासेतर कार्यक्रम .. .. .. ..

प्रकरण नऊ

**समित्या**

७५. समित्या .. .. .. .. ..

७६. विद्यापीठ अध्यापकांची निवड व नेमणूक .. .. ..

७७. विद्यापीठांच्या अध्यापकांची तात्पुरती रिक्त पदे भरणे .. .. ..

७८. संचालित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची नियुक्ती व निवड .. ..

७९. विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी आणि संलग्न महाविद्यालयाच्या प्राचार्यांसाठी, अध्यापकांसाठी आणि इतर कर्मचाऱ्यांसाठी निवड समित्या. ..

८०. समित्या .. .. .. .. ..

प्रकरण दहा

**परवानगी, संलग्नीकरण व मान्यता**

८१. संलग्नीकरण आणि मान्यता यांकरिता शर्ती .. .. ..

८२. परवानगी संबंधीची कार्यपद्धती .. .. ..

८३. संलग्नीकरण करण्यासाठी कार्यपद्धती .. .. .. ..

८४. परिसंस्थांना मान्यता देण्याची कार्यपद्धती .. .. .. ..

८५. संलग्न महाविद्यालयांची स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समिती .. ..

८६. संलग्नीकरण किंवा मान्यता चालू ठेवणे .. .. ..

८७. संलग्नीकरण किंवा मान्यता यांच्या व्याप्तीमध्ये वाढ करणे .. ..

पृष्ठ क्रमांक

८८. स्थायी संलग्नीकरण व मान्यता . . . . . .

८९. स्वायत्त विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था. . .

९०. महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची तपासणी व अहवाल . . . .

९१. संलग्नीकरण किंवा मान्यता काढून घेणे . . . . . . . .

९२. महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे . . . . . .

प्रकरण अकरा

**नावनोंदणी, पदव्या व दीक्षांत समारंभ**

९३. पदव्युत्तर अध्यापन व संशोधन . . . . . . . .

९४. विद्यार्थ्यांची नाव नोंदणी . . . . . . . . . .

९५. शिस्तविषयक अधिकार आणि विद्यार्थ्यांमधील शिस्त . . . . . .

९६. पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी . . . .

९७. सन्मान्य पदवी . . . . . . . . . .

९८. दीक्षांत समारंभ . . . . . . . .

९९. नोंदणीकृत पदवीधर . . . . . . . . . .

१००. पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकणे . . . . . .

प्रकरण बारा

**विद्यापीठ निधी, लेखे व लेखापरीक्षा**

१०१. वार्षिक वित्तीय अंदाज . . . . . . . . . .

१०२. विद्यापीठ निधी . . . . . . . . . .

१०३. वार्षिक लेखे व लेखापरीक्षा . . . . . . . .

१०४. वार्षिक अहवाल . . . . . . . . . .

प्रकरण तेरा

**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाकरिता विशेष तरतुदी**

१०५. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाकरिता विशेष तरतुदी . .

प्रकरण चौदा

**संकीर्ण**

१०६. नुकसानीबद्दल प्राधिकरणे आणि अधिकारी जबाबदार असणे . . . .

१०७. राज्य विधानमंडळाचे आणि संसदेचे सदस्यत्व . . . . . .

१०८. अर्थउकली संबंधातील प्रश्न आणि विद्यापीठ प्राधिकरण किंवा मंडळ, इत्यादीच्या घटनेसंबंधातील विवाद . .

पृष्ठ क्रमांक

१०९. कृती व आदेश यांचे संरक्षण . . . . . . . .

११०. अधिकार सोपविणे . . . . . . . .

१११. कृती व कार्यवाही ही रचनेतील दोष, रिक्त पदे, कार्यपद्धतीतील नियमबाह्यता, इत्यादी या केवळ कारणावरूव विधिअग्राह्य नसणे. . .

प्रकरण पंधरा

**नवीन विद्यापीठे स्थापन करणे**

११२. नवीन विद्यापीठ घटित करताना बाबींसाठी तरतुदी करण्याकरिता आदेश काढणे. . .

प्रकरण सोळा

**संक्रमणात्मक तरतुदी**

११३. विद्यापीठाचे विद्यमान अधिकारी व कर्मचारी असणे चालू राहणे . . . .

११४. प्राधिकरण घटित करणे . . . . . . . . . .

११५. निरसन व व्यावृत्ती . . . . . . . . . .

११५क. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ क्षेत्रांमध्ये, अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र या पाठ्यक्रमात प्रथम वर्षाकरिता प्रवेश देण्यासाठी तात्पुरती तरतूद. . .

११६. अडचणी दूर करणे . . . . . . . . . .

**अनुसूची**

भाग-एक . . . . . . . . . .
व
भाग-दोन

# सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५[१]

[महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४]

(या अधिनियमास दिनांक २१ जुलै १९९४ रोजी राज्यपाल यांची संमती मिळाली आणि तो " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " भाग चार, दिनांक २१ जुलै १९९४ मध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आला)

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ (४–९-१९९६)[†]
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ (१४-६-१९९९)[†#]
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ (१२-५-२००१)[†##]
सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (१५-५-२००१)[†@]
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (१८-६-२००२)[†@@]
सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ (१-५-२००२)[+$]
सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (२४-३-२००३)[†]
सन २०१०[*] चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ (३१-८-२००९)[†]
सन २०११[**] चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ (१४-२-२०११)[†]
सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (१२-८-२०११)[†]

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन, यासाठी पहा **महाराष्ट्र शासन राजपत्र**, १९९२, भाग पाच, पृष्ठ ४४५-४४६(ई) पहा.

[†] ही खूण अधिनियमाचा प्रारंभीचा दिनांक दर्शविते.

[#] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ द्वारे सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३७ निरसित करण्यात आले.

[##] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ द्वारे सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १४ व २० निरसित करण्यात आले आहे.

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याचे कलम ६२ च्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :—

"**६२.** (१) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी जर, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या निवडणुका आधीच घेण्यात आल्या असतील तर, अशा प्राधिकरणाची किंवा मंडळाची रचना या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या तरतुदींनुरूप व्हावी, एवढ्या वाढीव संख्येतील सदस्यांना निवडून देण्यासाठी निवडणुका घेण्यात येतील ; आणि आधीच निवडून आलेल्या सदस्यांना यामुळे कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचणार नाही ; व्यावृत्ती.

परंतु, जेथे हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वीच, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या निवडणुका घेण्याचे काम पूर्ण झालेले असेल आणि अशा प्राधिकरणावर किंवा मंडळावर आधीच निवडून आलेल्या सदस्यांच्या निवडणुकांना बाधा न पोचवता, अशा प्राधिकरणाची किंवा मंडळाची रचना या अधिनियमांच्या तरतुदींनुरूप करण्यास कोणताही वाव नसेल तर, अशा प्रकरणांना या कलमातील कोणतीही तरतुद लागू होणार नाही.

(२) महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अधिनियम, २००० अंमलात आल्यानंतर, कुलगुरूने विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणावर किंवा मंडळावर केलेल्या नामनिर्देशनास या अधिनियमातील तरतुदीमुळे बाधा पोहोचणार नाही." (सन २००० चा महा. २४.)

[†@] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याद्वारे सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक एकोणीस व तेवीस निरसित करण्यात आला.

[†@@] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याद्वारे सन २००२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक आठ निरसित करण्यात आला.

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २ चे पोट-कलम (२) पुढीलप्रमाणे वाचावीत :—

"(२) महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा अधिनियम, २००२ अंमलात आल्याच्या दिनांकाला, शासन अधिसूचना, क्रमांक यूएनजी. १५९४/(१८२/९४)-विशि-३, दिनांक १६ एप्रिल १९९९, याअन्वये, मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ च्या पोट-कलम (१) द्वारे घटित करण्यात आलेली महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद विसर्जित होईल आणि तिच्या पदाधिकाऱ्यांनी उक्त दिनांकाला आपली पदे रिक्त केल्याचे मानण्यात येईल." (सन २००० चा महा. २७.)

[$] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याद्वारे सन २००२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक तेरा निरसित करण्यात आला.

**महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांशी संबंधित कायद्याचे एकीकरण, एकत्रीकरण व त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांची रचना व त्यांचे प्रशासन यांच्या एकीकरणासाठी तरतूद करणे व त्या प्रयोजनार्थ, अधिक चांगल्या तरतुदी करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अशा विद्यापीठांचे अधिक चांगल्या प्रकारे प्रशासन करण्यासाठी आणि उच्च शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी त्यासंबंधातील उपाययोजनांवर विचार करण्याच्या व उपाययोजनांची शिफारस करण्याच्या हेतूने, केंद्र सरकारने व महाराष्ट्र शासनाने निरनिराळ्या समित्यांची व अभ्यासगटांची नियुक्ती केली होती ;

**आणि ज्याअर्थी,** या समित्या व गट यांच्या शिफारशी आणि विद्यमान विद्यापीठ अधिनियमांची अंमलबजावणी करताना आलेला अनुभव विचारात घेतल्यानंतर, प्रत्येक विद्यापीठाला, त्याच्या उद्दिष्टांची जबाबदारीने व परिणामकारकरित्या पूर्तता करणे, उच्च शिक्षणासंबंधातील सुविधांचे अधिक समान वितरण करणे, अधिक कार्यक्षम प्रशासन, वित्तीय नियंत्रण, अध्यापन व संशोधन यांची अधिक चांगली पुनर्रचना यांसाठी तरतूद करणे, अध्यापक व इतर कर्मचारी यांची योग्यरित्या निवड व नियुक्ती करण्याबाबत खात्री करून घेणे, विद्यापीठाच्या विविध मंडळावर विद्यार्थी व अध्यापक यांच्या प्रतिनिधीत्वासाठी तरतूद करणे, विद्यापीठांमध्ये शिस्त राखण्याच्या आणि शैक्षणिक दर्जा किंवा अत्युच्च शैक्षणिक गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने हानिकारक ठरणाऱ्या अनुचित व शिक्षण क्षेत्राबाहेरील प्रवृत्तींना पायबंद घालण्यासाठी किंवा त्यांचे उच्चाटन करण्यासाठी उपाययोजना किंवा त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे शक्य. व्हावे यांसाठी, तरतुदी करण्याची आवश्यकता आहे असे वाटते ; यासाठी राज्यातील अशा विद्यापीठांशी संबंधित कायद्याचे एकीकरण, एकत्रीकरण व त्यात सुधारणा करणे इष्ट ठरेल असे वाटते ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचेचाळीसावा वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त व प्रारंभ. **१.** (१) या अधिनिय.मास, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा * दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " विद्याविषयक सेवा युनिट " याचा अर्थ, विद्यापीठ विज्ञान व उपकरण साधन केंद्र, विद्याविषयक अधिकारी महाविद्यालय, संगणक केंद्र, विद्यापीठ मुद्रणालय, किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही उद्दिष्टाच्या प्रचालनासाठी विशेषकृत सेवा पुरविणारे इतर कोणतेही युनिट, असा आहे ;

(२) " संलग्न प्राध्यापक", " संलग्न प्रपाठक " किंवा " संलग्न अधिव्याख्याता " याचा अर्थ विद्यापीठाबरोबरच्या सहयोगाच्या किंवा साहचर्याच्या कालावधीत तशी पदनिर्देशित करण्यात आलेली, उद्योग, व्यापार, कृषि, वाणिज्य किंवा इतर कोणत्याही संलग्न क्षेत्रातील व्यक्ती, असा आहे ;

(३) " संलग्न महाविद्यालय " याचा अर्थ, विद्यापीठाकडून संलग्नीकरणास मंजूरी देण्यात आलेले महाविद्यालय, असा आहे ;

---

* दिनांक २२ जुलै १९९४ ची शासकीय अधिसूचना पहा ; उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक यूएसजी १४९२/१०४२०१/(१३१/९२) यूएनआय-३, दिनांक २२ जुलै १९९४.

(४) " प्राधिकरणे " याचा अर्थ, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेली विद्यापीठाची प्राधिकरणे, असा आहे ;

(५) " स्वायत्तता " याचा अर्थ, विद्याविषयक कार्यक्रम आणि परीक्षा पार पाडणे, त्या त्या विषयांसाठी पाठ्यक्रम तयार करणे आणि परीक्षा उत्तीर्ण झाल्याची प्रमाणपत्रे देणे, इत्यादींसाठी महाविद्यालय, परिसंस्था किंवा विद्यापीठ विभाग यांना परवानगी देण्याचा, परिनियमांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या विशेषाधिकार, असा आहे. स्वायत्तता देण्यात आलेले महाविद्यालय, परिसंस्था किंवा विद्यापीठ विभाग यांना अधिनियम व परिनियम यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, संपूर्ण विद्याविषयक, प्रशासकीय व वित्तीय स्वायत्तता असेल ;

(६) " स्वायत्त महाविद्यालय ", " स्वायत्त परिसंस्था " किंवा " स्वायत्त विभाग " याचा अर्थ, परिनियमांअन्वये स्वायत्तता देण्यात आलेले आणि तसे संबोधण्यात आलेले महाविद्यालय, परिसंस्था किंवा विभाग, असा आहे. ;

(७) " मंडळे " याचा अर्थ, त्या त्या प्राधिकरणांनी स्थापन केलेली विद्यापीठाची मंडळे, असा आहे ;

(८) " कुलपती ", " कुलगुरू " आणि " प्रतिकुलगुरू " याचा अर्थ, अनुक्रमे, विद्यापीठाचा कुलपती, कुलगुरू व प्रतिकुलगुरू, असा आहे ;

(९) " सहयोग " याचा अर्थ, विद्यापीठाचा, इतर विद्यापीठे, विद्याविषयक परिसंस्था (स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय), संशोधन परिसंस्था व संघटना (संशोधन, कृषि, उद्योग, व्यापार व वाणिज्य) यांच्याबरोबर असलेला विद्याविषयक सहयोगी कार्यक्रम, असा आहे ;

(१०) " महाविद्यालय " याचा अर्थ, विद्यापीठ क्षेत्रात असलेले, विद्यापीठ-संचालित महाविद्यालय, किंवा विद्यापीठाला संलग्न करून घेतलेले महाविद्यालय, असा आहे ;

(११) " संचालित महाविद्यालय " याचा अर्थ, विद्यापीठाकडून चालवण्यात येणारे व व्यवस्था पाहण्यात येणारे महाविद्यालय, असा आहे ;

[१][(११क) " विमुक्त जाती" याचा अर्थ, राज्य शासनाने वेळोवेळी विमुक्त जाती म्हणून घोषित केलेल्या जमाती, असा आहे ;]

(१२) " विभाग " याचा अर्थ, परिनियमामध्ये विहित करण्यात आल्यानुसार महाविद्यालयामध्ये एखादा विशिष्ट विषय किंवा विषय गट शिकवणारा विभाग, असा आहे ;

(१३) " संचालक " याचा अर्थ, व्यवस्थापन परिषदेकडून तसे पदनिर्देशित करण्यात आलेला, विद्यापीठाचे केंद्र किंवा शाळा यासह त्या विद्यापीठाच्या परिसंस्थेचा प्रमुख, असा आहे ;

(१४) " उच्च शिक्षण संचालक ", " संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन ", " संचालक शारीरिक शिक्षण " आणि " संचालक, तंत्र शिक्षण " याचा अर्थ, अनुक्रमे, उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य आणि संचालक, शारीरिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(१५) " उच्च शिक्षण " याचा अर्थ, शालेय शिक्षणाच्या टप्प्यावरील शिक्षणानंतरचा ज्ञानाचा व्यासंग, असा आहे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २(अ) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

(१६) " वसतिगृह " याचा अर्थ, विद्यापीठाकडून तरतूद करण्यात आलेले, चालवण्यात येणारे किंवा त्याने मान्यता दिलेले, विद्यापीठाच्या किंवा [१][महाविद्यालयाच्या] विद्यार्थ्यांसाठी असलेले निवासस्थान, असा आहे ;

(१७) " परिसंस्था " याचा अर्थ, विद्यापीठाशी सहयोगी असलेली आणि विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात आलेली, महाविद्यालय नसणारी उच्च शिक्षणाची विद्याविषयक परिसंस्था, असा आहे ;

(१८) " स्थानिक व्यवस्थापन समिती " याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार महाविद्यालयासाठी स्थापन केलेली समिती, असा आहे ;

(१९) " महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ५६ अन्वये स्थापन केलेली परिषद, असा आहे ;

(२०) " व्यवस्थापन " याचा अर्थ, ज्यांच्या व्यवस्थापनाखाली एका किंवा अधिक महाविद्यालयाचे किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थाचे किंवा इतर परिसंस्थांचे संचालन करण्यात येते आणि त्यांना विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात येतात असे, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही विस्वस्त निधीचे (किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही संस्थेचे) विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा नियमाक मंडळ, मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, असा आहे :

१९५० चा मुंबई २९.
१८६० चा २१.

परंतु असे की, केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा जिल्हा परिषद, नगरपरिषद किंवा महानगरपालिका यांसारखे स्थानिक प्राधिकरण यांनी स्थापन केलेल्या किंवा त्यांच्याकडून चालवण्यात येणाऱ्या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या बाबतीत, ते व्यवस्थापन म्हणजे, अनुक्रमे, यथास्थिति, केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा जिल्हा परिषद किंवा नगरपरिषद किंवा महानगरपालिका ;

[२][(२०क) " भटक्या जमाती " याचा अर्थ, चरितार्थाच्या शोधात ठिकठिकाणी भटकणाऱ्या जमाती म्हणून राज्य शासनाने, वेळोवेळी घोषित केलेल्या जमाती, असा आहे ;]

(२१) " लांब सुटी नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्ग " याचा अर्थ, शासन लांब सुटी नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्ग म्हणून वर्गीकरण करील असा कर्मचारीवर्ग, असा आहे आणि त्यामध्ये विद्याविषयक कर्मचाऱ्यांना पूरक अशा सर्व कर्मचारीवर्गाचा समावेश होईल, परंतु केवळ प्रशासकीय कामे करणाऱ्या कर्मचारीवर्गाचा त्यात समावेश होणार नाही ;

(२२) " इतर मागासवर्ग " याचा अर्थ, राज्य शासनाने इतर मागासवर्ग म्हणून स्वीकृत केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गातील गट, असा आहे आणि त्यामध्ये अशा वर्गामधील किंवा अशा वर्गांतील गटांमधील व्यक्तींचा समावेश होतो ;

(२३) " पदव्युत्तर विभाग " याचा अर्थ, विद्यापीठांकडून तसा असल्याबाबत मान्यता देण्यात आलेला व पदव्युत्तर शिक्षण देणारा किंवा संशोधनाबाबत मार्गदर्शन करणारा, महाविद्यालयातील किंवा उच्च शिक्षण, संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास यांच्या परिसंस्थेतील विभाग, असा आहे ;

(२४) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे करण्यात आलेले यथास्थिति, परिनियम किंवा आदेश किंवा विनियम यांअन्वये विहित करण्यात आलेले, असा आहे ;

(२५) " प्राचार्य " याचा अर्थ, महाविद्यालयाचा, विशेषीकृत शैक्षणिक परिसंस्थेचा पदव्युत्तर केंद्राचा किंवा विद्यापीठाने रीतसर मान्यता दिलेल्या अन्य मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख, असा आहे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २(ब) अन्वये " संलग्न महाविद्यालयाच्या " या मजकुराऐवजी " महाविद्यालयाच्या " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २(क) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(२६) " मान्यताप्राप्त परिसंस्था " याचा अर्थ, उच्च शिक्षणासाठी, संशोधनासाठी किंवा विशेषीकृत अभ्यासासाठी असलेली अशी परिसंस्था म्हणून विद्यापीठाने मान्यता दिलेली, [१][महाविद्यालयांव्यतिरिक्त] अन्य परिसंस्था, असा आहे ;

(२७) " नोंदणीकृत पदवीधर " याचा अर्थ, अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये एका विद्यापीठात नोंदणी केलेला किंवा नोंदणी केल्याचे मानण्यात आलेला विद्यापीठाचा पदवीधर, असा आहे ;

(२८) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमाची अनुसूची, असा आहे ;

(२९) " अनुसूचित जाती " याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येणाऱ्या जाती, वंश किंवा जमाती अथवा अशा जाती, वंश किंवा जमाती यांचे भाग किंवा त्यांच्यातील गट, असा आहे ;

(३०) " अनुसूचित जनजाती " याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जनजाती म्हणून समजण्यात येणाऱ्या अशा, महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या जनजाती अथवा जनजाती समूह किंवा अशा जनजाती किंवा जनजाती समूह यांचे भाग किंवा त्यांच्यातील गट [२][* * *], असा आहे ;

(३१) " प्रशाळा " याचा अर्थ, विद्यापीठांकडून चालविण्यात येणारी किंवा अभ्यासक्रम प्रशाळा म्हणून मान्यता देण्यात आलेली अभ्यासक्रम प्रशाळा, असा आहे ;

[३][(३१क) " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;]

(३२) " परिनियम ", " आदेश " व " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे तयार केलेले विद्यापीठाचे अनुक्रमे परिनियम, आदेश व विनियम, असा आहे ;

(३३) " विद्यार्थी परिषद " याचा अर्थ, या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेली विद्यार्थी परिषद, असा आहे ;

(३४) " अध्यापक " याचा अर्थ, विद्यापीठांच्या कोणत्याही विभागातील संचालित, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयातील, स्वायत्त परिसंस्थेतील किंवा विभागातील किंवा विद्यापीठातील मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल [४][प्राचतार्य, उप किंवा सहायक ग्रंथपाल व विद्यापीठातील दस्तऐवज अधिकारी व महाविद्यालयाचा ग्रंथपाल] शारीरिक शिक्षण संचालक किंवा निर्देशक, असा आहे ;

(३५) " न्यायाधिकरण " याचा अर्थ, या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले न्यायाधिकरण, असा आहे ;

(३६) " विद्यापीठ " याचा अर्थ, अनुसूचित उल्लेख करण्यात आलेल्या विद्यापीठांपैकी कोणतेही विद्यापीठ, असा आहे ;

(३७) " विद्यापीठ क्षेत्र " याचा अर्थ, अनुसूचित त्या विद्यापीठाच्या नावापुढे विनिर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र, असा आहे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २(डी) अन्वये " संलग्न महाविद्यालयांव्यतिरिक्त " या मजकुराऐवजी " महाविद्यालयांव्यतिरिक्त " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २(इ) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(फ) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २(ग) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३८) “ विद्यापीठ विभाग ” याचा अर्थ, विद्यापीठाने स्थापन केलेला व विद्यापीठाकडून चालवण्यात येणारा विभाग, असा आहे ;

(३९) “ विद्यापीठ अनुदान आयोग ” याचा अर्थ, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन करण्यात आलेला विद्यापीठ अनुदान आयोग, असा आहे ;

(४०) “ विद्यापीठ परिसंस्था ” याचा अर्थ, विद्यापीठाने स्थापन केलेले व विद्यापीठाकडून चालवण्यात येणारे केंद्र, प्रशाळा किंवा परिसंस्था, असा आहे ;

(४१) “ विद्यापीठ अध्यापक ” याचा अर्थ, विद्यापीठाने नियुक्त केलेला अध्यापक, असा आहे ;

## प्रकरण दोन

## विद्यापीठे

विद्यापीठांचे विधाद्वारे संस्थापन.

**३.** (१) अनुसूचीच्या भाग एक, स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक विद्यमान विद्यापीठाच्या जागी, याद्वारे, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, या अधिनियमान्वये, उक्त भागाच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नावाने एक तत्सम विद्यापीठ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकाला, उक्त भागाच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ज्या क्षेत्रासाठी ते घटित करण्यात आले होते त्याच क्षेत्रासाठी याद्वारे घटित करण्यात येत आहे.

(२) राज्य शासनाला, वेळोवेळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने, अशा क्षेत्रासाठी व अशा दिनांकापासून कोणतेही नवीन विद्यापीठ घटित करता येईल व अनुसूचीच्या भाग दोन मध्ये आवश्यक त्या नोंदी समाविष्ट करता येतील ; व त्या प्रयोजनासाठी किंवा त्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अन्य कोणत्याही प्रयोजनांसाठी, उक्त अधिसूचनेद्वारे, अनुसूचीत योग्य ती सुधारणा करून, कोणत्याही विद्यमान किंवा नवीन विद्यापीठाचे क्षेत्र कमी करता येईल, वाढवता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल, व त्यानंतर, अनुसूचीच्या, यथास्थिति, भाग एकच्या स्तंभ (३) मधील किंवा भाग दोनच्या स्तंभ (२) मधील नोंदीमध्ये तद्नुसार सुधारणा होईल ; व विद्यमान विद्यापीठाशी संलग्न असलेल्या किंवा त्याने मान्यता दिलेल्या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या किंवा त्याने मान्यता दिलेल्या नवीन विद्यापीठाच्या क्षेत्रातील सर्व शिक्षण परिसंस्था,—मग त्या महाविद्यालये किंवा परिसंस्था असोत व त्यांना कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो,—उपरोक्त दिनांकापासून नवीन विद्यापीठांशी संलग्न होतील किंवा त्यांना नवीन विद्यापीठाची मान्यत मिळेल :

परंतु, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी ठराव संमत केल्याखेरीज, अशी कोणतीही अधिसूचना काढली जाणार नाही.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिस्थितीच्या गरजेनुसार, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या ज्या शिक्षण परिसंस्था, विद्यमान विद्यापीठाचे जे विवक्षित विशेषाधिकार मिळण्यास पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी हक्कदार होत्या, त्यांना पूर्वोक्त दिनांकानंतर, एकंदर पाच वर्षाहून अधिक होणार नाही एवढ्या विवक्षित मुदतीकरिता ते विशेषाधिकार मिळण्याचे चालू राहणे इष्ट आहे. अशा नवीन विद्यापीठास योग्य वाटत असेल त्याबाबतीत, त्या नवीन विद्यापीठास, तद्नुरूप आपल्या शिफारशी राज्य शासनाकडे पाठवता येतील व अशा शिफारशी मिळाल्यावर, असे विशेषाधिकार चालू राहावेत याबाबत राज्य शासनाची खात्री

पटल्यास, त्यास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल एवढ्या मुदतीकरिता ते विशेषाधिकार चालू राहावेत अशी तरतूद करता येईल.

(४) प्रत्येक विद्यापीठातील त्या त्या वेळी कुलपती, कुलगुरू, प्रति-कुलगुरू कोणत्याही असल्यास, अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद यांचे पद धारण करणारे सदस्य यांचा, याद्वारे, अनुसूची मध्ये त्याबाबत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नावाचा एक निगमनिकाय घटित करण्यात येत आहेत व घोषित करण्यात येत आहे की, त्या निगमनिकायांची एक अखंड परंपरा व सामाईक शिक्का असेल व त्यास आणि त्याच्याविरुद्ध त्या नावाने दावा लावता येईल.

(५) प्रत्येक विद्यापीठ, जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्यास व धारण करण्यास, विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी, त्याच्याकडे निहित असेल अशी, किंवा त्याच्याकडून संपादन करण्यात येईल अशी, कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता पट्ट्याने देण्यास, विकण्यास किंवा अन्य प्रकारे तिचे हस्तांतरण करण्यास किंवा तिची विल्हेवाट लावण्यास आणि करार करण्यास व या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा इतर सर्व गोष्टी करण्यास, सक्षम असेल :

परंतु, अशी मालमत्ता विद्यापीठाने नियुक्त केलेल्या मान्यताप्राप्त मूल्यनिर्धारकाकडून तिचे मूल्यनिर्धारण करून घेतल्याखेरीज व राज्य शासनाच्या पूर्वसंमतीखेरीज भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही, तिची विक्री करण्यात येणार नाही किंवा तिचे हस्तांतरण करण्यात येणार नाही.

विद्यापीठाची उद्दिष्टये.

**४.** अध्यापन, संशोधन, विस्तार व सेवा यांद्वारे व परिणामकारक प्रात्यक्षिकाद्वारे आणि विद्यापीठ या नात्याने समाज जीवनावर प्रभाव पाडून, त्याद्वारे ज्ञान व सामंजस्य यांचा प्रसार, निर्मिती व जपणूक करणे, ही विद्यापीठाची सर्वसाधारण उद्दिष्टे असतील व ही उद्दिष्टे, विशेषेकरून पुढीलप्रमाणे असतील :—

(१) ज्ञानाची निर्मिती, जपणूक व प्रसार करण्याची आपली जबाबदारी पार पाडणे ;

(२) शिस्त आणि बौद्धिक जिज्ञासा जोपासणे आणि सर्वोच्च गुणवत्ता साध्य करण्याच्या अविरत कार्यास एक निर्भय शैक्षणिक संस्था म्हणून वाहून घेणे ;

(३) सहिष्णुता व परस्पर सामंजस्याच्या वातावरणात एकविधता व बहुविधता यांस प्रोत्साहन देणे ;

(४) भारताच्या संविधानात नमूद केलेले स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता, समता व सामाजिक न्याय यांचे संवर्धन करणे व सर्वोत्तम मूलतत्त्वे व मूल्ये यांची राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने जोपासना करून, सामाजिक-आर्थिक परिवर्तनामध्ये प्रेरक शक्ती म्हणून कार्य करणे ;

(५) विद्यापीठाने स्थानिक व प्रादेशिक विकासाच्या समस्यांमध्ये जवळून सहभागी होणे, ज्ञान व कौशल्य यांचा लाभ व्यक्ती विकासासाठी व समाज विकासासाठी उपलब्ध करून देणे ;

(६) एक सजग व वस्तुनिष्ठ समीक्षक म्हणून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडणे, जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये योग्य नेतृत्व तयार करणे व योग्य दृष्टीकोन, आवडी व गुण विकसित करण्याच्या कामी नवीन पिढीला सहाय्य करणे ;

(७) सर्वांना उच्च शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे ;

(८) कार्यक्षम व संवेदनशील प्रशासन, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन यांची तरतूद करणे, अध्यापन [१][संशोधन व विस्तार] संघटनांचा विकास करणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(९) वेगाने विकास व परिवर्तन होत असलेल्या समाजात ज्ञान संपादनास चालना देणे, बुद्धिजीवी समाजाला योग्य अशी, आधुनिक प्रसार माध्यमे व तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने शिक्षणाचे जाळे निर्माण करून मानवी कर्तृत्वाच्या सर्व क्षेत्रांमधील नवनवीन कल्पना, संशोधन व शोध यांच्या संदर्भात ज्ञान, प्रशिक्षण व कौशल्य यांचा दर्जा वाढविण्याच्या संधी सातत्याने उपलब्ध करून देणे ;

(१०) राष्ट्रीय एकात्मता वाढविणे व सांस्कृतिक वारसा जतन करणे ;

(११) पाठ्यक्रमांमध्ये उपयोजित घटकांचा समावेश करून त्याद्वारे काम करण्याची प्रवृत्ती वाढविणे व श्रमांना प्रतिष्ठा मिळवून देणे ;

(१२) खर्चाची फलनिष्पत्ती होईल अशा रीतीने विद्याविषयक व संबद्ध कार्यक्रम व साधन संपत्ती निर्माण करणारी कामे हाती घेऊन आर्थिक स्वावलंबन साध्य करणे ;

(१३) सर्वसाधारणपणे विद्यापीठाचे प्रशासन व उच्च शिक्षणासाठी ते पुरवित असलेल्या सुविधा, यांत सुधारणा करण्यासाठी निरनिराळी विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यात अधिक चांगल्या प्रकारे अन्योन्यक्रिया व समन्वय साधने ;

(१४) समाजाच्या दुर्बल घटकांतील व्यक्तींमध्ये आत्मसन्मान व प्रतिष्ठेची जाणीव निर्माण करणे व ती वाढीस लावणे ;

(१५) सर्व विद्याविषयक व विद्यार्थ्यांशी संबंधित असलेल्या इतर बाबींच्या संबंधात एकमेव मार्गदर्शक निकष म्हणून स्पर्धात्मक गुणवत्ता व श्रेष्ठत्व वाढीस लावण्याचे प्रयत्न करणे ;

विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये.

**५.** विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(१) विद्यापीठ, वेळोवेळी निश्चित करील अशा अध्ययन शाखांमध्ये आणि अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण, [१][विस्तार] अध्यापन आणि प्रशिक्षण यांची तरतूद करणे ;

(२) संशोधनासाठी आणि ज्ञानवर्धनासाठी व ज्ञानप्रसारासाठी तरतूद करणे आणि सर्वसाधारणतः कला, (ललित कला धरून) वाणिज्यशास्त्र, विज्ञान, औषधशास्त्र, अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, कायदा, शारीरिक शिक्षण आणि अध्ययनाच्या इतर शाखा व संस्कृतित व त्यांच्या आंतरज्ञानशाखांची क्षेत्रे यांचे संवर्धन करणे व त्यांना चालना देणे ;

(३) संचालित आणि संलग्न महाविद्यालयांना व मान्यताप्राप्त परिसंस्थांना विशेषीकृत अभ्यासक्रम सुरू करणे शक्य व्हावे यासाठी तरतूद करणे ;

(४) विद्यापीठ विभाग, प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये आणि अध्यापन [२][संशोधन किंवा विस्तार यासाठी] आवश्यक असलेली साधनसामग्री यांचे आयोजन, परिरक्षण व व्यवस्थापन करणे ;

(५) संशोधन विशेषीकृत अभ्यासक्रम किंवा विद्याविषयक सेवा, युनिट यांचे विभाग व परिसंस्था यांची स्थापना करणे, त्या चालवणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(६) महाविद्यालये, परिसंस्था, वसतिगृहे, आरोग्य केंद्रे, श्रोतृगृहे आणि व्यायामशाळा यांची स्थापना करणे, त्या चालवणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(७) विद्यापीठ क्षेत्रात आंतर विद्यापीठ केंद्रे, संशोधन प्रयोगशाळा, आधुनिक उपकरण साधना केंद्रे यांसारख्या आणि विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा विद्यापीठांचा गट किंवा महाविद्यालयांचा गट यांच्याद्वारे उपयोगात आणली जातील अशी विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांनी स्थापन केलेली अध्ययन केंद्रे यांसारख्या स्वायत्त संस्था स्थापन करण्यासाठी तरतूद करणे :

परंतु असे की, स्वतःसाठी विद्यापीठाच्या अशा सुविधेचा लाभ घेणारा कोणताही उद्योग किंवा कोणत्याही अशासकीय संघटना यांच्याबाबतीत किंवा अशा संघटना विद्यापीठाला सुविधा उपलब्ध करून देत असतील त्याबाबतीत, संबंधित विद्यापीठ राज्य शासनाची पूर्वसंमती घेईल ;

(८) [१][* * *] महाविद्यालयांच्या गटाला सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने, विद्यापीठ उप क्षेत्रे स्थापन करण्यासाठी तरतूद करणे आणि या उपक्षेत्रांमध्ये ग्रंथालये, प्रयोगशाळा, संगणक केंद्रे यांसारखी सामाईक साधन केंद्रे आणि त्यासारखी अध्ययन केंद्रे स्थापन करण्याची तरतूद करणे व ती चालविणे ;

(९) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने विद्यापीठासाठी आवश्यक असणारी संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते यांची पदे आणि अन्य अध्यापनविषयक किंवा लांब सुट्टी नसलेली विद्याविषयक पदे निर्माण करणे आणि त्यांच्या अर्हता विहित करणे आणि त्या पदांवर नियुक्ती करणे ;

(१०) अन्य कोणत्याही विद्यापीठात किंवा संघटनेत काम करणाऱ्या व्यक्तींना विनिर्दिष्ट कालावधीसाठी विद्यापीठाचे संलग्न प्राध्यापक, संलग्न प्रपाठक, संलग्न अधिव्याख्याते, अभ्यागत प्राध्यापक म्हणून नियुक्त करणे किंवा मान्यता देणे ;

(११) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने, अध्यापकेतर कुशल, प्रशासनिक, लिपिकवर्गीय आणि इतर पदे निर्माण करणे व त्यांच्या अर्हता आणि वेतनमान विहित करणे आणि त्या पदावर नियुक्ती करणे ;

(१२) संबंधित शिक्षकांच्या संमतीने, त्या शिक्षकांना विद्यापीठात इतरत्र व राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये पाठवणे सुकर करणे ;

(१३) विनिर्दिष्ट पदव्या, पदविका किंवा प्रमाणपत्रे यांसाठी असलेल्या वेगवेगळ्या परीक्षांचे शिक्षणक्रम व अभ्यासक्रम विहित करणे ;

(१४) व्यवहार्य असेल तेथे, विद्यापीठ विभागांमध्ये, [२][* * *] महाविद्यालयांमध्ये, परिसंस्थांमध्ये, मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये आणि प्रशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन, राज्य व राष्ट्रीय योजना, विकासविषयक योजनांचे मूल्यमापन यांसह विविध विकासविषयक कार्याची पाहणी व त्यांच्याशी संबंधित असलेली आकडेवारी, आधारसामग्री व इतर तपशील यांचे संकलन यासाठी तरतूद करणे ;

(१५) विद्यापीठ विभाग, संचालित आणि संलग्न महाविद्यालये, परिसंस्था, प्रशाळा आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील वेगवेगळ्या अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रवेशाच्या संबंधात देखरेख, नियंत्रण व विनियमन करणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(ड) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

(१६) विद्यापीठाच्या अध्यापकांच्या संकोषामधून अध्यापकांची प्रतिनियुक्ती करून महाविद्यालयांतील अध्यापनाचे मार्गदर्शन करणे आणि [१][* * *] महाविद्यालयांचा दर्जा सुधारण्यासाठी त्यातील अध्यापनाची अनुपूर्ती करणे ;

(१७) परीक्षा किंवा इतर कोणतीही चाचणी यांच्या आधारे किंवा अन्य रीतीने पदव्या, पदव्युत्तर पदविका, उच्च माध्यमिक शिक्षणोत्तर पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करणे ;

(१८) ज्या व्यक्तींनी,—

(क) विहित पद्धतीने त्यांना परीक्षांमधून सूट मिळालेली नसेल तर, विद्यापीठातील किंवा [२][महाविद्यालयातील] किंवा परिसंस्थेतील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील किंवा प्रशाळेतील मान्यताप्राप्त पाठ्यक्रम पूर्ण केलेला असेल आणि ज्या व्यक्ती विद्यापीठाने विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या असतील ; किंवा

(ख) विद्यापीठातील किंवा [३][महाविद्यालयातील] किंवा परिसंस्थेतील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील किंवा प्रशाळेतील मान्यताप्राप्त पाठ्यक्रम पूर्ण केलेला असेल आणि ज्या व्यक्ती विद्यापीठाने विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या असतील ; किंवा

(ग) आदेश आणि विनियम यांद्वारे तरतूद करण्यात आलेल्या शर्तीनुसार संशोधन केलेले असेल ;

अशा व्यक्तींच्या परीक्षा घेणे आणि त्यांना पदव्या, पदव्युत्तर पदविका आणि उच्च माध्यमिक शिक्षणोत्तर पदविका आणि प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे ;

(१९) बहिःशाल विद्यार्थी आणि पत्रव्यवहार व दूरता पद्धतीद्वारे शिक्षण घेणारे विद्यार्थी, तसेच मुक्त विद्यापीठाचे व निरंतर शिक्षणविषयक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी यांना पदव्या, पदविका आणि प्रमाणपत्रे देणे व त्यांना व्याख्याने, शिक्षण व प्रशिक्षण देण्याची तरतूद करणे ;

(२०) परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे सन्मान्य पदव्या किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे ;

(२१) व्यवस्थापनाची विश्वसनीयता आणि महाविद्यालये, विद्याशाखा व विषय यांच्या संबंधातील विद्याविषयक कामगिरीची वेळोवेळी ठरवून देण्यात येतील अशी मानके लक्षात घेऊन, महाविद्यालयांच्या संलग्नीकरणाच्या आणि परिसंस्थांना मान्यता देण्याच्या शर्ती ठरवून देणे आणि या शर्तीचे पालन केले जात असल्याबद्दल नियतकालिक मूल्यमापन करून किंवा अन्य प्रकारे स्वतःची खात्री करून घेणे ;

(२२) विद्यापीठाकडून चालविण्यात येत नसतील अशा संलग्न महाविद्यालयांना आणि परिसंस्थांना विद्यापीठाचे विशेषाधिकार प्रदान करणे आणि हे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही विशेषाधिकार काढून घेणे आणि विद्यापीठाकडून चालवल्या न जाणाऱ्या वसतिगृहांना मान्यता देणे आणि अशी मान्यता तात्पुरती किंवा कायमची काढून घेणे ;

(२३) विद्यापीठ अनुदान आयोगाने कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली असल्यास त्या तत्त्वांनुसार विद्यापीठ विभाग संचालित महाविद्यालय, संलग्न महाविद्यालय, परिसंस्था किंवा प्रशाळा यांना, यथास्थिति, स्वायत्त विद्यापीठ विभाग, संचालित महाविद्यालय, संलग्न महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा प्रशाळा म्हणून संबोधणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४ (ई) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(फ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४(ग)(आय) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२४) संलग्नीकरणासाठी आणि नियतकालिका अधिस्वीकृतीसाठी संलग्न महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या विद्याविषयक कामगिरीचे संनियंत्रण व मूल्यमापन करणे ;

(२५) आवश्यक असेल तेथे, निरीक्षणाच्या प्रयोजनार्थ स्थापन करण्यात आलेल्या समुचित यंत्रणेमार्फत [१][* * *] महाविद्यालयांची आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांची तपासणी करणे आणि त्यांच्यामध्ये शिक्षण, अध्यापन आणि प्रशिक्षण यांचा उचित दर्जा राखण्यात येत आहे आणि त्यांमध्ये ग्रंथालये, प्रयोगशाळा, [२][वसतिगृह] कार्यशाळा आणि अन्य विद्याविषयक सोयींची पर्याप्त तरतूद करण्यात आली आहे याची खात्री करून घेण्यासाठी उपाय योजणे ;

(२६) विश्वस्त निधी आणि दाननिधी धारण करणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे आणि विद्यापीठाचे आणि महाविद्यालयांचे अध्यापक आणि विद्यार्थी यांच्यासाठी अधिछात्रवृत्त्या, प्रवास, अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या, पदके आणि पारितोषिके सुरू करणे व ती देणे ;

(२७) [३][आदेशांद्वारे] वेळोवेळी विनियमित करण्यात येईल अशी फी व इतर आकार निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ती प्राप्त करणे किंवा वसूल करणे ;

(२८) विद्यापीठ, [४][* * *] महाविद्यालये, परिसंस्था, मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रशाळा आणि वसतिगृहे या मधील विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख ठेवणे, नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे विनियमन करणे ;

(२९) विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षणाकडून अनौपचारिक शिक्षणाकडे जाता यावे यासाठी आणि अनौपचारिक शिक्षणाकडून औपचारिक शिक्षणाकडे जाता यावे यासाठी तरतूद करणे ;

(३०) विद्यापीठ, महाविद्यालये, प्रशाळा व परिसंस्था यांच्या अध्यापकांसाठी उजळणी किंवा सेवेच्या कालातील पाठ्यक्रमांच्या सुविधांची तरतूद करणे ;

(३१) विद्यापीठ, महाविद्यालये, प्रशाळा व परिसंस्था यांच्या विद्यार्थ्यांच्याबाबतीत निरोगी वातावरण, समूह जीवन आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृद्धीसाठी व्यवस्था करणे ;

(३२) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणविषयक कार्यास चालना देण्याची व्यवस्था करणे ;

(३३) [५][महाविद्यालयांमध्ये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये अध्यापन, संशोधन व विस्तार] यांचा समन्वय साधणे व नियमन करणे ;

(३४) अध्यापक आणि अध्यापकेतर कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी आणि त्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी तरतूद करणे ;

(३५) परिनियमांच्या तरतुदींनुसार महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ यांचे अध्यापक आणि अध्यापकेतर कर्मचारी यांच्या कामाच्या नियतकालिक मूल्यमापनासाठी तरतूद करणे ;

(३६) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अध्यापनाच्या वेळेत व अध्यापनाच्या वेळेनंतर विद्यापीठ किंवा महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या जागांमध्ये असणाऱ्या अध्यापकांच्या उपस्थितीचे नियमन करणे व तरतूद करणे आणि तसेच खाजगी शिकवणी किंवा खाजगी खास शिकवणी वर्ग घेण्यास किंवा चालविण्यास अध्यापकांना मनाई करणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४ (ग) (दोन) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(ग) (दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४(ह) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४(आय) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४(जे) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३७) अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारीवर्गाकरिता वर्तणूक व शिस्त यासंबंधीच्या नियमांची आणि त्यांच्या अंमलबजावणीची तरतूद करणे ;

(३८) व्यवस्थापनांसाठी आचारसंहिता विहित करणे.

(३९) आवश्यक असेल त्याबाबतीत,—

(क) मुद्रण व प्रकाशन विभाग ;

(ख) विद्यापीठ विस्तार मंडळे ;

(ग) माहिती केंद्रे ;

(घ) सेवायोजन मार्गदर्शन केंद्रे ; आणि

(ङ) विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असतील असे, इतर उपक्रम स्थापन करणे, चालविणे व त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(४०) विद्यार्थ्यांना,—

(क) राष्ट्रीय सेवा योजना ;

(ख) राष्ट्रीय छात्रसेना ;

(ग) होमगार्ड व नागरी संरक्षण दल ;

(घ) राष्ट्रीय क्रीडा संघटना ;

(ङ) शारीरिक व लष्करी प्रशिक्षण ;

(च) बहि:शाल अध्यापन व संशोधन ;

(छ) प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षण व विस्तार यांच्याशी संबंधित कार्यक्रम ;

(ज) विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असतील असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम ;

यांमध्ये सहभागी करण्यासाठी तरतूद करणे ;

(४१) राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन, लोकसेवा, सार्वजनिक उपक्रम यांमधील सेवाप्रवेशाकरिता व रोजगाराच्या इतर स्पर्धात्मक संधी यांकरिता स्पर्धात्मक परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षणाची किंवा खास शिक्षणाची तरतूद करणे ;

(४२) संशोधन व सल्लागार सेवा यांसाठी अन्य कोणतेही विद्यापीठ, परिसंस्था, प्राधिकरण किंवा संघटना यांच्याशी सहकार्य करणे किंवा त्यांच्याशी समन्वय साधणे आणि अशा प्रयोजनांसाठी परिस्थितीनुरूप विवक्षित अभ्यासक्रम चालविण्यासाठी इतर विद्यापीठे, परिसंस्था, प्राधिकरणे किंवा संघटना यांच्याबरोबर योग्य ती व्यवस्था करणे ;

(४३) महाविद्यालयांना दिलेले संलग्नीकरण विखंडित करणे ;

(४४) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने, विद्यापीठाच्या मालमत्तेच्या तारणावर, विद्यापीठाच्या प्रयोजनांकरिता पैसा कर्जाऊ घेणे ;

(४५) संशोधन व विकास, सल्ला सेवा, प्रशिक्षण कार्यक्रम यांसारख्या कार्यक्रमांचा अंदाज घेऊन किंवा ते नव्याने सुरू करून आणि उद्योग, व्यापार किंवा अन्य कोणत्याही अशासकीय संघटना या क्षेत्रातील विविध ग्राहकांना सेवा उपलब्ध करून देऊन, त्याद्वारे विद्यापीठाच्या साधनसंपत्तीत वाढ करण्याच्या शक्यतेचा शोध घेणे ;

(४६) संलग्न महाविद्यालयाच्या, परिसंस्थेच्या किंवा स्वायत्त महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने नियमबाह्य गोष्टी, किंवा दंडनीय स्वरूपाच्या कृती किंवा अकृती केलेल्या आहेत असे विद्यापीठाने

नियुक्त केलेल्या चौकशी समितीला प्रथमदर्शनी दिसून आले असेल त्याबाबतीत, अशा महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे व्यवस्थापन सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हाती घेण्याची शिफारस राज्य शासनाला करणे ;

(४७) राज्य शासनाच्या मान्यतेने, विदेशातील विद्यापीठांबरोबर व परिसंस्थाबरोबर, विद्याविषयक सहयोगी कार्यक्रम हाती घेणे ;

(४८) याबाबतीतील, केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या नियमांच्या व विनियमांच्या अधीन राहून, परदेशी अभिकरणांकडून सहयोगी कार्यक्रमासाठी निधी स्वीकारणे ;

(४९) अध्यापक आणि विद्यापीठ अध्यापक यांच्याकरिता, आचारसंहिता कार्यभार, कामगिरीच्या मूल्यनाची प्रमाणके आणि विद्यापीठाच्या मते विद्याविषयक बाबींच्या संबंधात आवश्यक असतील अशा इतर सूचना किंवा निदेश यांसह सेवाविषयक शर्ती घालून देणे ;

(५०) साधनसंपत्ती निर्माण करण्याच्या दृष्टीने, फी आकारून बाहेरील अभिकरणांकरिता उच्च शिक्षण, संशोधन, सल्लागार सेवा यांवर आधारित प्रकल्प यासंबंधातील विकास कार्यक्रम आणि प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेणे ;

(५१) सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या वर्गांना व जमातींना विद्यापीठातील शिक्षणाचे लाभ उपलब्ध करून देण्यासाठी विशेष तरतुदी करणे ;

(५२) विद्यार्थीनींना आणि अपंग विद्यार्थ्यांना विद्यापीठातील शिक्षणाचे विद्यापीठास आवश्यक वाटतील असे लाभ उपलब्ध करून देण्यासाठी विशेष तरतुदी करणे ;

(५३) ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रांमध्ये, उच्च शिक्षणासाठी विशेष तरतूद करणे ;

(५४) विद्यापीठ यंत्रणेमधील अध्यापक व विद्यार्थी यांच्यामार्फत स्वेच्छा-तत्त्वावर राष्ट्रीय साक्षरता आणि प्रौढ शिक्षण कार्यक्रम कार्यान्वित करणे आणि त्यांच्या सर्वसाधारण विद्याविषयक कामगिरीशिवाय आणखी विद्यार्थ्यांचे या क्षेत्रातील प्रयत्न व कामगिरी यांना योग्य ते गुणाधिक्य देण्याची उपाययोजना करणे आणि त्याचप्रमाणे अध्यापकांच्या या क्षेत्रातील कामगिरीचेही मूल्यमापन करणे ;

(५५) विद्यापीठाने स्वतः किंवा इतर विद्यापीठांच्या सहकार्याने, मराठीचा अभ्यासक्रम आणि शिक्षणाचे व अभ्यास, संशोधन यांचे आणि परीक्षेचे माध्यम म्हणून मराठीचा वापर, या गोष्टीस चालना देणे ;

(५६) विद्यापीठाने स्वतः किंवा इतर विद्यापीठांच्या किंवा संघटनांच्या सहकार्याने, सर्वसाधारणपणे विदेशी भाषांच्या व विशेषतः आशियाई भाषांच्या अभ्यासास चालना देणे ;

(५७) विद्यापीठ, परिसंस्था व महाविद्यालये यांचे अध्यापक, लांब सुटी नसलेले अध्यापक, कर्मचारी व अध्यापकेतर कर्मचारी यांच्या जबाबदाऱ्या सुनिश्चित करण्यासाठी कार्यात्मक योजना तयार करणे ;

(५८) विद्यापीठामधील एकापेक्षा अनेक विभागात, त्याचप्रमाणे विद्यापीठ संशोधन प्रयोगशाळा विद्यापीठ उद्योग व इतर संस्था यांच्यामध्ये एकाच वेतनश्रेणीतील संयुक्त नियुक्त्या करण्यासाठी तरतूद करणे ;

(५९) विद्यापीठाची सर्व किंवा कोणतीही उद्दिष्टे पार पाडण्यासाठी आवश्यक किंवा आनुषंगिक किंवा पोषक असतील अशा इतर सर्व कृती आणि गोष्टी करणे ;

(६०) विद्यापीठाचे वरील अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्या संदर्भात, राज्य शासनाद्वारे वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे अनुपालन करणे व ते पार पाडणे ;

विद्यापीठाची अधिकारिता आणि त्यांचे विशेषाधिकार बहाल करणे.

**६.** (१) या अधिनियमाद्वारे विद्यापीठाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर हा, ज्या प्रादेशिक सीमांमध्ये करण्यात येईल त्या प्रादेशिक सीमांमध्ये, अनुसूचीमध्ये अशा विद्यापीठाच्या नावासमोर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण विद्यापीठ क्षेत्राचा समावेश असेल :

परंतु, राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने, कोणत्याही विद्यापीठाचे दूरता शिक्षण पाठ्यक्रम, पत्रव्यवहार शिक्षण पाठ्यक्रम, मुक्त विद्यापीठ पाठ्यक्रम किंवा बाह्य पदवी पाठ्यक्रम, यांचा लाभ विद्यापीठ अधिक्षेत्राबाहेरील राज्याच्या, संपूर्ण क्षेत्रास देता येईल किंवा मिळेल.

(२) कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून, विद्यापीठ क्षेत्राच्या आत स्थित असलेली कोणतीही शैक्षणिक परिसंस्था, विद्यापीठाच्या संमतीने व राज्य शासनाच्या मंजुरीने असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, विधिद्वारे स्थापित अशा कोणत्याही अन्य विद्यापीठाशी कोणत्याही प्रकारे संबंधित असणार नाही किंवा त्यांचा कोणताही विशेषाधिकार मिळविण्याचा प्रयत्न करणार नाही :

परंतु, जर एखादी शैक्षणिक परिसंस्था, ज्या विद्यापीठाची अधिकारिता कोणत्याही राज्यापुरती किंवा विद्यापीठाचे विशेषाधिकार मिळण्याची मागणी करत असेल तर, असे सहयोगी होण्यास किंवा असे विशेषाधिकार मिळविण्यास, राज्य शासन परवानगी देऊ शकेल :

आणखी असे की, ज्या विद्यापीठाची अधिकारिता कोणत्याही राज्यापुरती किंवा क्षेत्रापुरती मर्यादित नसेल असे एखादे विद्यापीठ, विद्यापीठ क्षेत्रात संशोधनाचे केंद्र किंवा इतर युनिट प्रस्थापित करू इच्छित असेल तर, त्यास, राज्य शासनाच्या मंजुरीने तसे करता येईल.

(३) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रात कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थांद्वारे वापरला जाणारा कोणताही विशेषधिकार राज्य शासनाची मंजुरी न घेता, काढून घेण्यात येणार नाही.

[१][(४) राज्य शासनाने, नवीन जिल्ह्याची निर्मिती केल्यास, अशा विद्यापीठाच्या विशेषाधिकारांनुसार, प्रवेश देण्याच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घोषित करण्यात येईल त्याप्रमाणे, अशा जिल्ह्याचे क्षेत्र अशा विद्यापीठाच्या अधिकारितेखाली येईल.]

स्त्री-पुरूष भेद, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान, धर्म किंवा मतप्रणाली, इ. विचारात न असणे.

**७.** (१) भारताच्या कोणत्याही नागरिकास स्त्री-पुरुष भेद, वंश, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान, धर्मश्रद्धा किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली केवळ याच कारणावरून, विद्यापीठाच्या कोणत्याही पदापासून किंवा त्याच्या प्राधिकरणांपैकी, मंडळापैकी किंवा समित्यापैकी कोणत्याही प्राधिकरणाचे, मंडळाचे किंवा समितीचे सदस्यत्व मिळण्यापासून किंवा कोणत्याही पदावरील नेमणुकीपासून किंवा कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी किंवा अभ्यासक्रम यासाठी प्रवेश मिळवण्यापासून, वगळण्यात येणार नाही :

परंतु, विद्यापीठास केवळ स्त्रियांसाठी असलेले किंवा स्त्रियांसाठी राखीव असलेले कोणतेही महाविद्यालय किंवा परिसंस्था चालविता येईल किंवा केवळ त्यास अधिस्वीकृती किंवा मान्यता देता येईल.

(२) अनुसूचित जातींसाठी, अनुसूचित जमातींसाठी [२][विमुक्त जातींसाठी, भटक्या जमातींसाठी] व इतर मागासवर्गांसाठी, अध्यापक व अध्यापकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या वेगवेगळ्या पदांवरील नियुक्त्यांच्या बाबतीत व संलग्न किंवा संचालित महाविद्यालयांमध्ये, विद्यापीठ विभागांमध्ये विद्यापीठ परिसंस्थांमध्ये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या प्रयोजनांकरिता, विद्यापीठ, राखीव जागा ठेवण्यासंबंधातील शासनाचे धोरण व शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश यांचा अंगिकार करील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५ अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) विद्यापीठ, राज्य शासनाकडून वेळोवेळी निदेश देण्यात येईल त्यानुसार, समाजाच्या दुर्बल घटकांच्या विविध प्रवर्गांच्या व अल्पसंख्याकांच्या कल्याणसंबंधात राज्य शासनाच्या सर्व साधारण धोरणाचा अवलंब करील.

८. (१) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय, विद्यापीठ,— राज्य शासनाचे व विद्यापीठांचे नियंत्रण.

(क) अध्यापकांची, अधिकाऱ्यांची किंवा इतर कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्माण करणार नाही ;

(ख) त्याच्या अध्यापकांचे, अधिकाऱ्यांचे व इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवानिवृत्तिनंतरचे फायदे व इतर लाभ यात सुधारणा करणार नाही ;

(ग) त्याच्या कोणत्याही अध्यापकांना, अधिकाऱ्यांना किंवा इतर कर्मचाऱ्यांना कोणतेही विशेष वेतन, भत्ते किंवा कोणत्याही स्वरूपाचे अन्य अतिरिक्त पारिश्रमिक, तसेच सानुग्रह प्रदान किंवा अपेक्षित वित्तीय भार असणारे अन्य लाभ देणार नाही ;

(घ) ठराविक प्रयोजनासाठी मिळालेला कोणताही निधी, तो ज्या प्रयोजनासाठी मिळालेला आहे, त्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापरणार नाही ;

(ङ) स्थावर मालमत्तेची विक्री किंवा भाडेपट्टा याद्वारे, हस्तांतरण करणार नाही ;

(च) राज्य शासनाकडून किंवा विद्यापीठ अनुदान आयोग किंवा कोणतीही व्यक्ती किंवा मंडळ यांकडून मिळणाऱ्या निधीतून, ज्या प्रयोजनाकरिता निधी मिळाला आहे त्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनाकरिता, कोणत्याही विकास कामासाठी तो निधी खर्च करणार नाही ;

(छ) संलग्न महाविद्यालयांच्या संबंधात, ज्यामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे राज्य शासनाचे वित्तीय दायित्व वाढेल, असा कोणताही निर्णय घेणार नाही. ;

(२) राज्य शासनावर, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, तात्काळ किंवा त्यानंतर कोणतेही वित्तीय दायित्व येत नसेल तर, ती खर्चाची बाब मान्यतेसाठी राज्य शासनाकडे न पाठवता, पुढील ठिकाणांहून मिळणाऱ्या निधीतून खर्च करण्यास विद्यापीठ सक्षम असेल,—

(क) राज्य शासनाकडून मिळणाऱ्या कोणत्याही अंशदानाचा हिस्सा नसणारा निधी देणारी विविध अभिकरणे ;

(ख) स्वयंधारित तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या विद्याविषयक कार्यक्रमांची फी ;

(ग) विद्यापीठाच्या उद्दिष्टांना चालना देण्यासाठी, व्यक्ती, उद्योग, परिसंस्था, संघटना किंवा कोणतीही व्यक्ती यांच्याकडून मिळाली अंशदाने ;

(घ) विद्यापीठाने पुरवलेल्या अभ्यासविषयक किंवा इतर सेवांकरिता अंशधाने किंवा फी ;

(ङ) पुढील प्रयोजनांकरिता विद्यापीठाने कोणताही विकास निधी स्थापन केलेला असेल तर, तो विकास निधी,—

(एक) विनिर्दिष्ट कालावधीकरिता विविध प्रवर्गांमध्ये पदे निर्माण करणे ;

(दोन) आपल्या सेवतःच्या निधीतून निर्माण केलेल्या पदांच्या बाबतीत, नसतील तर असे वेतन, भत्ते व इतर लाभ देणे, मात्र ती पदे शासकीय अंशदान मिळत असलेली पदे धारण करणाऱ्या व्यक्तींकडून धारण केली जात नसली पाहिजेत ;

(तीन) स्वयंधारित तत्त्वावर कोणताही विद्याविषयक कार्यक्रम सुरू करणे ;

(चार) कोणत्याही विकासविषयक कामावर खर्च करणे.

(३) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या तरतुदींनुसार राज्य शासन, समान मानके साध्य करण्यासाठी आणि तो कायम राखण्यासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विद्यापीठाचे अधिकारी अध्यापक व इतर कर्मचारीवर्ग आणि (राज्य शासन, केंद्र सरकार आणि स्थानिक प्राधिकरणांकडून व्यवस्थापन करण्यात येत असलेली महाविद्यालये व संख्या खेरीजकरून इतर) संलग्न महाविद्यालयांमधील व मान्यताप्राप्त संस्थांमधील अध्यापक व इतर कर्मचारीवर्ग यांचे वर्गीकरण, त्यांची निवड व नियुक्ती करण्याची रीत व पद्धती, अतिरिक्त ठरलेले अध्यापक व कर्मचारी सामावून घेणे, अनुसूचित जनजाती, अनुसूचित जमाती, [१][विमुक्त जाती, भटक्या जमाती] आणि इतर मागासवर्ग यांतील व्यक्तींसाठी पदे राखून ठेवणे, त्यांची कर्तव्ये, कार्यभार, वेतन, भत्ते, सेवानिवृत्तिनंतरचे लाभ व इतर लाभ, वर्तणूक व शिस्तविषयक बाबी, सेवेच्या इतर शर्ती यासंबंधी प्रमाण संहिता विहित करू शकेल अशी संहिता विहित करण्यात आल्यानंतर संहितेमधील तरतुदी अधिभावी ठरतील आणि या अधिनियमान्वये करण्यात आलेले परिनियम, आदेश, विनियम आणि नियम यात करण्यात आलेल्या तरतुदी संहितेमध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींच्या संबंधात त्या संहितेमधील तरतुदींशी, जेथवर विसंगत असतील तेथवर, विधिअग्राह्य असतील.

(४) कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकार व कर्तव्ये अनुक्रमे वापरण्यास व पार पाडण्यास विद्यापीठाने कसूर केली असेल त्याबाबतीत किंवा विद्यापीठाने असे अधिकार व कर्तव्ये समुचित रीतीने अनुक्रमे वापरलेले किंवा पार पाडलेली नसतील किंवा राज्य शासनाने काढलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन केलेले नसेल त्याबाबतीत, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, विद्यापीठास अशा अधिकारांचा योग्य वापर करण्याचा किंवा अशी कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडण्याचा किंवा आदेशाचे पालन करण्याचा निदेश देता येईल व अशा निदेशाचे पालन करण हे विद्यापीठाचे कर्तव्य असेल :

[२][परंतु, जर विद्यापीठाने निदेशाचे पालन करण्यात कसर केली तर, राज्य शासन या आदेशाचे पालन का केले गेले नव्हते, याची लेखी कारणे देण्यास विद्यापीठास फर्मावील. राज्य शासनाचे, जर या स्पष्टीकरणाने समाधान झाले नाही तर, ते, ती बाब, कलम ९ च्या पोट-कलम (३) अन्वये आवश्यक ती कार्यवाही केली जाण्यासाठी, कुलपतीकडे सोपवू शकेल]

(५) राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशा ठराविक कालांतरांनी विद्यापीठ, महाविद्यालय, प्रशाळा किंवा परिसंस्था यांची नियमितपणे चाचणी लेखापरीक्षा किंवा संपूर्ण लेखापरीक्षा करता येईल.

## प्रकरण तीन

## **विद्यापीठाचे अधिकार**

### **(क) कुलपती**

कुलपती आणि त्यांचे अधिकार.

**९.** (१) त्या त्या वेळी असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल हे प्रत्येक विद्यापीठाचे कुलपती असतील व त्यांच्या पदपरत्वे ते विद्यापीठाचे प्रमुख असतील.

(२) कुलपती उपस्थित असेल तेव्हा, विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षपद स्वीकारेल व तो, कुलगुरूस कोणत्याही विशिष्ट प्रयोजनाकरिता आवश्यक असेल तेव्हा, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची सभा बोलाविण्याचा निदेश देऊ शकेल व कुलगुरू, अशा सभेचे कार्यवृत्त कुलपतीस त्याच्या अवलोकनार्थ सादर करील.

[३][(३) कुलपती,—

(क) कलम ८ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकाअन्वये राज्य शासनाकडून, अशा बाबींमधील संदर्भ मिळाल्यावर, किंवा

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, याच्या कलम ७(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७(ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८(अ) द्वारे हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

(ख) कोणत्याही बाबीमध्ये, स्वाधिकारे किंवा अन्य प्रकारे,

विद्यापीठाच्या अशा बाबींच्या किंवा कोणत्याही बाबीच्या किंवा विद्यापीठाच्या कामकाजाच्या संबंधात अहवाल किंवा स्पष्टीकरण किंवा अशी माहिती व अभिलेख देण्यास फर्मावील आणि असा अहवाल, किंवा स्पष्टीकरण अथवा माहिती किंवा अभिलेख यावर विचार केल्यानंतर, विद्यापीठाच्या किंवा विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने किंवा एकंदर जनतेच्या हिताच्या दृष्टीने, त्यांना योग्य वाचतील असे निदेश देतील आणि त्यांचे निदेश अंतिम असतील व विद्यापीठाकडून ताबडतोब त्यांचे पालन करण्यात येईल.]

(४) कुलपतीस, कुलगुरूकडून लेखी अहवाल घेतल्यानंतर कोणत्याही प्राधिकरणाचा, मंडळाचा, समितीचा किंवा अधिकाऱ्याचा कोणताही ठराव, आदेश किंवा कामकाज त्याच्या मते या अधिनियमाशी किंवा त्याखाली केलेल्या परिनियमांशी, आदेशांशी किंवा विनियमांशी सुसंगत नसेल किंवा विद्यापीठाच्या हिताचे नसेल तर, ते स्थगित करता येईल, किंवा त्यात फेरबदल करता येईल आणि विद्यापीठाचे प्रधिकरण, मंडळ, समिती व अधिकारी त्याचे पालन करतील :

परंतु, कुलपती असा कोणताही आदेश देण्यापूर्वी, प्राधिकरण, मंडळ, समिती किंवा, यथास्थिती, अधिकारी यांना, असा आदेश का देण्यात येऊ नये याची कारणे दाखविण्यास फर्मावील व कुलपतीने ठरवून दिलेल्या कालावधीत, जर कोणतेही कारण दाखविण्यात आले तर, कुलपती, ते विचारात घेईल आणि ज्याबाबतीत त्यास आवश्यक वाटेल त्याबाबतीत राज्य शासनाशी विचारविनिमय करून, तो, या प्रकरणात कोणती कारवाई करायची हे ठरवील व त्याचा निर्णय अंतिम राहील.

(५) ज्या बाबतीत कुलपतीच्या मते, निवडून दिलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या किंवा नियुक्त केलेल्या किंवा स्वीकृत केलेल्या कोणत्याही सदस्याचे वर्तन, विद्यापीठाचे, किंवा कोणत्याही प्राधिकरणाचे किंवा मंडळाचे किंवा समितीचे कामकाज सुरळीत चालण्यास बाधक ठरत असेल तर, त्यास अशा सदस्यास, त्याचे लेखी स्पष्टीकरण देण्याची संधी दिल्यानंतर व अशा प्रकारचे कोणतेही स्पष्टीकरण मिळाल्यास, त्यावर विचार करून आणि असे करणे आवश्यक आहे याबद्दल स्वतःची खात्री करून घेतल्यानंतर, अशा सदस्यास, त्याला योग्य वाटेल तेवढ्या कालावधीकरिता [१][अपात्र ठरवता येईल किंवा त्याला निलंबित करता येईल.]

(६) कुलपती, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यास प्रदान करण्यात येतील किंवा त्याच्याकडे विहित करण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करील व अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.

### (ख) विद्यापीठाचे इतर अधिकारी

**१०.** विद्यापीठाचे इतर अधिकारी पुढीलप्रमाणे असतील, ते असे :— विद्यापीठाचे इतर अधिकारी.

(१) कुलगुरू ;

(२) प्रतिकुलगुरू ;

(३) विद्याशाखांचे अधिष्ठाते ;

(४) कुलसचिव ;

(५) परीक्षांचे नियंत्रक ;

(६) विद्यापीठ उपक्षेत्रांचे संचालक ;

(७) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ ;

(८) विद्यापीठ ग्रंथालयाचा ग्रंथपाल ;

(९) वित्त व लेखा अधिकारी ;

(१०) विद्यार्थी कल्याण संचालक ;

(११) परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे विद्यापीठाच्या सेवेतील इतर अधिकारी.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

कुलगुरू व प्रतिकुलगुरू.

**११.** (१) कलम १२ मध्ये तरतूद केल्यानुसार नियुक्त करण्यात आलेल्या एक कुलगुरू असेल व तो विद्यापीठाचा मुख्य कार्यकारी व विद्याविषयक अधिकारी आणइ व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद, परीक्षा मंडळ, वित्त समित्या व विद्या सेवा समितीत यांचा पदसिद्ध अध्यक्ष असेल व तो कुलपतीच्या अनुपस्थितीत विद्यापीठाच्या कोणत्याही दीक्षांत समारंभात व तसेच अधिसभेच्या कोणत्याही सभेत अध्यक्ष म्हणून काम पाहील. त्याचे अधिकार व कर्तव्ये कलम १४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे असतील.

(२) प्रतिकुलगुरूची नियुक्ती ही, कलम १३ मध्ये तरतूद केल्यानुसार करण्यात येईल व ज्या बाबतीत त्याची नियुक्ती करण्यात आलेली असेल त्याबाबतीत, तो, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेऊन कुलगुरूने त्यास विशेषरित्या नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यास जबाबदार राहील व तो कुलगुरूच्या अनुपस्थितीत विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारील.

(३) अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, कुलगुरू व प्रतिकुलगुरू यांच्या वित्तलब्धी आणि सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासनाद्वारे वेळोवेळी ठरवून देण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) या प्रकरणात तरतूद करण्यात आल्याप्रमाणे विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल व ते, त्या प्रकरणात विहित करण्यात आलेल्या अशा अधिकारांचा वापर करतील अशी कर्तव्ये पार पाडतील.

[१][(१) कुलपती हा, कुलगुरूची पुढील पद्धतीने नियुक्ती करील :—

(क) कुलगुरूच्या नियुक्तीसाठी कुलपतींना योग्य अशा नावाची शिफारस करण्याकरिता पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक समिती असेल :—

(एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश असेल किंवा उच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य न्यायमूर्ती असेल अथवा राष्ट्रीय ख्यातीचा विख्यात संशोधक असेल वा त्याला शिक्षण क्षेत्रातील पद्म पुरस्कार मिळाला असेल ;

(दोन) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा प्रधान सचिव किंवा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला शासनाच्या प्रधान सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी ;

(तीन) राज्य शासनाने, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व्यवस्थापन परिषद व विद्याविषयक परिषद यांनी संयुक्तपणे नामनिर्देशित केलेला भारतीय प्राद्योगिकी संस्था, भारतीय व्यवस्थापन संस्था, भारतीय विज्ञान संस्था, भारतीय अवकाश संशोधन संस्था किंवा राष्ट्रीय संशोधन प्रयोगशाळा यांसारख्या राष्ट्रीय नामांकित संस्था किंवा संघटना यांचा संचालक किंवा प्रमुख असेल ;

(ख) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य हा समितीचा अध्यक्ष असेल ;

(ग) नामनिर्देशित केलेले सदस्य हे विद्यापीठाशी किंवा कोणत्याही महाविद्यालयाशी अथवा विद्यापीठाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेशी संबंधित नसलेल्या व्यक्ती असतील ;

(घ) समितीचे सर्व तीन सदस्य उपस्थित असल्याखेरीज समितीची कोणतीही बैठक घेतली जाणार नाही.]

(२) नामिका तयार करण्याची प्रक्रिया ही, कुलगुरूची जागा रिक्त होण्याच्या संभाव्य दिनांकापूर्वी कमीतकमी तीन महिने अगोदर सुरू होईल व तो कुलपतीने ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल. तथापि, कुलपतीला, परिस्थितीच्या निकडीनुसार, कालावधी वाढविणे आवश्यक असल्यास, तो तसे करील ; मात्र असा वाढविण्यात आलेला कालावधी एकूण तीन महिन्यांपेक्षा जास्त होणार नाही.

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम १०(क) अन्वये हे पाट-कलम दाखल करण्यात आले.

[१][(३) समिती, कुलाधिपतीच्या विचारार्थ, कमीत कमी पाच योग्य व्यक्तीच्या नामिकेची कुलगुरू म्हणून नियुक्ती केली जाण्यासाठी शिफारस करील, अशा प्रकारे शिफारस करण्यात आलेली नावे, कोणताही पसंतीक्रम न दर्शविता वर्णक्रमानुसार नमूद केलेली असतील. नामिकेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या योग्यतेची सविस्तर माहिती अहवालासोबत असेल.

(३क) कुलगुरू म्हणून नियुक्तीसाठी समितीद्वारे शिफारस केलेली व्यक्ती,–

(क) प्रख्यात विद्वान असेल किंवा उच्च दर्जाचा प्रशासक असेल ;

(ख) स्वत:च्या उदारहणाने नेतृत्त्व करण्यास समर्थ असेल ;

(ग) दूरदृष्टी देण्यास समर्थ असेल आणि ती दृष्टी विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या हितासाठी प्रत्यक्षात आणण्यास सक्षम असेल ; आणि

(घ) राज्य शासनाने, कुलपतीशी विचारविनिमय करून, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेली अशी शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारी असेल.

(३ख) सर्वात योग्य उमेदवारांची शिफारस व्हावी याची सुनिश्चिती करण्याकरिता, पात्रतेच्या शर्ती व कुलगुरू म्हणून नियुक्तीसाठी नावांच्या शिफारशींची प्रक्रिया यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात येईल]

(४) कुलपती, नामिकेत समाविष्ट असलेल्या व्यक्तीपैकी एका व्यक्तीची कुलगुरू म्हणून नियुक्ती करील :

परंतु, अशा प्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तीपैकी कोणतीही व्यक्ती, कुलपतीस मान्य नसेल तर, तो, एकतर त्याच समितीकडून किंवा या प्रयोजनासाठी नवीन समिती घटित केल्यानंतर अशा नवीन समितीकडून नवीन नामिका मागवू शकेल.

(५) कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती ही, तिच्या सेवा कराराच्या अटी व शर्तीना अधीन राहून, तिने अधिकारपद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा करार अवधी किंवा तिच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंतचा अवधी–या दोन्हींपैकी जो कोणताही अवधी अगोदर पूर्ण होईल तोवर–पद धारण करील आणि ती पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

(६) कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती ही, या नियुक्तीपूर्वी ज्या कोणत्या पदावर कायम झाली असेल त्या पदावर तिचा धारणाधिकार, कोणताही असल्यास, धारण करील.

(७) जी परिस्थीती [२][निकडीची] असल्याबद्दलचा निर्णय केवळ कुलपतीच करील अशा पुढीलपैकी कोणत्याही परिस्थितीत, म्हणजेच,—

(क) ज्याबाबतीत पोट-कलम (१) अन्वये नियुक्ती करण्यात आलेल्या समितीला कुलपतीने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत कोणत्याही नावाची शिफारस करता येत नसेल ;

(ख) ज्याबाबतीत मृत्यू, राजीनामा यांमुळे किंवा अन्य कारणांमुळे कुलगुरूचे पद रिक्त झाले असेल व ते पद पोट-कलम (१) ते (४) ज्या तरतुदींनुसार सुकरतेने व शीघ्रतेने भरता येत नसेल ;

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ९(ब) अन्वये "अस्तित्वात" या मजकुराऐवजी "निकडीची" हा मजकूर दाखल करण्यात आला

(ग) ज्याबाबतीत रजा, आजार यामुळे किंवा अन्य कारणांमुळे कुलगुरूचे पद तात्पुरते रिक्त झाले असेल ;

(घ) ज्यावेळी कुलगुरूचा पदावधी समाप्त होत असेल ; किंवा

(ङ) ज्याबाबतीत, इतर कोणत्याही प्रकारची निकडीची परिस्थिती असेल,

त्याबाबतीत कुलपतीला, त्याच्या आदेशात तो विनिर्दिष्ट करील अशा, एकूण [१][बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता] कोणत्याही योग्य अशा व्यक्तीची कुलगुरू म्हणून काम करण्यासाठी नियुक्ती करता येईल :

परंतु, अशा प्रकारे नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती ही, ज्या दिनांकास पोट-कलम (१) ते (४) ज्या तरतुदीनुसार कुलगुरू म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती पद ग्रहण करील किंवा कुलगुरू त्या पदावर पुन्हा रूजू होईल, त्या दिनांकापासून पदावर राहणार नाही.

(८) कुलगुरू हा, विद्यापीठाचा पूर्णवेळ वेतनी अधिकारी असेल व त्याला राज्य शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे वेतन व भत्ते मिळतील. याखेरीज त्याला मोफत सुसज्ज निवास्थान, त्याच्या वापरासाठी मोटारगाडी (तिचे परिरक्षण, दुरुस्ती व त्यासाठी आवश्कक असलेल्या इंधनासह) शोफरची मोफत सेवा मिळण्याचा हक्क असेल.

(९) राज्य शासन मान्यता देईल असा आतिथ्य भत्ता, कुलगुरूकडे देण्यात येईल.

(१०) जर एखाद्या व्यक्तीस राज्याच्या एकत्रीकृत निधीतून मानधन मिळत असेल किंवा जर संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्राचार्याची किंवा विद्यापीठाच्या अध्यापकाची कुलगुरू म्हणून नियुक्ती झालेली असेल तर, कुलगुरू म्हणून असलेल्या त्याच्या पदावधीत त्याच्या सेवेच्या अटी व शर्तीमध्ये त्याचे अहित होईल अशा प्रकारे फेरफार करण्यात येणार नाही :

परंतु, अशा पदाची परिणामस्वरूप रिक्त जागा कुलगुरू म्हणून असलेल्या त्याच्या पदावधीत दीर्घ मुदतीच्या नियुक्तीद्वारे भरण्यात येणार नाही.

(११) पूर्वगामी पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती, तिच्या मूळ पदाच्या सेवेच्या अटी व शर्तीनुसार त्या पदावरून निवृत्त होईल.

(१२) कुलगुरूला आपल्या सहीने कुलपतीला पत्र लिहून एक महिन्याची नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि त्याचा राजीनामा कुलपतीने स्वीकारणे किंवा उक्त नोटिशीचा कालावधी समाप्त होणे यापैकी जे अगोदर घडेल त्या दिवसापासून तो आपल्या पदावर राहणार नाही.

(१३) कुलपतीला, जर अशी खात्री वाटेल की कुलगुरू हा,—

(क) भ्रमिष्ट झाला आहे आणि सक्षम न्यायालयाने तसे जाहीर केले आहे ;

(ख) नैतिक अध:पात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाकरिता न्यायालयाकडून दोषी ठरविण्यात आलेला आहे ;

(ग) अविमुक्त नादार झाला आहे आणि सक्षम न्यायालयाने तसे जाहीर केले आहे ;

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(घ) तो शारीरिकदृष्ट्या अपात्र झाला आहे आणि दीर्घकाळच्या आजारामुळे किंवा विकलांगतेमुळे त्याची कार्ये पार पाडण्यास तो असमर्थ झालेला आहे ;

[१][(घ-१) या अधिनियमाच्या तरतुदीचे पालन करण्याचे बुद्धिपुरस्सर वर्जिले आहे किंवा पालन करण्याचे बुद्धिपुरस्सर नाकारले आहे किंवा सेवा संविदेतील कोणत्याही अटींचा किंवा शर्तींचा किंवा कलम ११ च्या पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाने विहित केलेल्या कोणत्याही अटींचा भंग केला आहे, किंवा त्याच्याकडे निहित केलेल्या अधिकारांचा दुरूपयोग केला आहे किंवा त्या कुलगुरूला पदावर पुढे चालू ठेवणे, विद्यापीठाच्या हितसंबंधाच्या दृष्टीने हानिकारक आहे ;]

(ङ) तो कोणत्याही पक्षाचा किंवा राजकराणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य आहे किंवा त्या पक्षाशी वा संघटनेशी अन्य प्रकारे संबंधित आहे, किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात भाग घेत आहे किंवा त्यासाठी मदतीदाखल वर्गणी देत आहे ;

तर, कुलगुरू त्याच्या पदावरून काढून टाकला जाऊ शकेल.

**स्पष्टीकरण.—**या उप-खंडाच्या प्रयोजनांसाठी, कोणताही पक्ष राजकीय पक्ष आहे किंवा कोणतीही संघटना राजकारणामध्ये भाग घेते किंवा कोणतीही चळवळ किंवा कार्य या उप-खंडाच्या व्याप्तीमध्ये येते किंवा कसे यासंबंधातील कुलपतीचा निर्णय अंतिम राहील :

परंतु, खंड (घ), [२][(घ-१) आणि (ङ)] अन्वये कुलगुरूला काढून टाकण्यापूर्वी कुलपतीकडून कुलगुरूला कारणे दाखवण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

**१३.** (१) कुलपतीला, कुलगुरूशी विचारविनिमय केल्यानंतर, ज्या विद्यापीठाची १५० पेक्षा अधिक संलग्न महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था असतील, अशा विद्यापीठासाठी प्रति कुलगुरूची नियुक्ती करता येईल. प्रतिकुलगुरूची नियुक्ती करण्याची रीत.

[३][(२) प्रतिकुलगुरूचे पद धारण करणारी व्यक्ती ही, जिला किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल व जिने महाविद्यालयाच्या अथवा परिसंस्थेच्या प्राचार्याचे किंवा प्राध्यापकाचे पद धारण केले असेल अशी व्यक्ती असेल.]

(३) प्रतिकुलगुरूचा पदावधी हा, कुलगुरूच्या पदावधी बरोबरच समाप्त होणे किंवा त्याच्या वयाची ६० वर्षे पूर्ण होणे यांपैकी जा घटना अगोदर पडेल तोपर्यंत असेल.

(४) प्रतिकुलगुरू हा, विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल आणि त्याला अनुज्ञेय असणारे वेतन व भत्ते, तसेच त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती या राज्य शासनाने निर्धारित केल्यानुसार असतील.

(५) प्रतिकुलगुरूचे पद रिक्त होईल किंवा आजारपण, अनुपस्थिती किंवा इतर कोणतेही कारण यांमुळे तो आपल्या पदाची कामे पार पाडण्यास असमर्थ झाला असेल तर, त्यावेळी कुलपतीला कुलगुरूच्या शिफारशीवरून, प्रतिकुलगुरू कामावर परत रूजू होईपर्यंत, किंवा यथास्थिति, नवीन प्रतिकुलगुरू पद ग्रहण करीपर्यंत प्रतिकुलगुरू म्हणून पदावर स्थानापन्न म्हणून काम करण्याकरिता, प्रतिकुलगुरू म्हणून नियुक्ती होण्यास अर्हताप्राप्त अशा योग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

[४][(६) प्रतिकुलगुरूला पदावरून काढून टाकण्याच्या बाबतीत, कलम १२ च्या पोट-कलम (१३) मधील तरतुदी योग्य त्या फेरफारासह लागू होतील.]

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम (क) (एक) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आलेत.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९(क) (दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १०(अ) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १०(ब) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

कुलगुरूचे अधिकार व कर्तव्ये.

**१४.** (१) कुलगुरू हा, विद्यापीठाचा प्रमुख विद्याविषयक व कार्यकारी अधिकारी असेल आणि तो विद्यापीठाच्या विद्याविषयक कार्यक्रमांच्या विकासासाठी जबाबदार असेल. विद्यापीठाचे कामकाज कार्यक्षमतापूर्वक व सुव्यवस्थितरित्या चालावे यासाठी विद्यापीठाच्या विद्याविषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि सामान्य प्रशासन यांच्यावर तो देखरेख करील व संयनियंत्रिण ठेवील.

(२) त्याला विद्यापीठाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही बैठकीमध्ये हजर राहण्याचा व बोलण्याचा हक्क असेल, परंतु, तो त्या प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा अध्यक्ष किंवा सदस्य नसेल तर, त्याला तेथे मत देण्याचा हक्क असणार नाही.

(३) कुलगुरूला, कोणत्याही प्राधिकरणांच्या, मंडळांच्या किंवा समित्यांच्या बैठकी बोलावणे आवश्यक वाटेल तेव्हा, त्यांच्या बैठकी बोलावण्याचा त्याला अधिकार असेल.

(४) कुलगुरू, कुलपतीने काढलेल्या निदेशांचे काटेकोर अनुपालन, किंवा यथास्थिति, अंमलबजावणी करण्यात येत असल्याबद्दल खात्री करून घेईल.

(५) [१][राज्य शासनाचे कोणतेही निदेश असल्यास, त्यांचे, आणि] हा अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम यांचे काटेकोर पालन करण्यात येत आहे, तसेच हा अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्याशी विसंगत नसतील असे, प्राधिकरणांचे, मंडळांचे व समित्यांचे जे निर्णय असतील त्यांची योग्यरीत्या अंमलबजावणी करण्यात येत आहे, याबाबत खात्री करून घेणे हे कुलगुरूचे कर्तव्य असेल.

(६) विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण, मंडळ किंवा समिती यांनी घेतलेला निर्णय किंवा संमत केलेला ठराव हा, कुलगुरूच्या मते, अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्या तरतुदीशी सुसंगत नसेल किंवा असा ठराव किंवा निर्णय हा विद्यापीठाच्या हिताचा नसेल तर, कुलगुरूला त्याची अंमलबजावणी लांबणीवर टाकता येईल आणि तो संधी मिळाल्यानंतर ताबडतोब संबंधित प्राधिकरण, मंडळ किंवा समिती यांच्याकडे कारणे लेखी नमूद करून, पुढील बैठकीमध्ये मांडण्यासाठी फेरविचारार्थ परत पाठविता येईल. मतभेद कायम राहीले तर, कुलगुरू एक आठवड्याच्या आत कारणे देऊन कुलपतीकडे निर्णयार्थ तो सादर करील आणि असे केल्याबद्दल संबंधित प्राधिकरण, मंडळ किंवा समिती यांच्या सभासदांना कळवील. कुलपतीचा निर्णय आल्यानंतर, कुलगुरू, कुलपतीच्या निदेशांनुसार कार्यवाही करील आणि तद्नुसार संबंधित प्राधिकरण, मंडळ किंवा समितीत यांना कळवील.

(७) तातडीने कार्यवाही करण्यासारखी निकडीची परिस्थिती आहे असे रास्त कारणांवरून कुलगुरूला वाटले तर, तो, त्यास आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करील आणि ज्या कारणांमुळे निकडीची परिस्थिती निर्माण झाली असल्याबद्दल त्याला खात्री वाटली ती कारणे आणि त्याने केलेली कार्यवाही ज्यांनी एरवी या बाबींच्या संबंधात कार्यवाही केली असती त्या प्राधिकरणाला किंवा मंडळाला, शक्य तितक्या लवकर, लेखी कळवील, निकडीची परिस्थिती खरोखरच होती किंवा कसे याबद्दल किंवा (ज्या बाबतीत विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा कार्यवाहीमुळे बाधा पोहचत नसेल त्याबाबतीत) केलेल्या कार्यवाहीबद्दल किंवा दोन्हींबद्दल कुलगुरू आणि प्राधिकरण किंवा मंडळ यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले तर व ती बाब कुलपतीकडे निर्णयासाठी पाठवण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, ज्याबाबतीत कुलगुरूने केलेल्या अशा कोणत्याही कार्यवाहीमुळे विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला बाधा पोहचत असेल त्याबाबतीत अशा व्यक्तीला, तिला अशा कार्यवाहीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत व्यवस्थापन परिषदेकडे अपील दाखल करण्याचा हक्क असेल.

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम ११ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(८) ज्याबाबतीत कोणतीही बाब, परिनियम, आदेश किंवा विनियम याद्वारे विनियमित करावयाची असेल, परंतु त्यासंबंधात कोणतेही परिनियम, आदेश किंवा विनियम नसतील तर, कुलगुरू, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देऊन ती बाब त्या वेळेपुरती विनियमित करू शकेल आणि संधी मिळाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, मान्यतेसाठी संबंधित व्यवस्थापन परिषदेपुढे किंवा प्राधिकरण किंवा मंडळ यांच्यापुढे मांडील. त्याचबरोबर तो यासंबंधात करावयाचे असलेले परिनियम आदेश, किंवा यथास्थिति, विनियम यांचा मसुदा विचारार्थ अशा प्राधिकरणापुढे किंवा मंडळापुढे ठेवील.

[१][(९) कुलगुरू हा, नियुक्तीच्या प्रयोजनासाठी घटित करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशींनुसार नियुक्त करावयाच्या विद्यापीठ अध्यापकांसाठी नियुक्ती व शिस्तविषयक प्राधिकारी असेल.]

(१०) कुलगुरू हा, विद्यापीठातील सहायक कुलसचिवाच्या दर्जाच्या आणि त्याच्याशी समतुल्य व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी [२][नियुक्ती व शिस्तविषयक प्राधिकारी] असेल.

(११) विद्यापीठाची प्राधिकरणे किंवा मंडळे किंवा समित्या यांचा अध्यक्ष या नात्याने, कुलगुरू, प्राधिकरण, मंडळ किंवा समितीत यांच्या बैठकीतून एखाद्या सदस्यास, त्याने कामकाजात सतत अडथळे आणण्याचा किंवा ते थांबविण्याचा प्रयत्न केल्यामुळे किंवा सदस्याला न शोभणारी वर्तणूक केल्यामुळे त्याला निलंबित करण्याचा अधिकार असेल व तो, ती बाब, त्यानुसार कुलपतीला कळवील.

(१२) कुलगुरू, आदेशान्वये तरतूद केल्यानंतर, ठराविक कालांतराने विद्यापीठाच्या कामकाजाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवील.

(१३) कुलगुरू, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्याला प्रदान करण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करील व अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.

(१४) (क) कुलगुरूला, तो निदेश देईल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे मंडळ यांच्याकडून विद्यापीठ, त्याच्या इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, वस्तू संग्रहालये, कार्यशाळा व साधनसामग्री यांची तपासणी, तसेच विद्यापीठाकडून चालवण्यात येणारी किंवा विद्यापीठाने मान्यता दिलेली कोणतीही परिसंस्था, संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालय, सभागृह किंवा वसतिगृह यांची तपासणी आणि विद्यापीठाच्या परीक्षांची विद्यापीठाकडून किंवा त्याच्यावतीने करण्यात येणारे अध्यापन किंवा इतर कामकाज यांची तपासणी करवून घेण्याचा आणि विद्यापीठ, संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे प्रशासन किंवा वित्तव्यवस्था यांच्याशी संबंधित कोणत्याही बाबींची त्याच पद्धतीने चौकशी करवून घेण्याचा हक्क असेल :

परंतु, कुलगुरू संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या बाबतीत अशा संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाला अशा प्रकारे, तपासणी करण्याची किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करण्याच्या त्याच्या उद्देशाबद्दल नोटीस देईल :

परंतु, आणखी असे की, व्यवस्थापनाला, अशी तपासणी किंवा चौकशी होण्यापूर्वी, त्यास आवश्यक वाटेल, असे अभिवेदन कुलगुरूकडे करण्याचा हक्क असेल ;

(ख) असे कोणतेही अभिवेदन करण्यात आले असल्यास, ते विचारात घेतल्यानंतर कुलगुरूला अशी तपासणी किंवा चौकशी करवून घेता येईल किंवा ती चौकशी सोडून देता येईल ;

(ग) व्यवस्थापनाच्या बाबतीत, तपासणी किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करण्यात आली असेल त्यावेळी, व्यवस्थापनाला एक प्रतिनिधी नियुक्त करण्याचा हक्क असेल आणि त्या प्रतिनिधीला अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्याचा व आपले म्हणणे मांडण्याचा हक्क असेल ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ११(ब) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ११(क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(घ) ही तपासणी किंवा चौकशी विद्यापीठाचे विशेषाधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही महाविद्यालयाच्या संबंधात किंवा परिसंस्थेच्या संबंधात असेल तर, कुलगुरू, अशा तपासणीचा किंवा चौकशीचा निष्कर्ष व्यवस्थापनाला कळवू शकेल ;

(ङ) व्यवस्थापन, त्याने करण्याचे योजलेली किंवा केलेली अशी कोणतीही कारवाई असेल तर, त्याबाबत कुलगुरूला कळवील ;

(च) व्यवस्थापनाने, कुलगुरूकडून निश्चित करण्यात आलेल्या मुदतीत, त्याचे समाधान होईल अशी कार्यवाही केली नाही तर, कुलगुरूचा व्यवस्थापनाने सादर केलेला तपासणी किंवा चौकशी अहवाल आणि स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारार्थ व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवील.

विद्याशाखांचे अधिष्ठाते.

**१५.** (१) प्रत्येक विद्याशाखेसाठी एक अधिष्ठाता असेल, तो त्याच्या विद्याशाखेचा शैक्षणिक विकास, अध्यापनाचा व संशोधनाचा दर्जा राखणे व त्याच्या विद्याशाखेतील अध्यापकांचे प्रशिक्षण यासंबंधात विद्यापरिषदेकडून मान्यता देण्यात आलेल्या विद्याविषयक धोरणांची अंमलबजावणी करण्याशी संबंधित व त्यास जबाबदार असलेला विद्यापीठाचा विद्याविषयक अधिकारी असेल.

[१][(२) (क) विद्याशाखेचे सदस्य आपल्यामधूनच विद्याशाखेच्या अधिष्ठात्याची निवड करतील आणि तो, लागोपाठाच्या दुसऱ्या मुदतीसाठी निवडून येण्यास पात्र असणार नाही.

(ख) विद्याशाखेवर, विद्यापरिषदेने नेमलेला कोणताही सदस्य, अधिष्ठाता पदाची निवडणूक लढविण्यास पात्र असणार नाही.]

(३) अधिष्ठाता, ज्या ज्या वेळी आवश्यक असेल त्या त्या वेळी, कुलगुरूशी विचारविनिमय करून, विद्याशाखेच्या बैठकी बोलावील व त्यांचे अध्यक्षपद स्वीकारील. तो विद्याशाखेची धोरणे व तिचा विकासविषयक कार्यक्रम तयार करील आणि तो कार्यक्रम योग्य प्राधिकरणांकडे विचारार्थ पाठवील.

(४) अधिष्ठाता, विद्याशाखेच्या शैक्षणिक विकासासाठी जबाबदार असेल आणि तो व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ आणि परीक्षा मंडळे यांच्या, त्याच्या विद्याशाखेच्या संबंधातील अशा निर्णयांची आणि विद्याशाखेच्या निर्णयांची व त्यांच्या कक्षेतील अभ्यास मंडळाच्या निर्णयांची योग्य अंमलबजावणी करण्यात येत असल्याबद्दल खात्री करून घेईल.

(५) कुलगुरूचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण यांस अधीन राहून, अधिष्ठाता, त्याला आवश्यक वाटेल असा सल्ला घेतल्यानंतर, नावनोंदणी, पात्रता, स्थलांतर, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या किंवा नादाऱ्या, सत्रभाग मंजूर करणे, विद्यापीठाच्या परीक्षांना प्रवेश यांसंबंधातील विद्यार्थ्यांच्या तक्रारी यांवर निर्णय देईल.

(६) अधिष्ठाता, विद्यापरिषदेकडून निदेश देण्यात आल्या नंतरच विद्यापीठ विभाग, संलग्न किंवा संचालित महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी त्यांच्या विद्याशाखेतील कोणत्याही शैक्षणिक कार्यक्रमाच्या संबंधात केलेल्या कोणत्याही गैरव्यवहाराची चौकशी करील व त्याचे निष्कर्ष विद्यापरिषदेला कळविल.

(७) अधिष्ठाता, विद्यापरिषदेला सादर करण्यासाठी त्याच्या विद्याशाखेतील अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या व इतर विशेषोपाधी देणे यासंबंधातील प्रस्ताव तयार करील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १२ अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

**१६.** (१)महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचा संचालक [१][पंधरा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असणाऱ्या,] विद्यापीठाच्या, परिसंस्थांच्या किंवा विभागाच्या प्राध्यापकांमधून किंवा प्राचार्यांमधून नामनिर्देशित करण्यात येईल. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(२) संचालक,—

(क) पदव्युत्तर, अध्यापन, संशोधन व विस्तार कार्यक्रम आणि विद्यापीठाचे सहभागात्मक कार्यक्रम यांसह विद्याविषयक विकास कार्यक्रमांसाठी मुख्य विद्याविषयक नियोजन व विद्याविषयक लेखापरीक्षा अधिकारी असेल ;

(ख) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचा सचिव असेल. [२][मंडळ निदेश देईल त्याप्रमाणे, तसेच तक्रारी आल्यावर, स्वत:हून] विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, मान्यताप्राप्त परिसंस्था, पदव्युत्तर केंद्रे व संलग्न महाविद्यालये यांची विद्याविषयक लेखापरीक्षा करील ;

(ग) विद्यापीठ व त्याची [३][***] महाविद्यालये यांच्या विद्याविषयक कार्यक्रमांतील दीर्घ मुदतीच्या व अल्प मुदतीच्या विकास योजनांसंबंधात मंडळाने घेतलेल्या निर्णयांची कार्यवाही व अंमलबजावणी, संबंधित प्राधिकरणे, मंडळे, समित्या आणि अधिकारी यांच्याकडून केली जात आहे, याची खात्री करून घेण्यास जबाबदार असेल ;

(घ) विद्यापीठाच्या सहभागात्मक व विकासविषयक कार्यक्रमांसाठी निधी उभारण्याच्या संबंधात बाह्य वित्तव्यवस्था संस्थांशी संपर्क साधणारा मुख्य अधिकारी असेल व तो उचित वापरावर संनियंत्रण ठेवील ;

(ङ) विद्यापीठ, महाविद्यालये व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंस्था आणि वैज्ञानिक, औद्योगिक व वाणिज्यिक संघटना यांच्यामधील सहयोग वृद्धिंगत करण्यासाठी व त्यास चालना देण्यासाठी संपर्क साधण्यास जबाबदार असेल ;

(च) विविध विकासविषयक व सहभागात्मक कार्यक्रमांसंबंधात साध्य केलेल्या प्रगतीबाबत कुलगुरूला वार्षिक अहवाल सादर करण्यास जबाबदार असेल आणि कुलगुरू, तो अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवील.

[४][(३) संचालकाचा पदावधी, कुलगुरूच्या पदावधी बरोबरच समाप्त होणे किंवा त्यांचे नियत सेवावधि वय पूर्ण होणे, यांपैकी जी घटना अगोदर घडेल, तोपर्यंत असेल.]

**१७.** (१) नियुक्तीच्या प्रयोजनासाठी घटित करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून, कुलगुरू, कुलसचिवाची नियुक्ती करील : कुलचसचिव.

[५][परंतु, पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपर्यंत ते पद भरले गेले नाही तर, राज्य शासन एकावेळी एक वर्षापेक्षा जास्त असणार नाही आणि एकूण तीन वर्षांपेक्षा जास्त असणार

---

[१] सन ३००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १३(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३(क) अन्वये “संलग्न” हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १३(क) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १४(अ) अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

नाही किंवा कुलगुरूकडून, नवीन कुलसचिवाची यथोचितरित्या नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तेवढ्या कालावधीसाठी, कुलसचिवाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्याप्रमाणे अर्हता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करील.]

(२) कुलसचिव हा, विद्यापीठाचा मुख्य प्रशासनिक अधिकारी असेल. तो पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल व तो, थेट कुलगुरूचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण यांखाली काम करील.

(३) कुलसचिवाची नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात येईल तो [१][पाच वर्षांच्या पुढील फक्त एकाच मुदतीसाठी] पुर्ननियुक्तीस पात्र असेल. कुलसचिवाची निवड करण्याच्या प्रयोजनासाठी असलेल्या अर्हता व लागणारा अनुभव हा, विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्धारित केल्याप्रमाणे व राज्य शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे असेल.

(४) [२][***] आजाराच्या कारणामुळे, अनुपस्थित असल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे कुलसचिव सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीत काळ आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत, कुलगुरू [३][कुलसचिव पदावर रूजू होईपर्यंत] कुलसचिव म्हणून काम करण्यासाठी योग्य त्या व्यक्तीची नियुक्ती करील.

(५) कुलसचिव हा, अधिसभेच्या, व्यवस्थापन परिषदेचा, विद्यापरिषदेचा व या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विहित करण्यात आलेल्या अशा इतर प्राधिकरणांचा, मंडळांचा व समित्यांचा सचिव म्हणून काम पाहील.

(६) कुलसचिव हा, अध्यापक दीर्घ सुटी नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्ग व सहायक कुलसचिव व समतुल्य दर्जाची किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाची पदे धारण करणारे इतर अधिकारी या व्यतिरिक्त विद्यापीठाच्या अन्य कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या व शिस्तभंगविषयक प्राधिकारी असेल. कुलसचिवाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा निर्णय त्यास कळल्यापासून तीस दिवसांच्या आत कुलगुरूकडे अपील दाखल करता येईल.

(७) विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या निर्णयांच्या अधीन राहून, कुलसचिवास, विद्यापीठाच्या वतीने करार करण्याचा, दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्याचा व अभिलेख अधिप्रमाणित करण्याचा अधिकार असेल.

(८) विद्यापीठाचे अभिलेख, सामाईक शिक्क्या आणि व्यवस्थापन परिषद त्याच्याकडे सुपूर्द करील अशा विद्यापीठाची इतर मालमत्ता कुलसचिवाच्या अभिरक्षेत असेल.

(९) कुलसचिव, कुलगुरूने मान्यता दिलेल्या अशा कार्यक्रमानुसार निवडणुका घेईल.

(१०) प्राधिकरणे, मंडळे किंवा समित्या यांच्याकडून वेळोवेळी मान्यता देण्यात येईल असे परिनियम, आदेश व विनियम यांचे एक निदेश पुस्तक कुलसचिव तयार करील व ती अद्ययावत ठेवील आणि प्राधिकरणांचे सर्व संबंधित सदस्य व विद्यापीठाचे अधिकारी यांना ती उपलब्ध करून देईल.

(११) प्रशासनाच्या सुधारण्याच्या संबंधातील तक्रारी व सूचना कुलसचिवे स्वीकारील व त्यांवर योग्य कार्यवाही करण्यासाठी त्यावर विचार करील.

(१२) कुलसचिव, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये वेळोवेळी विहित केलेल्या किंवा कुलगुरूकडून त्यास नेमून दिलेल्या अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या १४(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १४(क)(एक) अन्वये "कुलसचिवाचे पद रिकामे होईल त्याबाबतीत, किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १४(क)(दोन) अन्वये "कुलसचिव पदावर रुजू होईतोपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१८.** (१) (क) परीक्षा नियंत्रकाची नियुक्ती, त्या प्रयोजनासाठी घटित केलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून कुलगुरूकडून करण्यात येईल : परीक्षा नियंत्रक.

[1][परंतु, पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपर्यंत ते पद भरले गेले नाही तर, राज्य शासन एकावेळी एका वर्षापेक्षा जास्त असणार नाही व एकूण तीन वर्षांपेक्षा जास्त होणार नाही किंवा कुलगुरूकडून नवीन परीक्षा नियंत्रकाची यथोचितरित्या नियुक्ती होईपर्यंत, यांपैकी जे आधी घडेल तेवढ्या कालावधीकरिता परीक्षा नियंत्रकाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी विहित अर्हता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करील ;]

(ख) परीक्षा नियंत्रक हा, विद्यापीठाच्या परीक्षा व चाचणी परीक्षा घेणे व त्यांचे निकाल जाहीर करणे या गोष्टींचा मुख्य प्रभारी अधिकारी असेल. तो, परीक्षा मंडळाच्या अधीक्षणाखाली, निदेशनाखाली व मार्गदर्शनाखाली आपली कामे पार पाडील. तो, विद्यापीठाच्या पूर्णवेळ वेतनी अधिकारी असेल व थेट कुलगुरूच्या [2][निदेशनाखाली आणि नियंत्रणाखाली] काम करील ;

(ग) त्याची नियुक्ती पाच वर्षांच्या मुदतीसाठी करण्यात येईल व तो [3][पाच वर्षांच्या पुढील फक्त एकाच मुदतीसाठी] पुनर्नियुक्तीस पात्र असेल. नियंत्रकाची निवड करण्याच्या प्रयोजनासाठी लागणारी अर्हता व अनुभव हा विहित करण्यात आल्याप्रमाणे असेल.

(२) नियंत्रक हा, परीक्षा मंडळ व प्राश्निक, परीक्षक व नियामक यांच्या नियुक्तीसाठी कलम ३२(५)(अ) अन्वये घटित करण्यात आलेल्या समित्यांव्यतिरिक्त, मंडळाकडून नियुक्त करण्यात आलेल्या इतर समित्या यांचा सदस्य-सचिव असेल. त्यांच्या निर्णयांची त्वरित व योग्य अंमलबजावणी करण्यात तो जबाबदार असेल.

(३) पोट-कलम (१)(ब) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, विद्यापीठाच्या परीक्षा व चाचणी परीक्षा योग्यरित्या घेतल्या जाव्यात यासाठी, त्यांचे निकाल जाहीर करण्यासाठी व त्यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्यासाठी कुलसचिव जबाबदार असेल. पुढील गोष्टी करण्यास तो जबाबदरी असेल :—

(क) परीक्षांचे वेळापत्रक वेळीच तयार करून ते जाहीर करणे ;

(ख) प्रश्नपत्रिका छापून घेण्याची व्यवस्था करणे ;

(ग) परीक्षेला बसलेल्या उमेदवारांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन करवून घेण्याची आणि निकालासंबंधातील कार्यवाही करण्याची व्यवस्था करणे ;

(घ) परीक्षांचे व इतर चाचणी परीक्षांचे निकाल वेळेवर घोषित केले जावेत यासाठी व्यवस्था करणे ;

(ङ) गैरप्रकारांच्या प्रसंगी किंवा परिस्थितीची तशी गरज असेल तर, परीक्षा अंशतः पुढे ढकलणे किंवा पूर्णतः रद्द करणे व असे गैरप्रकार केल्याचा ज्यांच्यावर आरोप असेल अशा कोणत्याही व्यक्तीविरूद्ध किंवा व्यक्तीच्या गटाविरूद्ध किंवा महाविद्यालयाविरुद्ध किंवा परिसंस्थेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे किंवा कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाही सुरू करणे ;

(च) आवश्यक असेल त्याबाबतीत, परीक्षांशी संबंधित असलेले व परीक्षांच्या बाबतीत गैरप्रकारांबद्दल अपराधी असल्याचे आढळून आलेले परीक्षेतील उमेदवार, प्राश्निक, परीक्षक, नियामक किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(छ) विद्यापीठाच्या परीक्षांच्या निकालांचे वेळोवेळी पुनर्विलोकन करणे व त्यासंबंधातील अहवाल विद्यापरिषदेकडे पाठविणे ;

(४) नियंत्रक परीक्षा मंडळाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील किंवा त्याला नेमून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

---

[1] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १५(अ) अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १५(ब) अन्वये "अधीक्षणाखाली" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १५(क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

ग्रंथपाल. **१९.** (१) (क) जेव्हा एखाद्या विद्यापीठात ग्रंथालयशास्त्र विभाग असेल त्याबाबतीत, प्रपाठकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला त्या विभागाचा प्रमुख हा, पदपरत्वे, ग्रंथपाल म्हणून काम करील.

(ख) जेव्हा एखाद्या विद्यापीठात ग्रंथालयशास्त्र विभाग नसेल किंवा त्या विभाग प्रमुखाच्या दर्जा प्रपाठकाच्या दर्जाहून कमी असेल त्याबाबतीत, ग्रंथपाल हा, विद्यापीठाच्या ग्रंथालयाचा प्रमुख अधिकारी असेल. तो विद्यापीठाच्या पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल, तो थेट कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील.

(२) ग्रंथपालाची नियुक्ती, त्या प्रयोजनासाठी घटित करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरूकडून करण्यात येईल. त्याच्या अर्हता, वित्तलब्धि व सेवेच्या अटी व शर्ती या विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे व राज्य शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे असतील.

(३) जेव्हा ग्रंथपालाचे पद रिक्त झाले असेल किंवा ग्रंथपाल आजारी असल्यामुळे किंवा गैरहजर असल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत, कुलगुरू, या प्रयोजनार्थ नियुक्त करील अशा व्यक्तीकडून, सहा महिन्यांहून अधिक होणार नाही. एवढ्या कालावधीसाठी किंवा नवीन ग्रंथपालाची रीतसर नेमणूक होईपर्यंत किंवा ग्रंथपाल कामावर परत रूजू होईपर्यंत,—यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत—अशी कर्तव्ये पार पाडली जातील.

(४) ग्रंथपाल हा, विद्यापीठ ग्रंथालयाचा किंवा ग्रंथालयांचा विकास, आधुनिकीकरण, निगा व व्यवस्थापन करण्यासाठी जबाबदार असेल. तसेच, कोणत्याही विद्यापीठ ग्रंथालयशास्त्र विभाग असल्यास, त्या ग्रंथालयशास्त्र विभागातील ग्रंथालयशास्त्रातील अध्यापन, संशोधन आणि व्यावसायिक कौशल्य यांचा दर्जा काय राखण्यासाठी जबाबदार असेल, आणि याबाबतीत तो, संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या ग्रंथपालांना किंवा ग्रंथालयांना आपले सहाय्य आणि सल्ला देऊ करील.

(५) ग्रंथपाल, सर्व पुस्तके, नियतकालिके, हस्तलिखिते, जर्नल्स व ग्रंथालय साधनसामग्री यांचा परिरक्षक असेल आणि कोणत्याही नियमबाह्य गोष्टी घडत नसल्याची आणि कोणतीही पुस्तके, नियतकालिके, हस्तलिखिते, जर्नल्स आणि ग्रंथालय सामग्री गहाळ होत नसल्याची खात्री करून घेईल, तो, सर्व संग्रहाची नियतकालिक पडताळणी करवून घेईल. विद्यापीठ ग्रंथालयाचा किंवा ग्रंथालयांचा विकासविषयक खर्च भागवण्यासाठी जादा साधनसंपत्ती उपलब्ध करून घेण्याच्या बाबींसह, सर्व बाबींवर विद्यापीठाला सल्ला देण्याचा त्याला हक्क असेल.

(६) ग्रंथपाल, ग्रंथालय समितीचा सदस्य-सचिव असेल आणि ग्रंथालय समितीने घेतलेल्या निर्णयाची उचितरित्या अंमलबजावणी होत असल्याची खात्री करून घेईल.

वित्त व लेखा अधिकारी. **२०.** (१) (क) वित्त व लेखा अधिकारी हा, विद्यापीठाचा प्रमुख वित्त, लेखा व लेखापरीक्षा अधिकारी असेल. तो पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल व थेट कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील.

(ख) [१][वित्त व लेखा अधिकाऱ्याची] नियुक्ती, व्यस्थापन परिषदेकडून एकतर नामनिर्देशनाद्वारे किंवा भारत सरकार अथवा राज्य शासन यांच्याकडून एखाद्या योग्य अधिकाऱ्याच्या सेवा प्रतिनियुक्तीवर घेऊन करण्यात येईल.

[२][(ग) वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियुक्ती नामनिर्देशनाद्वारे झाली असल्यास पाच वर्षांच्या कालावधीकरिता असेल आणि तो पाच वर्षांच्या पुढील फक्त एकाच मुदतीसाठी पुनर्नियुक्तीकरिता पात्र असेल.]

(२) वित्त व लेखा अधिकारी हा, वित्त व लेखा समितीचा सदस्य-सचिव असेल. त्याला व्यवस्थापन परिषदेच्या पैशाशी संबंध असणाऱ्या बाबींसंबंधातील कामकाजाला उपस्थित राहण्याचा, त्यावेळी

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १६ (अ)(एक) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १६(अ)(दोन) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

बोलण्याचा व अन्य प्रकारे त्यात भाग घेण्याचा अधिकार असेल, परंतु, मतदानाचा अधिकार असणार नाही.

(३) वित्त व लेखा अधिकारी हा, वित्त व लेखा समितीच्या बैठकीची आणि वित्त व लेखा समितीने नियुक्त केलेल्या समित्यांच्या बैठकींची कार्यवृत्ते ठेवील.

(४) वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा समितीला आणि व्यवस्थापन परिषदेला वार्षिक अर्थसंकल्प, लेख्यांचे विवरण व लेखापरीक्षा अहवाल सादर करण्यास जबाबदार असेल.

(५) वित्त व लेखा अधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) विद्यापीठाच्या निधींवर सर्वसाधारण देखरेख ठेवणे व विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीसंबंधात कुलगुरूला सल्ला देणे ;

(ख) विद्यापीठाच्या उद्दिष्टांपैकी कोणत्याही उद्दिष्टांच्या पृष्ठ्यर्थ, विश्वस्तव्यवस्था व दान करण्यात आलेली मालमत्ता यांसह निधी, मालमत्ता व गुंतवणुका धारण करणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(ग) वर्षातील आवर्ती व अनावर्ती खर्च विद्यापीठाने त्याबाबतीत निश्चित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक होत नाही, तसेच नेमून दिलेल्या रकमा ज्यासाठी पैसे मंजूर करण्यात किंवा नेमून देण्यात आले असतील त्याच प्रयोजनांसाठी खर्च करण्यात येत आहेत याबद्दल खात्री करून घेणे ;

(घ) रोख रक्कम व बँकेतील शिलका व गुंतवणुका यांच्या स्थितीवर लक्ष ठेवणे ;

(ङ) उत्पन्नाच्या वसुलीच्या प्रगतीवर लक्ष ठेवील आणि वसुली करण्यासाठी अनुसरावयाच्या पद्धतींबाबत कुलगुरूला सल्ला देणे ;

(च) विद्यापीठाच्या लेख्यांची नियमितपणे परीक्षा करून घेणे ;

(छ) इमारती, जमीन, साधनसामग्री व यंत्रसामग्री यांच्या नोंदवह्या अद्यायावत ठेवल्या जात आहेत ; तसेच विद्यापीठाची सर्व कार्यालये, [१][संचालित महाविद्यालये], कार्यशाळा व भांडारे यांमधील साधनसामग्री व इतर वापरले जाणारे साहित्या यांच्या साठ्याची नियमितपणे पडताळणी केली जात आहे, याबद्दल खात्री करून घेणे ;

(ज) विद्यापीठाच्या कोणत्याबी अध्यापक सदस्याकडून अनधिकृत खर्च किंवा इतर वित्तीय अनियमितता याबद्दल स्पष्टीकरण मागण्यात यावे असे कुलगुरूला सुचविणे ;

(झ) कोणत्याही अध्यापकेतर सदस्याकडून कोणत्याही विशिष्ट प्रकरणातील अनधिकृत खर्च किंवा नियमबाह्य गोष्टी यांबद्दल स्पष्टीकरण मागण्यात यावे असे कुलगुरूला सुचविणे व कसूरदार व्यक्तींविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करणे ;

(ञ) आपल्या वित्तीय जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल, अशी कोणतीही माहिती व विवरणे कोणत्याही कार्यालयाकडून, केंद्राकडून, प्रयोगशाळेकडून, [२][संचालित महाविद्यालयाकडून], विद्यापीठ विभागाकडून किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थेकडून मागवून घेणे ; आणि

(ट) कुलगुरूकडून त्यास नेमून देण्यात आलेल्या किंवा अध्यादेशांद्वारे विहित करण्यात आलेल्या अशा इतर अधिकारांचा वापर करणे व इतर कर्तव्ये, तसेच अशी इतर वित्तविषयक कामे पार पाडणे.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १६(ब)(एक) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १६(ब)(दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

विद्यार्थी कल्याण संचालक.

**२१.** (१) विद्यार्थी कल्याण संचालकाचे नामनिर्देशन कुलगुरूकडून अध्यापकांमधून करण्यात येईल. त्याच्या वित्तलब्धी, सेवेच्या अटी व शर्ती आणि अधिकार व कर्तव्ये अध्यादेशांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. तो थेट कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील.

(ख) संचालक दोन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील व तो पुनर्नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल.

संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा.

**२२.** (१) प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा संचालक हा, पूर्णकालिक वेतनी विद्याविषयक अधिकारी असेल व निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरू त्याची नियुक्ती करील. या निवड समितीमध्ये पूढील व्यक्तीचा समावेश असेल,—

(क) कुलगुरू—अध्यक्ष ;

[१][ * * ** * ]

(ग) व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले, त्या क्षेत्रातील दोन तज्ञ ;

(घ) प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा मंडळाच्या [२][दोन नामनिर्देशित व्यक्ती.]

(२) संचालकाच्या वित्तलब्धी व सेवेच्या अटी व शर्ती अध्यादेशांद्वारे विहित करण्यात येतील ;

(३) संचालक हा, प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा मंडळाचा सदस्य-सचिव असेल व मंडळाच्या सर्वकष मार्गदर्शनाखाली व सल्ल्यानुसार, विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण, निरंतर शिक्षण व विस्तार कार्यक्रम यांचे संयोजन व समन्वय करण्यास तो जबाबदार असेल. मंडळाच्या मान्यतेसाठी व व्यवस्थापन परिषदेकडे सादर करण्यासाठी, तो, विद्यापीठाचे प्रौढ व निरंतर शिक्षण कार्यक्रम व विस्तार सेवा यांच्या संबंधात वार्षिक अहवाल तयार करील.

(४) संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा, हा, थेट कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील.

विद्यापीठाचे अधिकारी, त्यांच्या प्राधिकरणाचे, संस्थांचे सदस्य आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे.

**२३.** विद्यापीठाचे सर्व वेतनी अधिकारी, त्याच्या प्राधिकरणांचे, समित्यांचे किंवा संस्थांचे सदस्य, त्यांचे अध्यापक आणि अन्य कर्मचारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण चार

## **विद्यापीठाची प्राधिकरणे**

विद्यापीठाची प्राधिकरणे.

**२४.** विद्यापीठाची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील :—

(१) अधिसभा,

(२) व्यवस्थापन परिषद,

(३) विद्यापरिषद,

(४) विद्याशाखा,

(५) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १७(अ) अन्वये खंड (ख) वगळण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १७(ब) अन्वये “एक नामनिर्देशित व्यक्ती” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(५क) विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ],

(६) अभ्यास मंडळ,

(७) आंतरज्ञान शाखा अभ्यास मंडळ,

(८) परीक्षा मंडळ,

(९) प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा मंडळ,

(१०) विद्यार्थी परिषद,

(११) परिनियमांद्वारे विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून संबोधण्यात येतील अशा विद्यापीठाच्या इतर संस्था.

[२][**२४क.** या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कुलपतीशी विचारविनिमय करून, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती, राज्य शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील.] विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा शासनाचा अधिकार.

**२५.** (१) अधिसभा ही, सर्व वित्तीय अंदाजाकरिता व अर्थसंकल्पीय विनियोजनांकरिता व विद्यापीठाला विद्यमान भविष्यातील शैक्षणिक कार्यक्रमांच्या बाबतीत सामाजिक अपेक्षांची माहिती देण्याकरिता प्रमुख प्राधिकरण असेल. अधिसभा

(२) अधिसभेमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल, ते असे :—

(क) कुलपती ;

(ख) कुलगुरू ;

(ग) प्रतिकुलगुरू, कोणताही असल्यास ;

(घ) संचालक, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली सहसंचालकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती ;

(ङ) संचालक, तंत्र शिक्षण ;

(च) संचालक, वैद्यकीय शिक्षण ;

(छ) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ ;

(ज) विद्यार्थी कल्याण संचालक ;

(झ) विद्यापीठ ग्रंथालयाचा ग्रंथपाल ;

(ञ) विहित करण्यात येईल त्यानुसार आळीपाळीने विद्यापीठाच्या विद्याविषयक सेवा युनिटांचा एक प्रमुख ;

(ट) संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा ;

[३][(ठ) प्राचार्यांनी मिळून बनलेल्या निर्वाचक गणाद्वारे निवडून दिलेले संलग्न, संचालित आणि स्वायत्त महाविद्यालयांचे अठरा प्राचार्य, त्यांपैकी दोनपेक्षा कमी असणार नाही. अशा महिला असतील व किमान एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जनजातीची किंवा विमुक्त जातीची भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची, चक्रीय आरक्षणाप्रमाणे व्यक्ती असेल ;]

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १८ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ११ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १९(अ) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

(ड) व्यवस्थापनाचा सभापती किंवा अध्यक्ष किंवा व्यवस्थापन शिफारस करील असा व्यवस्थापनाचा प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या निर्वाचक गणआने निवडून दिलेले, संलग्न महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या व्यवस्थापनाचे [१][आठ] प्रतिनिधी व्यवस्थापन एक किंवा अधिक महाविद्यालये किंवा परिसंस्था चालवित असतील त्याबाबतीत अशा व्यवस्थापनाचा केवळ एक सभापती किंवा अध्यक्ष किंवा प्रतिनिधी निर्वाचक गणाचा सदस्य राहील ;

[२][परंतु, आठ प्रतिनिधींपैकी, दोन महिला प्रतिनिधी असतील आणि एक अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजातीची किंवा विमुक्त जातीची/भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची, चक्रीय आरक्षणाप्रमाणे व्यक्ती असेल ;]

(ढ) विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष आणि सचिव ;

(ण) कुलसचिव, हा अधिसभेचा सचिव म्हणून काम पाहील ;

(त) विद्यापीठ विभागाचा किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थेचा प्रमुख किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य किंवा प्रमुख यांच्या व्यतिरिक्त, अध्यापकांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले व अध्यापनाचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेले [३][यापैकी तीन महिला असतील आणि दोन अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जनजातीच्या किंवा विमुक्त जातीच्या/भटक्या जमातीच्या किंवा इतर मागासवर्गाच्या, चक्रीय आरक्षणाप्रमाणे व्यक्ती असतील.] या जागा शाखानिहाय प्रमाणानुसार नेमून दिल्या जातील. परंतु, त्यासाठी मतदान मात्र सामाईक असेल ;

[४][(थ) महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले महाराष्ट्र विधानसभेचे दोन सदस्य आणि महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींनी नामनिर्देशित केलेले महाराष्ट्र विधानपरिषदेचे दोन सदस्य ;]

[५][(द) कलम ९९ च्या पोट-कलम (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, स्थापन करण्यात आलेल्या निर्वाचन गणाने निवडून दिलेले, विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांपैकी दहा सदस्य, यांपैकी एक महिला सदस्य असेल व अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यांच्या प्रवर्गातील प्रत्येकी एक सदस्य असेल :

परंतु, निवडून द्यावयाचे नोंदणीकृत पदवीधर हे अध्यापक (नियमित असलेले किंवा कंत्राटी तत्त्वावर घेतलेले—मग त्यांचा अध्यापकीय अनुभव काहीही असो), प्राचार्य, विभाग प्रमुख, व्यवस्थापन या प्रवर्गांमधील किंवा या पोट-कलमामध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रवर्गांमध्ये मोडणारे नसतील अशा पदवीधरांचा समावेश होणार नाही ;]

(ध) कुलपतीने नामनिर्देशित केलेला [६][सात] व्यक्ती, यामध्ये विख्यात शिक्षण तज्ज्ञ, विद्याव्यासंगी, सामाजिक कार्यकर्ते, महिला अल्पसंख्यांकामधील मागास जातीतील आणि उद्योग व व्यवसाय क्षेत्रातील व्यक्ती यांचा समावेश होईल ;

(न) मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रमुखांमधून कुलपतीने नामनिर्देशित केलेल्या [७][दोन] व्यक्ती ;

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम १९(ब)(एक) अन्वये “पाच” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १९(ब)(दोन) अन्वये हे परंतुक साविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १९(क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन २००५ चा अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ७ अन्वये हे खंड दाखल करण्यात आला.

[५] सन २००० चा अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १९(ड) अन्वये हे खंड दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १९(इ) अन्वये “सहा” ऐवजी “साता” हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १९(फ) अन्वये “तीन” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(प) कुलगुरूने नामनिर्देशित केलेल्या, प्रपाठकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या, विद्यापीठ विभागांच्या किंवा विद्यापीठ परिसंस्थांच्या प्रमुखांमधील तीन व्यक्ती ;

(फ) विद्याशाखांचे अधिष्ठाते ;

(ब) कुलगुरूने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती, यांपैकी एक व्यक्ती विद्यापीठाची कर्मचारी असेल व दुसरी व्यक्ती संलग्न महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या कर्मचाऱ्यांमधील असेल, परंतु ती, विद्यापीठ अध्यापक, अध्यापक, कुलसचिव, उप कुलसचिव, सहायक कुलसचिव यांच्यापैकी असणार नाही ;

(भ) कुलपतीने नामनिर्देशित केलेल्या, देणगीदारांच्या किंवा देणगी देणाऱ्या संघटनांचा एक प्रतिनिधी ;

[१][(म) स्नातकोत्तर अध्यापकांनी आपल्यामधून निवडून दिलेले व स्नातकोत्तर स्तरावर अध्यापनाचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेले पाच स्नातकोत्तर अध्यापक, यांपैकी दोन महिला असतील आणि एक अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजातीची किंवा विमुक्त जातीची/भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची, चक्रीय आरक्षणाप्रमाणे व्यक्ती असेल ;

(य) कुलगुरूने एक वर्षाच्या कालावधीसाठी, आळीपाळीने नामनिर्देशित केलेला विद्यापीठ क्षेत्रातील, जिल्हा परिषदांच्या शिक्षण समित्यांचा एक प्रतिनिधी ;

(कक) कुलगुरूने, एक वर्षाच्या कालावधीसाठी आळीपाळीने नामनिर्देशित केलेला, विद्यापीठ क्षेत्रातील नगरपालिकेचा किंवा महानगरपालिकेचा एक प्रतिनिधी].

(३) सर्वसाधारणपणे, कुलपती अधिसभेचा अध्यक्ष राहील व त्यांच्या अनुपस्थितीत कुलगुरू अध्यक्ष राहील.

(४) वर्षातून किमान दोन वेळा कुलपती निश्चित करील, त्या दिनांकास अधिसभेची बैठक बोलावण्यात येईल. या बैठकींपैकी एक वार्षिक बैठक असेल.

अधिसभेची कार्ये व कर्तव्ये.

**२६.** (१) अधिसभा तिच्या वार्षिक सभेमध्ये पुढील कामकाज चालवील :—

(क) चालू विद्याविषयक कार्यक्रम व सहयोगी कार्यक्रम यांचे पुनरीक्षण करणे ;

(ख) उच्च शिक्षणातील सामाजिक गरजांशी सुसंगत असे नवीन विद्याविषायक कार्यक्रम सुचविणे ;

(ग) विद्यापीठाची सुधारणा व विकास यांसाठी उपाय सुचविणे ;

(घ) नवीन पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करण्याबाबत सुचविणे ; आणि

(ङ) व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीवरून सन्मान्य पदव्या किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे ;

(२) अधिसभा, विद्यापीठाचे [२][वार्षिक वित्तीय अंदाज (अर्थसंकल्प),] वार्षिक अहवाल, लेखे व लेखापरीक्षा अहवाल स्वीकारील, त्यांवर चर्चा करील व ते मान्य करील.

(३) अधिसभा, विद्यापीठाची स्थूल धोरणे आणि कार्यक्रम यांचे पुनरीक्षण करील आणि त्यांची सुधारणा व विकास यांसाठी उपाय सूचविल.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १९(ग) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

व्यवस्थापन परिषद. **२७.** (१) व्यवस्थापन परिषद, विद्यापीठाच्या व्यवहारांच्या प्रशासनासाठी परिनियम तयार करणे व ते मान्यतेसाठी अधिसभेकडे पाठवणे व आदेश तयार करणे, यांकरिता प्रमुख कार्यकारी प्राधिकरण असेल आणि ती, अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे विनिर्देशपूर्वक नेमून दिली नसतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील. या परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) कुलगुरू, सभापती ;

(ख) प्रतिकुलगुरू, कोणताही असल्यास ;

(ग) [१][अधिसभेने, अधिष्ठात्यांमधून निवडून दिलेला] एक अधिष्ठाता ;

(घ) कुलपतीने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(ङ) सचिव, उच्च शिक्षण किंवा त्यांने नामनिर्देशित केलेली, उपसचिवांच्या अथवा सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती ;

(च) तंत्र शिक्षण संचालक किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, सहसंचालकांपेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती ;

(छ) संचालक, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, सहसंचालक, उच्च शिक्षण याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती ;

(ज) अधिसभेने विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख किंवा संचालक यांच्यामधून नामनिर्देशित केलेला एक प्रमुख किंवा संचालक ;

(झ) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ ;

(ञ) अधिसभेने, त्या अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्यामधून [२][निवडलेले दोन प्राचार्य] [३][यांपैकी एक प्राचार्य अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाति किंवा विमुक्त जाती/भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गातील चक्रिय आरक्षणाप्रमाणे असेल] ;

(ट) अधिसभेने, त्या अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापकांमधून निवडलेला, पदव्युत्तर अध्यापनाचा दहा वर्षांचा अनुभव असलेला विद्यापीठ विभागाचा किंवा विद्यापीठ परिसंस्थेचा एक अध्यापक,—तो विद्यापीठ विभागाचा किंवा विद्यापीठ परिसंस्थेचा प्रमुख किंवा संचालक असणार नाही :

[४][परंतु, विद्यापीठ विभागाचा किंवा विद्यापीठ परिसंस्थेचा दहा वर्षांचा पदव्युत्तर अध्यापनाचा अनुभव असलेला अध्यापक उपलब्ध नसल्यास त्यापेक्षा कमी अनुभव असलेल्या परंतु, कोणत्याही परिस्थितीत पाच वर्षांपेक्षा कमी नाही एवढा पदव्युत्तर अध्यापनाचा अनुभव असलेल्या विद्यापीठ विभागाचा किंवा विद्यापीठ परिसंस्थेच्या अध्यापकाचा विचार करण्यात येईल] ;

(ठ) अधिसभेने, त्या अधिसभेचे सदस्य असलेल्या संलग्न महाविद्यालयांच्या अध्यापकांमधून निवडलेले, अध्यापनाचा सोळा वर्षांचा अनुभव असलेले संलग्न महाविद्यालयाच्या अध्यापकांमधील दोन अध्यापक—ते प्राचार्य असणार नाहीत [५][यांपैकी एक महिला असेल] ;

(ड) अधिसभेने, तिच्या सदस्यांमधून निवडून दिलेली एक व्यक्ती ही, विद्यापीठ विभागाचा अधिष्ठाता, प्रमुख किंवा संचालक, प्राचार्य, अध्यापक [६][विद्यार्थी सदस्य किंवा व्यवस्थापनाचा प्रतिनिधी] असणार नाही.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २१(अ)(एक) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २१(अ)(दोन)(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २१(अ)(दोन)(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २१(अ)(तीन) अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २१(अ)(चार) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमांच्या कलम २१(अ)(पाच) अन्वये "किंवा विद्यार्थी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ढ) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडून दिलेल्या तीन व्यक्ती ;

[१][(ण) अधिसभेने, आपल्यामधून निवडून दिलेले, व्यवस्थापनाचे दोन प्रतिनिधी, यांपैकी एक महिला प्रतिनिधी असेल] :

परंतु, परिनियमांद्वारे विहित केल्यानुसार एका विद्याशाखेची एकापेक्षा अधिक व्यक्ती नसेल :

(२) [२] * * * * * *

(३) वित्त व लेखा अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक हे, परिषदेचे स्थायी निमंत्रित असतील, परंतु, त्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.

(४) व्यवस्थापन परिषदेच्या वर्षातून किमान चार बैठकी होतील व बैठकीच्या कामकाज चालनाबाबत अनुसरावयाच्या कार्यपद्धतीबाबतचे, तसेच बैठकीच्या गणपूर्तीबाबतचे नियम व बैठकीच्या संबंधात आवश्यक असतील अशा इतर बाबी या, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**२८.** व्यवस्थापन परिषद पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील :— व्यवस्थापन परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

(क) ज्यायोगे महाविद्यालयांना व परिसंस्थांना विशेषीकृत अभ्यास कार्यक्रम हाती घेणे शक्य होईल अशा तरतुदी करणे आणि आवश्यक आणि इष्ट असेल त्याबाबतीत, अध्यापनासाठी व संशाधनासाठी सामायिक प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये आणि साधनसामग्री यांचे आयोजन करणे व त्याबाबत तरतूद करणे :

(ख) विद्या परिषदेच्या शिफारशीवरून विभाग, महाविद्यालये, शाळा, उच्च शिक्षण, संशोधन व विशेषीकृत अभ्यास परिसंस्था, वसतिगृहे स्थापन करणे आणि कर्मचारीवर्गासाठी घरांची व्यवस्था करणे ;

(ग) आदेश करणे, त्यात सुधारणा करणे किंवा ते निरसित करणे आणि परिनियमांचा मसुदा तयार करणे व त्याबाबत त्यास योग्य वाटतील अशा शिफारशी अधिसभेकडे करणे ;

(घ) विद्यापीठाची मत्ता व मालमत्ता धारण करणे, तिचे नियंत्रण करणे व तिच्या प्रशासनाची व्यवस्था करणे ;

(ङ) वित्त व लेखा समितीकडून आलेले अर्थसंकल्पीय अंदाज आपल्या शिफारशींसह, काही असल्यास, अधिसभेकडे तिच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करणे ;

(च) विद्यापीठाच्या वतीने करार करणे, त्यात फेरबदल करणे, ते पार पाडणे व रद्द करणे ;

(छ) विद्यापीठाच्या सामाईक शिक्क्याचा नमुना ठरविणे व त्याची अभिरक्षा आणि उपयोग यासंबंधी तरतूद करणे ;

(ज) विद्यापीठाच्या वतीने, विश्वस्त निधी, मृत्युपत्रित देणग्या, देणग्या आणि विद्यापीठाकडे करण्यात आलेले कोणत्याही जंगम किंवा स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण स्वीकारणे ;

(झ) विद्यापीठाच्या वतीने कोणतेही जंगम मालमत्ता, विक्रीद्वारे किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करणे ;

(ञ) वित्त व लेखा समितीच्या शिफारशींनुसार विद्यापीठाच्या वतीने कर्ज घेणे, कर्ज देणे, किंवा निधी गुंतविणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २१(अ)(सहा) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २१(ब) अन्वये हे पोट-कलम वगळण्यात आले.

(ट) विशिष्ट प्रयोजनांसाठी विद्यापीठाकडे असलेल्या निधीचा वापर करण्याबाबत धोरण ठरविणे ;

(ठ) विद्यापीठाचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती, जागा, फर्निचर, उपकरणे व इतर साधने यांची तरतूद करणे ;

(ड) सन्मान्य पदव्या व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याविषयी अधिसभेला शिफारशी करणे ;

(ढ) विद्या परिषदेकडून शिफारसी करण्यात आल्या असतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करणे आणि प्रदान करणे व अध्यादेशान्वये तरतूद केल्यानुसार पदवी व पदविका इत्यादींच्या प्रदानासाठी दीक्षांत समारंभाची व्यवस्था करणे ;

(ण) अधिछात्रवृत्त्या, प्रवासी अधिछात्रवृत्त्या,शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या, पारितोषिके, पदके व बक्षिसे सुरू करणे आणि त्यासाठी, याबाबतीत केलेल्या विनियमांनुसार, नियम विहित करणे ;

(त) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने शिफारस केलेल्या परस्पर लाभप्रद विद्याविषयक कार्यक्रमांसाठी इतर विद्यापीठे, परिसंस्था आणि संघटना यांच्याशी सहयोग करण्याकरता विनियोग करणे ;

(थ) आवश्यक असेल त्यानुसार, विद्या परिषदेच्या शिफारशीवरून विद्यापीठ अध्यापकांची व लांब सुटी नसलेल्या विद्याविषयक कर्मचारीवर्गाची पदे निर्माण करणे ;

(द) राज्य शासनाने, वेळोवेळी मान्यता दिलेल्या सेवेच्या अटी व शर्ती आणि मार्गदर्शक तत्त्वे व अर्हता यांनुसार विद्यापीठ अध्यापक व लांब सुटी नसलेल्या विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती परिनियमांद्वारे विहित करणे, त्यांच्या वित्तलब्धी, कार्यभार, आणि वर्तणूक व शिस्त यांची प्रमाणके निश्चित करणे ;

(ध) राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेस अधीन राहून, विद्यापीठाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची पदे निर्माण करणे ;

(न) विद्यापीठाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती, अर्हता, सेवाप्रवेशाची पद्धती, वेतनमान, वर्तणूक, शिस्त व त्यांची कर्तव्ये यांसह त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती परिनियांद्वारे विहित करणे ;

(प) विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व परिसंस्था व महाविद्यालये यांमध्ये अध्यापक, अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती, त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांच्या नियुक्तीचे नियम व कार्यपद्धती, परिनियमांद्वारे विहित करणे ;

(फ) फी व इतर आकार विहित करणे ;

(ब) प्राश्निक, परीक्षक व परीक्षाविषयक इतर कर्मचारीवर्ग, विद्याशाखेचे अभ्यागत, यांच्यासाठी आणि विद्यापीठाला देण्यात आलेल्या अशा प्रकारच्या इतर सेवांसाठी मानधन, पारिश्रमिक, फी व प्रवास आणि इतर भत्ते विहित करणे ;

(भ) अध्यादेशाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे कुलगुरूकडून विद्यापीठाच्या कामकाजाचे नियतकालिक अहवाल स्वीकारणे व त्यांवर विचार करणे ;

(म) चालू विद्यावर्षाच्या समाप्तीपूर्वी पुढील विद्यावर्षासाठी परिनियम आणि विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे यांनुसार विद्यापीठाची विद्याविषयक नियामिका तयार करणे ;

(य) राज्य शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेऊन मान्यता दिलेल्या पूर्वनिर्धारित प्रमाणकांच्या अधीन राहून, विद्या परिषदेच्या शिफारशीवरून विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांना स्वायत्त दर्जा देणे ;

(कक) महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेल्या, विद्यापीठाच्या विद्याविषयक विकासाच्या भविष्यलक्षी योजनेचा विचार करणे ;

(खख) विद्या परिषदेकडून आलेल्या विद्याविषयक कार्यक्रमांच्या प्रस्तावाची व्यवहार्यता निर्धारित करणे व त्यांना मान्यता देणे ;

(गग) वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांच्यावर विचार करणे व ते स्वीकारणे आणि ते अधिसभेकडे मान्यतेसाठी पाठवणे ;

(घघ) महाविद्यालये, परिसंस्था किंवा विद्यापीठाचे विभाग योग्यरीत्या चालविणे, त्यांचे कामकाज व त्यांची आर्थिक स्थिती यासंबंधातील कोणत्याही बाबीची चौकशी करण्याची व्यवस्था करणे ;

(ङङ) अध्यादेश करण्याचा किंवा त्यांमध्ये सुधारणा करण्याचा अथवा त्यांचे निरसन करण्याचा अधिकार वगळता, आपल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार, कुलगुरूकडे किंवा त्यास योग्य वाटेल अशा विद्यापीठाच्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे किंवा त्याने नियुक्त केलेल्या समितीकडे सोपविणे.

**२९.** (१) अध्यापन, संशोधन [१][विस्तार] विद्याविषयक बाबींसंबंधातील सहयोगी कार्यक्रम यासंबंधातील दर्जा राखणे व सुधारणे व अध्यापकांच्या कार्यभाराचे मूल्यमापन या बाबींसंबंधातील विद्याविषयक धोरणे घालून देण्यास विद्या परिषद जबाबदार असेल. विद्या परिषद.

(२) विद्या परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) कुलगुरू, सभापती ;

(ख) प्रतिकुलगुरू, कोणताही असल्यास ;

(ग) विद्याशाखांचे अधिष्ठाते ;

(घ) अभ्यास मंडळाचे सभापती ;

(ङ) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचा संचालक ;

(च) संचालित, स्वायत्त किंवा संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे [२][आठ प्राचार्य, यांपैकी दोन महिला असतील व एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जनजातीची किंवा विमुक्त जातीची/भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची, चक्रीय आरक्षणाप्रमाणे व्यक्ती असेल] ;

(छ) विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था यांमधील प्राध्यापकांमधून कुलगुरूने नामनिर्देशित केलेला एक प्राध्यापक ;

(ज) प्रत्येक विद्याशाखेमधून एक या प्रमाणात प्रतिनिधित्व होईल अशाप्रकारे विद्या परिषदेने महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठ विभागांचे प्रमुख व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्रमुख नसलेल्या व किमान सोळा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असलेल्या अध्यापकांकडून निवडलेला अध्यापक ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २२(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २२(ब)(एक) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(झ) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला मान्यताप्राप्त परिसंस्थेचा एक प्रमुख ;

(ञ) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला, विद्यापीठाच्या विद्याविषयक सेवा युनिटचा एक प्रमुख किंवा संचालक ;

(ट) कुलपतीने नामनिर्देशित केलेले, उच्च शिक्षण क्षेत्रातील दोन मान्यवर तज्ज्ञ ;

(ठ) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य [१][किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी, त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती] ;

[२][(ठक) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य किंवा सह संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी, त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती] ;

(ड) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा अध्यक्ष [३][किंवा मंडळाच्या विभागीय अध्यक्षाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी, त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती] ;

[४][(ढ) निर्वाचक गण सदस्यांनी,—ज्यामध्ये अध्यक्ष, सभापती किंवा प्रत्येक व्यवस्थापनाने नामनिर्देशित केलेली व्यक्ती असेल—आपल्यामधून निवडून दिलेले, व्यवस्थापनाचे दोन प्रतिनिधी, ज्या ठिकाणी व्यवस्थापन, एकापेक्षा अधिक महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था चालवत असतील, त्या ठिकाणी व्यवस्थापनातील केवळ एक नामनिर्देशित व्यक्ती निर्वाचक गणाचा सदस्य असेल].

[५][(३) परीक्षा नियंत्रक हा, कायम निमंत्रित असेल आणि परीक्षेशी संबंधित बाबींबद्दल बोलण्याचा त्याला अधिकार असेल].

(४) वर्षातून किमान दोनदा विद्या परिषदेच्या बैठकी होतील.

विद्या परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

३०. (१) विद्या परिषद हे विद्यापीठाचे विद्याविषयक प्रमुख प्राधिकरण असेल आणि ती विद्यापीठातील अध्यापन, संशोधन व परीक्षा यांचे नियमन करण्यास व त्यांचा दर्जा कायम राखण्यास जबाबदार असेल.

(२) पूर्ववर्ती तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, विद्या परिषद पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(क) पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करण्यासंबंधी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(ख) विद्याविषयक बाबींशी संबंधित प्रश्नांवर अध्यादेश काढणे, त्यांत सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे यासंबंधात व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(ग) या अधिनियमाच्या कलम ५५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बाबींसंबंधात, विनियम करणे, त्यांत सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे ;

(घ) विद्याशाखांना विषय वाटून देणे [६][आणि विद्यापरिषदेचे सदस्य असलेल्या प्रत्येक प्राचार्याला व शिक्षकाला नेमून दिलेली एक विद्याशाखा] ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २२(ब)(दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २२(ब)(तीन) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २२(ब)(चार) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २२(ब)(पाच) अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २२(क) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २३(अ)(तीन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(ङ) विद्यापीठामध्ये संचलित महाविद्यालये, प्रशाळा विभाग, उच्च शिक्षण व संशोधन विशेषीकृत अभ्यास परिसंस्था, विद्याविषयक सेवा युनिटे, ग्रंथालय, प्रयोगशाळा व संग्रहालये स्थापन करण्यासंबंधात प्रस्ताव तयार करणे ;

(च) विद्यापीठास आवश्यक असलेल्या प्राध्यापकांची, सहयोगी प्राध्यापकांनी, प्रपाठकांची, अधिव्याख्यात्यांची आणि लांब सुटी नसलेल्या विद्याविषयक कर्मचारीवर्गाची पदे निर्माण करण्यासंबंधातील नवीन प्रस्तावांचा विचार करणे व त्याबद्दल शिफारस करणे ;

(छ) निरनिराळ्या संवर्गांमधील अध्यापकांसाठी व लांब सुटी नसलेल्या विद्याविषयक कर्मचारीवर्गासाठी, तसेच या संवर्गातील एखाद्या विशिष्ट पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या अर्हतांच्या संदर्भात, राज्य शासनास शिफारस करणे किंवा न करणे—मग ती पदे विद्यापीठातील असोत किंवा एखाद्या संलग्न महाविद्यालयातील असोत किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील असोत व कोणत्याही जादा अर्हता आवश्यक असल्यास त्या, विहित करणे ;

(ज) अभिछात्रवृत्त्या, प्रवास अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या, पदके व पारितोषिके सुरू करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेकडे प्रस्ताव करणे व ती देण्यासंबंधात विनियम करणे ;

(झ) प्राश्निक, परीक्षक, नियामक व परीक्षा घेण्याच्या कामाशी संबंधित असलेल्या इतर व्यक्ती यांच्या नियुक्तीसाठी अर्हता व प्रमाणके विहित करणे ;

(ञ) विद्यमान अभ्यासक्रमाची उपयुक्तता व व्यवहार्यता, तसेच नवीन ज्ञान किंवा बदलत्या सामाजिक गरजा यांनुसार त्यांचे पुनर्विलोकन करण्याची किंवा त्यात फेरफार करण्याची इष्टता किंवा आवश्यकता ठराविक कालांतराने तपासून पाहण्यासाठी समित्या नियुक्त करणे ;

(ट) आंतर-विद्याशाखा व क्षेत्रिय किंवा प्रादेशिक अभ्यासक्रम चालविण्यासाठी, उपकरण साधना केंद्रे, कार्यशाळा, छंद केंद्रे. संग्रहालये, इत्यादीसारख्या सामाईक सुविधा पुरविण्यासाठी प्रस्ताव करणे ;

(ठ) संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या कर्मचारीवर्गामधील कोणत्याही कर्मचाऱ्यास विद्यापीठाचा अध्यापक म्हणून मान्यता देण्यासाठी प्रमाणके विहित करणे ;

(ड) महाविद्यालयांना संलग्नीकरण देणे, संलग्नीकरण चालू ठेवणे, संलग्नीकरणाची मुदत वाढवणे व उच्च शिक्षण व संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास परिसंस्थांना मान्यता देणे, मान्यता चालू ठेवणे, मान्यतेची मुदत वाढवणे यांसाठी प्रमाणके विहित करणे ;

(ढ) परिनियम, अध्यादेश व विनियम यांच्या तरतुदींनुसार महाविद्यालयांना किंवा परिसंस्थांना संलग्न करण्यास मान्यता देणे ;

(ण) परिषदेने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींवरून उच्च शिक्षण, संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास परिसंस्थांना मान्यता देणे ;

(त) [१][परिनियमांच्या] तरतुदींनुसार विद्यापीठ परिसंस्था, विभाग, [२][किंवा संचालित] व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना स्वायत्त दर्जा प्रदान करण्याबद्दल व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(थ) फी व इतर शुल्के विहित करण्याबद्दल व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(द) सर्वसाधारणपणे, सर्व विद्याविषयक बाबीसंबंधात विद्यापीठाला सल्ला देणे व व्यवस्थापन परिषदेला, [३][विद्यावर्षाच्या कॅलेंडरचा तपशील आणि] अधिसभेने आपल्या शेवटच्या वार्षिक बैठकीत शिफारस केलेल्या विद्याविषयक कार्यक्रमांबाबत व्यवहार्यता अहवाल सादर करणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३०(ब) (एक) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३०(ब)(दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३०(ब)अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ध) हा अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम यांद्वारे किंवा तद्न्वये तिला प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे व सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

परीक्षा मंडळ. **३१.** (१) परीक्षा मंडळ हे परीक्षा घेणे व परीक्षांचे आयोजन करणे व त्या घेणे या संबंधात धोरणात्मक निर्णय घेणे, परीक्षा पद्धतीत सुधारणा करणे, प्राश्निक, परीक्षक, नियामक यांची नियुक्ती करणे व तसेच परीक्षांच्या दिनांकाचे वेळापत्रक तयार करणे आणि निकाल घोषित करणे यांसाठी असणारे प्राधिकरण असेल. स्वायत्त महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ विभागामध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षांवरदेखील परीक्षा मंडळ देखरेख करील व त्यांचे नियमन करील. [१][मंडळ विद्यावर्षाचे कॅलेंडर तयार करण्याकरिता परीक्षांचा तपशिलवार कार्यक्रम विद्यापरिषदेला सादर करील.]

(२) परीक्षा मंडळ, परीक्षांच्या संबंधातील सर्व बाबींसंबंधात कार्यवाही करील व परीक्षा घेण्याबाबत उद्‌भवलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात त्याच्याकडे आलेल्या तक्रारींची सुनावणी करील व त्यांवर निर्णय देईल. मंडळाने चर्चाविमर्श करताना अनुसरावयाची कार्यपद्धती ही विहित करण्यातयेईल त्याप्रमाणे असेल.

(३) परीक्षा मंडळात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) कुलगुरू अध्यक्ष ;

(ख) प्रतिकुलगुरू कोणताही, असल्यास ;

(ग) परीक्षेशी संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता ;

(घ) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला प्रपाठकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेला विद्यापीठ विभागाचा एक प्रमुख ;

(ङ) व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला, अधिष्ठाता नसेल असा, एक प्राचार्य ;

(च) व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला, [२][विद्यापीठाचा विभाग प्रमुख] किंवा प्राचार्य विभाग प्रमुख किंवा प्राचार्य यांच्या व्यतिरिक्त अन्य एक अध्यापक ;

(छ) संचालक, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली सहसंचालकापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती ;

(ज) मंडळाने स्वीकृत केलेला एक मूल्यमापन तज्ञ ;

(झ) परीक्षा नियंत्रक, सदस्य-सचिव.

परीक्षा मंडळाचे अधिकार व कर्तव्ये. **३२.** (१) परीक्षा मंडळ विद्यापीठाच्या परीक्षा आणि चाचण्या यांची व तसेच नियमन, कोष्टकीकरण यांची आणि निकाल घोषित करण्याची कार्यवाही योग्यरितीने करण्यात येत असल्याची खात्री करून घेईल.

(२) प्रत्येक विद्यावर्षात किमान एकदा मंडळाची बैठक घेण्यात येईल.

(३) विशेषतः व पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कर्तव्यांच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, मंडळ, पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(क) त्या त्या अभ्यासक मंडळांनी तयार केलेल्या नामिकेत समाविष्ट असलेल्या व्यक्तीमधून प्राश्निक, परीक्षक व नियामक यांची नेमणूक करणे व आवश्यक असेल त्याबाबतीत समितीने पोट-कलम (६) च्या खंड (ब) अन्वये केलेल्या शिफारशी लक्षात घेऊन त्यांना काढून टाकणे किंवा त्यांना प्रतिरोध करणे ;

(ख) परीक्षाविषयक सुधारणा हाती घेणे, त्या अंमलात आणणे व त्यासंदर्भात प्रयोग करणे ;

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २४(अ)(तीन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २४(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला

(ग) अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा, परीक्षांशी संबंधित इतर अधिकारांचा वापर करणे.

(४) तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असेल अशी कोणतीही निकडीची परिस्थिती उद्‌भवल्यास त्याबाबतीत, मंडळाचा अध्यक्ष किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अन्य अधिकारी किंवा व्यक्ती तिला योग्य व आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करील आणि तिने केलेल्या कार्यवाहीसंबंधात मंडळाच्या पुढील बैठकीत अहवाल देईल.

(५) (क) प्राश्निक, परीक्षक व नियामक यांची नेमणूक करण्याकरिता परीक्षा मंडळ प्रत्येक विषयाकरिता समिती घटित करील, त्या समितीतत पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(एक) प्रतिकुलगुरू, कोणताही असल्यास—अध्यक्ष ;

(दोन) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता ;

(तीन) संबंधित अभ्यास मंडळाचा अध्यक्ष ;

(चार) अभ्यास मंडळाने त्याच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले दोन सदस्य [१][ज्यातील किंमान एक तरी स्नातकोत्तर अध्यापक असेल] :

परंतु, ज्याबाबतीत विद्यापीठात प्रतिकुलगुरूची नियुक्ती करण्यात आलेली नसेल त्याबाबतीत, संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता हा अध्यक्ष असेल :

[२][ * * * * ]

(ख) परीक्षा नियंत्रक हे अशा समित्यांचे सचिव म्हणून काम करतील.

(ग) समिती, अभ्यास मंडळाकडून तयार करण्यात यावयाच्या नामिकेत समाविष्ट करण्यात येणाऱ्या व्यक्तींमधून विविध परीक्षा व चाचण्या यांच्याकरिता व्यक्तींच्या नावांच्या याद्या तयार करील व त्या परीक्षा मंडळास सादर करील व ते मंडळ नंतर प्राश्निक, परीक्षक व नियामक व आवश्यक तेथे निर्देशी यांची नेमणूक करील ;

(घ) परीक्षा मंडलाचा किंवा समित्यांचा कोणताही सदस्य प्राश्निक, परीक्षक, नियामक किंवा निर्देशी म्हणून नियुक्त केला जाणार नाही ;

(ङ) समितीत त्या त्या विषयाच्या प्रश्नपत्रिकांचे तीन संच मोहोरबंद पाकिटातून स्वीकारील. समितीचा सभापती, प्रश्नपत्रिका असणाऱ्या अशा मोहोरबंद पाकिटांमधून कोणतेही एक पाकीट घेईल. नंतर ते मोहोर शाबूत असलेले मोहोरबंद पाकीट मुद्रणालयाकडे पाठविले जाईल ;

(च) सर्व पदवी परीक्षांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी मध्यवर्ती पद्धतीद्वारे मध्यवर्ती ठिकाणी केली जाईल. परीक्षांच्या सर्व उत्तरपत्रिका सोईस्कर अशा मध्यवर्ती ठिकाणी गोळा केल्या जातील. नंतर उत्तरपत्रिकांना संकेतांक दिले जातील व आच्छादने लावण्यात येतील. सर्व परीक्षक मध्यवर्ती तपासणी केंद्रावर उपस्थित राहतील आणि त्या केंद्रावरच उत्तरपत्रिका तपासतील. नंतर उत्तरपत्रिकांची आच्छादने काढण्यात [३][येतील व कोष्टककार आणि/किंवा नियामक] निकालपत्रक तयार करतील :

परंतु, विद्यापीठाला इष्ट व व्यवहार्य वाटेल तेथे, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी देखील हीच पद्धती अनुसरता येईल :

---

१ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २५(१)(अ)(एक) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम २५(१)(अ)(दोन) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

३ वरील अधिनियमाच्या कलम २५(१)(ब)(एक)अन्वये "येतील व नियामक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][परंतु, आणखी असे की, वरील उद्दीष्टांसाठी, विद्यापीठ गुप्ततेच्या उद्देशाची खात्री करून घेण्यासाठी, आच्छादन घालण्याच्या व आच्छादन काढण्याच्या पद्धतीसाठी एखादी पर्यायी पद्धती अनुसरू शकेल.]

[२][(छ) विद्यापीठाच्या परीक्षांच्या बाबतीत, विद्यापीठाच्या संलग्न, संचलित किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रत्येक अध्यापकाने आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्याने आवश्यक ते सहाय्य व सेवा पुरवणे त्यांच्यावर बंधनकारक असेल. या संबंधातील विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही अध्यापकाने किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्याने कसूर केल्यास, ती गैरवर्तणूक समजण्यात येईल आणि तो कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीला पात्र असेल.]

(६) (क) उमेदवारांनी, प्राश्निकांनी, परीक्षकांनी, नियामकांनी, निर्देशींनी, अध्यापकांनी किंवा परीक्षा घेणाशी [३][ज्यामध्ये परीक्षापूर्व टप्प्याचा आणि परीक्षोत्तर टप्प्याचा किंवा अन्य कोणत्याही टप्प्याचा समावेश असेल] संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तींनी केलेले गैरव्यवहार व चुका यांच्या संबंधात तपास करण्यासाठी व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठी, परीक्षा मंडळ जास्तीत जास्त पाच व्यक्तींचा समावेश असलेली एक समिती घटित करील. त्या व्यक्तींपैकी एक अध्यक्ष असेल ;

(ख) अशी समिती, तिचा अहवाल व शिफारशी परीक्षा मंडळास सादर करील व मंडळ [४][प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, गैरव्यवहारात सहभागी असलेल्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या विरूद्ध] त्याबाबत, त्यास योग्य वाटेल अशी, शिस्तभंगाची कार्यवाही करील.

(७) मंडळ, विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्याकरिता वित्तीय अंदाज तयार करील व ते, वित्त व लेखा [५][समितीला] सादर करील.

(८) परीक्षा चालू असताना, मंडळ काटेकोर दक्षता बाळगील. त्यामुळे विद्यार्थी, अध्यापक, समावेक्षक, पर्यवेक्षक, इत्यादींना कोणत्याही गैरप्रकारांचा अवलंब करण्यास आळा बसेल.

विद्याशाखा.

**३३.** (१) विद्याशाखा या, विद्याशाखेत समाविष्ट असलेल्या विषयांच्या संबंधातील अभ्यास आणि संशोधन याबाबत, तसेच बहुविध विद्याशाखांच्या अभ्यास व संशोधनाच्या संबंधात, विद्यापीठाची विद्याविषयक समन्वय साधणारी प्रमुख प्राधिकरणे असतील.

(२) विद्यापीठामध्ये, परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे अशा विद्याशाखा असतील.

(३) केवळ विद्यापरिषदेच्या मान्यतेने व परिनियमांद्वारे विहित करण्यात आले असेल त्याप्रमाणे विद्याशाखा स्थापन करण्यात येईल, विभाजित करण्यात येईल, एकत्र करण्यात येईल किंवा रद्द करण्यात येईल.

(४) विद्याशाखेत परिनियमांद्वारे विहित करण्यात आले आहे अशा विषयांचा अंतर्भाव असेल.

(५) विद्याशाखेत पुढील सदस्यांचा समावेश असेल,—

(क) विद्याशाखेचा अधिष्ठाता—पदसिद्ध अध्यक्ष ;

(ख) विद्याशाखेत अंतर्भूत असलेल्या विषयांसाठी प्रत्येक अभ्यास मंडळाचा अध्यक्ष ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २५(१)(ब)(दोन) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २५(१)(क) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २५(२)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २५(२)(दोन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २५(३) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ग) अभ्यास मंडळांनी, आपल्या सदस्यांमधून निवडावयाचे असे अभ्यास मंडळाचे प्रत्येकी तीन सदस्य, ज्यांपैकी किमान एक सदस्य पदव्युत्तर अध्यापक असेल.

[१][(घ) विद्यापरिषदेने, आपल्या सदस्यांमधून विद्याशाखेला नेमून दिलेला प्राचार्य व शिक्षक.]

विद्याशाखेचे अधिकार व कर्तव्ये.

**३४.** विद्याशाखेचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद किंवा महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ [२][किंवा विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ] यांच्याकडून विद्याशाखेकडे विचारार्थ पाठवण्यात आलेल्या कोणत्याही बाबींवर विचार करणे व त्याबाबत अहवाल देणे ;

(ख) विद्याशाखेतील अभ्यास मंडळांनी केलेल्या शिफारशी आणि एकाहून अधिक अभ्यास मंडळांशी संबंधित असलेल्या बाबी यांवर, त्याच्यामुळे कोणत्याही अन्य विद्याशाखेवर विपरित परिणाम होत नसेल तर, विचार करणे आणि त्यांना मान्यता देणे ; आणि तिला योग्य वाटेल अशी कार्यवाही करण्याची विद्यापरिषदेकडे शिफारस करणे ;

(ग) ज्यांमुळे कोणत्याही अन्य विद्याशाखेवर किंवा विद्याशाखांवर विपरित परिणाम होत असेल किंवा ज्यांमध्ये प्रशासनिक किंवा वित्तीय गुंतागुंत अंतर्भूत असेल अशा, [३][विद्याविषयक बाबींवर [४][प्रकाशनास मान्यता देणे, पाठ्यक्रमांमध्ये सुधारणा करणे, दिशानिर्देशन किंवा उजळणी पाठ्यक्रम आयोजित करणे, इत्यादींसारख्या आणि प्रशासनिक गुंतागुंत किंवा अपेक्षित वित्तीय भार अंतर्भूत नसतील अशा, तिच्या कक्षेतील विद्याविषयक बाबींना मान्यता देणे,] विचार करणे आणि त्याबाबत विद्यापरिषदेकडे शिफारस करणे ;

(घ) परिनियमांद्वारे कोणतीही अभ्यास मंडळे किंवा आंतरज्ञानशाखीय अभ्यास मंडळे स्थापन करण्यात आली असतील तर, अशा [५][विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाने,] अभ्यास मंडळांनी किंवा आंतरज्ञानशाखीय अभ्यास मंडळांनी तिच्याकडे विचारार्थ पाठविलेले नवीन पाठ्यक्रम आंतरज्ञानशाखीय पाठ्यक्रम आणि अल्पमुदती प्रशिक्षण कार्यक्रम यांवर विचार करणे आणि ते सुरू करण्याबाबत विद्यापरिषदेकडे शिफारस करणे ;

(ङ) [६][मनुष्यबळ विकासाच्या संदर्भात] विद्यापीठ परिसंस्था किंवा विभाग, संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांमध्ये पदव्युत्तर किंवा पदवीपूर्व शिक्षण, अध्यापन, संशोधन आणि प्रशिक्षण चालू करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींसंबंधी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाकडे शिफारस करणे ;

(च) विद्यापरिषदेने पुढील गोष्टींसाठी घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे व केलेले नियम यांचे पालन केले जात आहे याची खात्री करून घेणे :—

(एक) दीर्घ मुदती अभ्यासक्रमांचा विकास ;

(दोन) विद्याशाखेचा विकास ;

(तीन) अध्यापन किंवा शिक्षणसामग्रीचा विकास ;

(चार) विशेषकरून, महाविद्यालयाच्या संदर्भात शैक्षणिक बाबींमध्ये संशोधन करणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २६ अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २७(अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २७(ब)(एक) अन्वये "तिच्या कक्षेतील विद्याविषयक बाबींवर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

[४] वरील अधिनियमाच्या कलम २७(ब)(दोन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २७(क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २७(ड) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(छ) [१][विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ,] अभ्यास मंडळे, अन्य विद्याशाखा, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांच्याशी विचारविनिमय करून, आंतरविभागीय आणि आंतरविद्याशाखा कार्यक्रमांचे नियोजन व आयोजन करणे ;

(ज) विशेषतः सुधारित किंवा नव्याने सुरू केलेल्या किंवा आंतरज्ञानशाखीय पाठ्यक्रमांसाठी संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठ विभाग यांच्या अध्यापकांकरिता उजळणी व दिशानिर्देशन पाठ्यक्रम आयोजित करण्यासंबंधात, अध्यापक कर्मचारी प्रशिक्षण महाविद्यालयाला आणि विद्यापरिषदेला शिफारस करणे ;

(झ) विद्याशाखांचे अधिष्ठाते निवडून देणे ;

(ञ) विद्याशाखेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तयार करणे आणि तो कुलगुरूकडे सादर करणे ;

(ट) विद्याशाखेकडे विचारार्थ पाठवलेली अन्य कोणतीही विद्याविषयक बाब विचारात घेणे.

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ.

**३५.** (१) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, विद्यापीठाचा भौतिक व विद्याविषयक विकास आराखडा तयार करण्यास जबाबदार असेल व ते, विद्यापीठ विभाग, परिसंस्था, महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची विद्याविषयक लेखापरीक्षा करील. तसेच ते, संलग्न महाविद्यालयांचे पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्याविषयक कार्यक्रम आणि संलग्न महाविद्यालयांचा विकास यांची आखणी करणे, त्यांचे संनियंत्रण करणे, त्याबाबत मार्गदर्शन करणे व त्यात समन्वय साधणे ही कामे देखील करील.

(२) या मंडळात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) कुलगुरू—अध्यक्ष ;

(ख) प्रतिकुलगुरू, कोणताही असल्यास ;

(ग) विद्यापरिषदेकडून नामनिर्देशित करण्यात आलेला विद्याशाखेचा एक अधिष्ठाता ;

(घ) प्राध्यापकांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला व विद्यापरिषदेकडून नामनिर्देशित करण्यात आलेला अधिष्ठाता नाही असा, विद्यापीठ, परिसंस्था किंवा विभाग यांच्या प्रमुखांमधील किंवा संचालकांमधील एक प्रमुख किंवा संचालक ;

(ङ) पदव्युत्तर शिक्षण देणारा किंवा संशोधन मार्गदर्शक असेल. परंतु, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला अधिष्ठाता, विद्यापीठ [२][शिक्षणाचा] विभागाचा प्रमुख नसेल असा, एक अध्यापक ;

(च) किमान सोळा वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या व व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशित करण्यात आलेला, पदवीपूर्व शिक्षण देणारा एक अध्यापक ;

(छ) विद्यापरिषदेचे सदस्य असलेल्या प्राचार्यांमधून, विद्यापरिषदेकडून नामनिर्देशित करण्यात आलेला, संलग्न कला, विज्ञान किंवा वाणिज्य महाविद्यालयांचा एक प्राचार्य ;

(ज) कुलगुरूकडून नामनिर्देशित करण्यात आलेला, संलग्न व्यवसाय महाविद्यालयाचा एक प्राचार्य ;

(झ) राष्ट्रीय व राज्य पातळीवरील संशोधन परिसंस्थांच्या प्रमुखांमधून मंडळाने स्वीकृत केलेले दोन तज्ज्ञ ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २७(ई) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८(अ) अन्वये "परिसंस्थेचा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

(ञ) कुलगुरूने नामनिर्देशित करावयाच्या, उद्योग, बँका, वाणिज्य किंवा व्यावसायिक मंडळे यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती ;

[१][(ञक) अधिसभेकडून नामनिर्देशित करण्यात आलेले दोन सदस्य, त्यापैकी एक सदस्य व्यवस्थापनांचे प्रतिनिधित्व करील.]

(ट) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचा संचालक–सदस्य सचिव :

परंतु, वरील प्रवर्ग (क) ते (झ) मध्ये नामनिर्देशित केलेले सदस्य, व्यवहार्य असेल तेथवर, निरनिराळ्या विद्याशाखांमधून घेण्यात येतील.

(३) मंडळ, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिसंस्था, उद्योग, व्यापार आणि वाणिज्यिक संघटनाबरोबर सक्रिय सहयोग स्थापन करील.

(४) मंडळ, वर्षातून किमान दोनदा बैठक घेईल.

महाविद्यालय आणि विद्यापीठ विकासमंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये.

**३६.** मंडळ,—

(१) आंतरविद्यापीठ आणि विद्यापीठ व महाविद्यालय आणि उद्योग, कृषि, बँका, वाणिज्य व समाज यांच्यामध्ये संबंध निर्माण करण्यासाठी व परस्पर सहकार्याच्या योजना विकसित करण्याच्या उपाययोजना सुचवील.

(२) अधिनियमात घालून दिल्याप्रमाणे विद्यापीठाची उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून आणि राज्याचे व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विचारात घेऊन, अल्पमुदती व दीर्घमुदती अशा दोन्ही प्रकारच्या विद्यापीठ व महाविद्यालय [२][सम्यक विकास] योजना तयार करील [३][आणि ती योजना, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद, राज्य शासन व कुलपती यांच्याकडे सादर करील.].

(३) व्यवस्थापन परिषदेकडे, विभाग, महाविद्यालये आणि विद्यापीठ यांसाठी विकासविषयक व सहयोगी कार्यक्रमांची शिफारस करील.

(४) अशा सर्व मान्यताप्राप्त विकासविषयक व सहयोगी कार्यक्रमांचे संनियंत्रण करील आणि वर्षातून एकदा व्यवस्थापन परिषदेला त्यांच्या प्रगतीचा अहवाल कळवील. [४][आणि तो अहवाल, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद, राज्य शासन व कुलपती यांच्याकडे सादर करील.].

(५) विद्यापीठ विभाग, पदव्युत्तर केंद्रे आणि [५][***] महाविद्यालये यांच्याकडून विकासविषयक प्रकल्पांच्या संबंधात केल्या जाणाऱ्या अनुदानाच्या वापराचे मूल्यमापन व निर्धारण करील आणि विद्यापरिषदेला अहवाल सादर करील.

(६) वाणिज्य, उद्योग, समाजसेवा, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांत लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ निश्चित करील आणि संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आणि त्यात वाढ करण्यासाठी विद्यापरिषदेकडे आवश्यक त्या शिफारशी करील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २८(ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २९(अ)(एक) अन्वये "विकास" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

[३] वरील अधिनियमाच्या कलम २९(अ)(दोन) अन्ये हा मजकूर जादा दाखल केला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २९(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २९(क) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

(७) परिनियमांच्या तरतुदींनुसार विद्यापीठ परिसंस्था किंवा विभाग, पदव्युत्तर केंद्रे आणि [१][***] महाविद्यालये यांच्या विकासविषयक व सहयोगी कार्यक्रमांची तीन वर्षांतून किमान एकदा [२][किंवा आवश्यक वाटले तर, त्याआधी] विद्याविषयक लेखापरीक्षा आयोजित करील आणि त्यानुसार अंमलबजावणी करण्याकरिता विद्यापीठाकडे आवश्यक त्या शिफारशी करील.

(८) नवीन महाविद्यालये किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी आलेल्या अर्जाची किंवा ते त्यांना विद्यापीठांना संलग्न करण्याच्या दृष्टीने छाननी करील आणि परिनियमांद्वारे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, ते अर्ज राज्य शासनाकडे पुढे पाठवण्यासाठी त्यावर कार्यवाही करील.

विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळे.

[३][**३६क.** (१) प्रत्येक विद्यापीठासाठी एक विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ असेल.

(२) विद्याशाखेच्या विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ पुढील सदस्यांचा समावेश असेल :–

| | |
|---|---|
| (एक) कुलगुरू .. .. .. | अध्यक्ष |
| (दोन) प्रतिकुलगुरू, कोणताही असल्यास, .. .. | सदस्य |
| (तीन) विद्याशाखेचा अधिष्ठाता .. .. .. | सदस्य |
| (चार) विद्याशाखेमधील विद्यापीठ विभागांचे प्रमुख. . .. | सदस्य |
| (पाच) विद्याशाखेमधील अभ्यास मंडळाचा अध्यक्ष. . .. | सदस्य |
| (सहा) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ .. | सचिव-सदस्य |

(३) मंडळाकडून,–

(एक) अध्यापन व संशोधनाचा दर्जा राखण्याकरिता विद्यापीठ विभागांमधील, महाविद्यालायांमधील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील पदव्युत्तर विभागांमध्ये संशोधन कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्यात येईल, त्यांचे विनियमन करण्यात येईल व त्यांच्यात समन्वय साधण्यात येईल ;

(दोन) विद्यापरिषदेकडे, विद्यापीठ विभागामधील, महाविद्यालयांमधील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील पदव्युत्तर विभागांमध्ये पदव्युत्तर पाठ्यक्रम चालविण्यासंबंधीच्या शिफारशी करण्यात येतील ;

(तीन) विद्यापरिषदेकडे, महाविद्यालयांमधील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील पदव्युत्तर विभागांमध्ये पदव्युत्तर अध्यापक व संशोधन मार्गदर्शक यांच्या मान्यतेच्या प्रमाणकासंबंधी शिफारशी करण्यात येतील ;

(चार) विद्यापरिषदेकडून विहित करण्यात आलेल्या प्रमाणकांनुसार, संशोधन व मान्यता समितीने शिफारस केल्याप्रमाणे, पदव्युत्तर अध्यापक व संशोधन मार्गदर्शक यांना मान्यता देण्यात येईल ;

(पाच) पीचडी., पीएचडी पूर्व व एम.फिल. करिता पाठ्यक्रम संरचना मान्य करण्यात येईल.

(४) मंडळ, वेगवेगळ्या विद्याशाखा व विषयांच्या पदव्युत्तर अध्यापन व संशोधनाकरिता जबाबदार असेल आणि संशोधनाच्या दर्जाची सुनिश्चिती करील. ते मंडळ, पदव्युत्तर अध्यापन व मार्गदर्शक संशोधनाकरिता, संलग्न महाविद्यालयांमधील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अध्यापकांना मान्यता देण्याचे काम पाहील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २९(ड)(एक) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २९(ड)(दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३० अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(५) प्रत्येक अभ्यास मंडळासाठी एक संशोधन व मान्यता समिती असेल, या समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) | प्रतिकुलगुरू, . . . . . . | अध्यक्ष |
| (दोन) | विद्याशाखेचा अधिष्ठाता, . . . . . . | सदस्य |
| (तीन) | अभ्यास मंडळाचा अध्यक्ष, . . . . . . | सदस्य |
| (चार) | विद्यापीठ विभागाचा प्रमुख जर कोण असल्यास, . . . . | सदस्य |
| (पाच) | ज्यांनी पीएचडी च्या किमान पाच विद्यार्थ्यांना यशस्वीपणे मार्गदर्शन केले आहे, असे प्रपाठकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसतील असे आणि मान्यताप्राप्त किंवा ख्यातनाम राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय जर्नल, साहित्यसंग्रह, इत्यादींमध्ये ज्यांचे संशोधनपर वाङ्मय प्रसिद्ध झाले आहे अशा या विषयातील दोन तज्ज्ञ व्यक्ती, त्यांपैकी एक तज्ज्ञ व्यक्ती, कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेली व विद्यापीठाबाहेरील असेल ; | सदस्य |
| (सहा) | अति विशेषीकृत मुद्याच्या किंवा विषयाच्या मूल्यमापनासाठी निर्देशीची नियुक्ती करावयाची असल्यास, कुलगुरू, कुलगुरू नामनिर्देशित करील अशी विशेषीकरणाच्या क्षेत्रामधील तज्ज्ञ व्यक्ती | सदस्य |

नामनिर्देशित सदस्य हे, फक्त त्या विशिष्ट बाबीच्या वेळेस बैठकीस उपस्थित राहतील :

परंतु, प्रति-कुलगुरू नसल्यास, अधिष्ठाता, त्या समितीचा अध्यक्ष म्हणून पदावर स्थानापन्न होईल.

(६) अभ्यास मंडळाची संशोधन व मान्यता समिती,—

(एक) शोधनिबंधाचा किंवा प्रबंधाचा विषय मान्य करील.

(दोन) मंडळाकडे शोधनिबंध किंवा प्रबंधासाठी निर्देशीच्या नामिकेची शिफारस करील.

(तीन) मंडळाकडे पदव्युत्तर पदवी अध्यापक आणि संशोधन मार्गदर्शक यांच्या नावांची शिफारस करील.

(चार) अभ्यास मंडळे किंवा विद्याशाखा यांना स्नातकोत्तर पातळीवरील अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा करण्याच्या उपाययोजनांच्या बाबतीत सल्ला देईल.

(पाच) पीएचडी., पीएचडी. पूर्व व एमफिल या अभ्यासक्रमांची संरचना मान्यतेसाठी मंडळाकडे पाठवील.]

**३७.** (१) परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे प्रत्येक विषय किंवा विषयांचा गट यासाठी अभ्यास मंडळ असेल. अभ्यास मंडळ.

(२) अभ्यास मंडळामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल,—

(क) संबद्ध विषयामधील विद्यीपठ विभागाचा किंवा परिसंस्थेचा प्रमुख :

परंतु, ज्या विषयाच्या संबंधात विद्यापीठ विभाग नसेल त्याबाबतीत, मंडळ, आपल्या पहिल्या बैठकीत, त्या विषयांतील पदव्युत्तर अध्यापनाचा अनुभव असणाऱ्या संलग्न महाविद्यालयामधील, विभाग प्रमुखास स्वीकृत करील.

(ख) [१][****] अध्यपनाचा दहा वर्षांहून कमी नाही एवढा अनुभव असणारे [२][****] विभाग प्रमुखांनी आपल्यामधून निवडून दिलेले [३][****] महाविद्यालयातील सहा विभाग प्रमुख :

(३) मंडळ, आपल्या पहिल्या बैठकीत,—

(क) संलग्न महाविद्यालयांच्या अध्यापकांमधून, विषयातील पदव्युत्तर अध्यापनाचा दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असणारा एक पदव्युत्तर अध्यापक ;

(ख) जो विद्यापीठामध्ये किंवा संलग्न महाविद्यालयामध्ये विभागप्रमुख नसेल किंवा प्राचार्य नसेल असा, त्या विषयांतील अध्यापनाचा दहा वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव असणारा एक अध्यापक ;

(ग) (एक) जे एकतर अन्य विद्यापीठांमधील प्राध्यापक असतील किंवा प्रपाठक असतील ; किंवा

(दोन) राष्ट्रीय प्रयोगशाळा किंवा परिसंस्था किंवा मान्याताप्राप्त संस्था यांमधील सहायक संचालकापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करणाऱ्या व्यक्ती असतील ; किंवा

(तीन) संबंधित क्षेत्रांतील तज्ज्ञ असलेल्या व ज्यांचे,—

(क) किमान एक [४][विषयातील संदर्भ पुस्तक] ; किंवा

(ख) मान्यताप्राप्त राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये संशोधन ;

[५][किमान तीन संशोधन प्रबंध प्रसिद्ध झाले आहेत] अशा दोन विख्यात व्यक्ती स्वीकृत करील :

[६][परंतु, त्यांच्यापैकी किमान एक जण तरी, खंड (क) च्या उप-खंड (एक) खालील प्रवर्गामधील असेल.].

[७][(घ) संबंधित विषयातील संशोधन आणि विकासात अग्रेसर असलेल्या उद्योग क्षेत्रातील संशोधन आणि विकास किंवा निर्मिती अधिकारी किंवा गुणवत्ता नियंत्रण अधिकाऱ्यांपेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करणारी व त्या क्षेत्रातील बुर्जूर्ग मानली जाणारी व्यक्ती असेल.].

(४) मंडळाचे सदस्य आपल्यामधून अध्यक्ष निवडून देतील.

[८][(५) अभ्यास मंडळाचा अध्यक्ष सलग दुसऱ्या सत्रास पात्र असणार नाही.].

अभ्यास मंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये.

**३८.** अभ्यास मंडळाला पुढील अधिकार असतील व त्याची पुढील कर्तव्ये असतील,—

(क) व्यवस्थापन परिषद किंवा विद्यापरिषद किंवा संबंधित विद्याशाखा यांच्याकडून किंवा अन्य प्रकारे त्यांच्याकडे विचारार्थ पाठवण्यात आल्यावर, त्याच्या कक्षेतील विषय किंवा विषयांचे गट यातील अभ्यासक्रमांची शिफारस करणे :

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३१(अ)(एक) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३१(अ)(दोन) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३१(अ)(तीन) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३१(ब)(अ)(एक) अन्वये "पुस्तक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३१(ब)(अ)(दोन) अन्वये "प्रबंध प्रसिद्ध झाला आहे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३१(ब)(दोन)(ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ३१(ब)(क) अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ३२(क) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[१][परंतु, विषयामधील किंवा विषयगटामधील ज्ञानात होत असलेली अभिवृद्धी लक्षात घेता मंडळ, एका किंवा अनेक अभ्यासगटांमध्ये शीघ्रतेने बदल करण्यात यावेत असा विशेष ठराव उपस्थित असणाऱ्या सदस्यांपैकी तीनचतुर्थांशापेक्षा कमी असणार नाही इतक्या सदस्यांच्या बहुमताने संमत करील. असे बदल, संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता किंवा विद्याशाखांचे अधिष्ठाता यांच्या सहमतीने आणि कुलगुरूच्या मान्यतेने अंमलात येतील. त्यानंतर, त्यावर केलेली कार्यवाही, विद्याशाखा व विद्यापरिषदेला कळविण्यात येईल.]

(ख) अशा अभ्यासक्रमांसाठी पुस्तके तसेच पाठ्यपुस्तके, पूरक पाठ, संदर्भ पुस्तके व इतर सामग्री यांची शिफारस करणे ;

(ग) विद्यापरिषदेने त्यासंबंधात केलेल्या विनियमांनुसार, मंडळाच्या कक्षेतील अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रमांमध्ये, लेखक व इतर श्रेष्ठ ग्रंथकार यांच्या लेखनातील किंवा साहित्यातील वेचे किंवा साहित्यसंग्रह व तसेच, विद्यापीठाच्या अध्यापकांकडून अभ्यासक्रमाच्या विकासाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले साहित्य यांचा समावेश करण्यासाठी ते तयार व प्रसिद्ध करण्यास मान्यता देण्याबाबत विद्यापरिषदेला शिफारस करणे ;

(घ) अभ्यासक्रमांमधील सुधारणांबाबत संबंधित विद्याशाखेस किंवा विद्याशाखांना सल्ला देणे ;

(ङ) परीक्षा मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या विद्यापीठ परीक्षांसाठी प्राश्निक, परीक्षक आणि नियामक यांच्या नेमणुका करण्याच्या, नामिकेमध्ये अंतर्भाव करण्याकरिता योग्य व्यक्तींच्या नावांची शिफारस करणे ;

(च) पदव्युत्तर पदवी, डॉक्टरेट व उच्च पदव्या, देण्याकरिता, प्रबंधाचे आणि निबंधांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि मौखिक परीक्षा घेण्यासाठी, जेथे जेथे विहित करण्यात आले असेल तेथे तेथे, निर्देशींची नेमणूक करण्यासाठी योग्य व्यक्तींच्या नावांची शिफारस करणे ;

(छ) विषयातील दिशानिदेशन व उजळणी पाठ्यक्रम आयोजित करण्याची सूचना करणे ;

(ज) विद्यापीठाने, महाविद्यालयांच्या संलग्नीकरणास किंवा संलग्नीकरणाच्या मुदतीत वाढ करण्यास किंवा संलग्नीकरण पुढे चालू ठेवण्यास मान्यता देणे आणि परिसंस्थांना मान्यता देणे किंवा मान्यतेच्या मुदतीत वाढ करणे किंवा मान्यता पुढे चालू ठेवणे यांसाठी प्रमाणके आणि आवश्यक गोष्टी निश्चित करण्यासाठी, अध्यापक व त्यांच्या अर्हता, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या उपयोगासाठी असलेले ग्रंथालय, प्रयोगशाळा, उपकरणे व सामग्री यांच्या संबंधात विविध पातळीवरील विषयाच्या अध्यापनाच्या बाबतीतील आवश्यक गोष्टी निश्चित करणे.

[२][(झ) विद्याशाखेतील तीन सदस्य निवडून देणे.]

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३२(अ) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३२(ब) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा मंडळ.

**३९.** [१][विद्यापीठाकरिता, विविध विद्याविषयक व विस्तार कार्यक्रमांची योजना आखण्यासाठी व त्यांवर] नियंत्रण ठेवण्यासाठी एक प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार सेवा मंडळ असेल. या मंडळामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल,—

(क) कुलगुरू—अध्यक्ष ;

(ख) कुलगुरूने नामनिर्देशित केलेल्या आणि विद्यापीठ क्षेत्रातील रहिवाशी असलेल्या प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तार सेवेत काम करणाऱ्या तीन व्यक्ती ;

[२][(ग) संचालक, प्रौढ शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली उप संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती] ;

(घ) अधिसभा व विद्यापरिषद यांनी त्यांच्या सदस्यांमधून प्रत्येकी एक याप्रमाणे नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य [३][यापैकी एक सदस्य जेथे असा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे तथील महाविद्यालयाचा प्राचार्य असेल] ;

(ङ) कुलगुरूने नामनिर्देशित करावयाचा, विद्यापीठ क्षेत्रातील आकाशवाणीच्या केंद्र संचालकांपैकी एक केंद्र संचालक ;

(च) संचालक, राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम किंवा त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती ;

(छ) संचालक, प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार सेवा विभाग, सदस्य-सचिव ;

[४][(ज) समन्वयक, राष्ट्रीय समाज सेवा हा, कार्यक्रमस्वरूपी निमंत्रित असेल.]

(२) मंडळाची बैठक वर्षातून किमान दोन वेळा होईल.

(३) मंडळ, त्याच्या कामाचा एक वार्षिक कार्यक्रम तयार करील व ठराविक कालांतराने त्याचा आढावा घेईल.

(४) मंडळ, वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेला सादर करील.

विद्यार्थी परिषद.

**४०.** (१) विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी वेगवेगळ्या विद्यार्थी संघटनांच्या पाठ्येतर कार्यक्रमांचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता, पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे, एक विद्यापीठ विद्यार्थी परीषद असेल, विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागांसाठी, एक विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद असेल आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालयासाठी किंवा परिसंस्थेसाठी किंवा प्रत्येक संलग्न महाविद्यालयासाठी, एक विद्यार्थी परिषद असेल. या परिषदा राजकीय चळवळींमध्ये भाग घेणार नाहीत.

(२) (क) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) संचालक विद्यार्थी कल्याण—सभापती ;

(तीन) संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण कोणताही असल्यास ;

(चार) समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, कोणताही असल्यास ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३३(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३३(ब) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३३(क) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३३(ड) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

(पाच) मागील पदवी परीक्षेत ज्याने विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली आहे आणि जो एखाद्या विद्यापीठात, परिसंस्थेत किंवा विभागात किंवा संचालित महाविद्यालयात पूर्ण वेळ अभ्यासक्रम पार पाडीत आहे असा, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला प्रत्येक विद्यापीठ विभागातील एक विद्यार्थी ;

(सहा) प्रति कुलगुरूने [१][आणि जर प्रति-कुलगुरू नसेल तर, उप कुलगुरूने] नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी.

(ब) प्रत्येक परिसंस्थेच्या, संचालित महाविद्यालयाच्या [२][किंवा] संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) प्राचार्य—सभापती ;

(दोन) प्राचार्याने नामनिर्देशित केलेला एक अधिव्याख्याता ;

(तीन) राष्ट्रीय छात्र सेनेचा प्रभारी अध्यापक ;

(चार) राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रम अधिकारी ;

(पाच) मागील वर्षी घेण्यात आलेल्या परीक्षेत ज्याने विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली आहे आणि महाविद्यालयात जो पूर्ण वेळ अभ्यासक्रम पार पाडीत आहे असा, प्राचार्याने नामनिर्देशित केलेला प्रत्येक वर्गातील एक विद्यार्थी ;

(सहा) संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, कोणीही असल्यास ;

(सात) ज्याने लक्षणीय यश मिळविले आहे असा, प्राचार्याने नामनिर्देशित केलेला पुढील क्षेत्रातील प्रत्येकी एक विद्यार्थी :—

(१) क्रीडा ;

(२) राष्ट्रीय सेवायोजना आणि प्रौढ शिक्षण ;

(३) राष्ट्रीय छात्र सेना ;

(४) सांस्कृतिक कार्ये.

(आठ) प्राचार्याने नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी :

[३][परंतु, प्रवर्ग (सात) व (आठ) मधील दोन विद्यार्थी, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती किंवा विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्गातील असतील] ;

(३) या दोन्ही परिषदांचे विद्यार्थी सदस्य आपल्यामधूनच संबंधित परिषदेचा सचिव निवडतील.

(४) (क) परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे पोट-कलम (३) खालील संबंधित परिषदांच्या सचिवांमधून निवड करून त्याद्वारे नामनिर्देशित करण्यात आलेल्या पंधराहून अधिक नसतील अशा व्यक्तींचा समावेश असलेली एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल :

परंतु, यापैकी प्रत्येकी किमान एक जागा पुढील वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येईल :—

(एक) अनुसूचित जाती ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३४(अ)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३४(अ)(दोन)(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३४(अ)(तीन)(ब) अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

(दोन) अनुसूचित जनजाती ;

[१][(दोन-क) विमुक्त जाती ;

(दोन-ख) भटक्या जमाती ;]

(तीन) इतर मागासवर्ग ; आणि

(चार) एक जागा विद्यार्थीनीसाठी.

उरलेल्या जागांचे जिल्हानिहाय वाटप करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, निवड करून त्याद्वारे नामनिर्देशित करण्याकरिता, शैक्षणिक कामगिरी, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना व प्रौढ शिक्षण, सांस्कृतिक कार्य किंवा परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये यांमधील सहभाग यासंबंधातील तपशील विचारात घेण्यात येईल.

(ख) अशाप्रकारे रचना करण्यात आलेली विद्यापीठ विद्यार्थी परिषद, स्वतःच आपला अध्यक्ष व सचिव निवडील ;

(ग) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या प्रत्येक बैठकीमध्ये कुलगुरू हा, अध्यक्षस्थानी असेल व विहित करण्यात येतील असे इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित असतील.

(५) कोणताही विद्यार्थी त्याची/तिची पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून नावनोंदणी झाली असेल तरच कोणत्याही विद्यार्थी परिषदेचा सदस्य असण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असेल.

(६) विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी सदस्यांचे नामनिर्देशन प्रत्येक वर्षी, विद्यावर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, व्यवस्थापन परिषदेकडून निश्चित केल्या जाणाऱ्या दिनांकाला केले जाईल. नामनिर्देशित विद्यार्थी सदस्यांचा पदावधी हा, दरम्यानच्या कालावधीत या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट केलेल्या निरर्हता त्यांनी आपल्यावर ओढावून घेतलेल्या नसतील तर, नामनिर्देशनाच्या दिनांकापासून सुरू होऊन विद्यावर्षांच्या शेवटच्या दिनांकापर्यंत असेल, आणि त्यानंतर तो समाप्त होईल.

(७) परिषदेच्या एक-तृतीयांश विद्यार्थी सदस्यांनी बैठकीची गणपूर्ती होईल. बैठकीचे कामकाज चालविण्यासंबंधीचे नियम व कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील, परिषदेची, दर तीन महिन्यांमध्ये किमान एक बैठक होईल.

प्राधिकरणांचे अधिकार, कामे व कर्तव्ये.

**४१.** विद्यापीठाच्या प्राधिकरणांची घटना व या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीअन्वये निर्धारित करण्यात आले नसतील असे त्यांचे अधिकार व कामे किंवा कर्तव्ये ही परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे असतील.

प्राधिकरणांच्या सदस्यांचा पदावधी.

[२][४२. (१) या अधिनियमाअन्वये घटित करण्यात आलेल्या प्रत्येक प्राधिकरणाची मुदत १ सप्टेंबरपासून सुरू होईल आणि उक्त दिनांकापासून ती पाच वर्षांची असेल आणि प्रत्येक प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी हा, मग तो सदस्य कोणत्याही दिनांकाला त्या पदावर आलेला असो-उक्त पाच वर्षांचा कालावधी संपेल त्याच वेळी समाप्त होईल.

(२) ज्या दिनांकाला पद प्रत्यक्षात रिक्त होईल त्या दिनांकापूर्वी तीन महिनांपूर्वीच निवडणूक व नामनिर्देशन प्रक्रियेला प्रारंभ करण्यात येईल आणि त्या वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी ती पूर्ण करण्यात येईल.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३४(ब) अन्वये हे उपखंड जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३५ अन्वये कलम ४२ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(३) प्राधिकरणाच्या मुदतीस प्रारंभ झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत स्वीकृती देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.]

सदस्यत्वाची समाप्ती.

**४३.** या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या परिनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याबाबतीत विद्यापीठाचा अधिकारी म्हणून किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य म्हणून निवडून आलेली, नामनिर्देशित केली, नियुक्त केलेली किंवा स्वीकृत केलेली व्यक्ती, अशा पदाच्या, प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या संबंधातील या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांच्या किंवा सदस्यांच्या कोणत्याही प्रवर्गातील असा अधिकारी किंवा सदस्य म्हणून अशाप्रकारे निवडून येण्यास, नामनिर्देशित केली जाण्यास, नियुक्त केली जाण्यास किंवा स्वीकृती केली जाण्यास पात्र असल्यामुळे ती अशा प्रवर्गाची असण्याचे बंद झाल्याबरोबर लगेचच विद्यापीठाचा असा अधिकारी किंवा अशा प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल आणि असा अधिकारी किंवा सदस्य म्हणून तिने आपले पद रिक्त केले असल्याचे समजण्यात येईल.

प्राधिकरणाचा सदस्य असण्याबद्दलच्या निरर्हता.

**४४.** एखादी व्यक्ती, पुढील कारणांवरून विद्यापीठाच्या प्राधिकरणांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य होण्यास निरर्ह ठरेल :—

(क) ती व्यक्ती, विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल ;

(ख) अमुक्त नादार असेल ;

(ग) ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल जी दोषी ठरली असेल ;

(घ) खाजगी शिकवण्या घेत असेल किंवा खाजगी शिकवण्यांचे खास वर्ग चालवत असेल ;

(ङ) कोणत्याही परीक्षा घेताना, कोणत्याही प्रकारे व कोठेही अनुचित व्यवहार केल्याबद्दल किंवा त्याला चालना दिल्याबद्दल जिला शिक्षा झालेली असेल ;

[१][(च) त्याच्याकार्यालयीन दर्जामुळे त्याला परीक्षेसंबंधात माहीत असलेली कोणतीही गोपनीय बाब, कोणत्याही रीतीने, जनतेला जाहीर करील किंवा जाहीर करवील.]

लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीकरिता सदस्य असण्यास अपात्र असणे.

**४५.** कोणतीही व्यक्ती, यथास्थिती, निवडून आलेला, नामनिर्देशित केलेला, नियुक्त केलेला किंवा स्वीकृत केलेला सदस्य म्हणून, व्यवस्थापन परिषदेचा, विद्यापरिषदेचा किंवा परीक्षा मंडळाचा लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीकरता सदस्य असणार नाही :

परंतु, महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठे प्राधिकरणे व इंतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अधिनियम, १९९३ याच्या प्रारंभाच्या दिनांकाला जी कोणतीही व्यक्ती, विद्यापरिषदेची किंवा कार्यकारी परिषदेची सदस्य होती आणि तिने असे सदस्यत्व लागोपाठच्या दोन मुदतींकरता, यथास्थिति, निवडून दिलेला, नियुक्ती केलेला नामनिर्देशित केलेला किंवा स्वीकृत केलेला सदस्य म्हणून धारण केले होते—मग ती मुदत उक्त दिनांकाला पूर्ण होत असो वा नसो,-—अशी व्यक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर प्रथमच ज्यावेळी या प्राधिकरणे घटित करण्यात येतील त्यावेळी व्यवस्थापन परिषदेचा किंवा विद्यापरिषदेचा असा सदस्य होण्यास पात्र असणार नाही.

१९९३ चा महा. २७.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३६ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

प्राधिकरणाच्या निर्णयाची निर्णायकता.

**४६.** या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून इतर याबाबतीत, विद्यापीठाच्या प्रत्येक प्राधिकरणाला, ते कार्यरत असतांना आणि या अधिनियमाच्या तरतुदींनुसार त्याला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत असताना आणि नेमून दिलेली कामे किंवा कर्तव्ये पार पाडीत असताना, त्यास नेमून दिलेल्या बाबींसंबंधी कार्यवाही करण्याची आणि निर्णय घेण्याची अनन्य अधिकारिता असेल.

प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाद्वारे निवडणूक घेणे.

**४७.** (१) या अधिनियमाखालील विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची प्रत्येक निवडणूक, प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार, एकल संक्रमणीय मताद्वारे व परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल.

(२) अधिनियमात विनिर्दिष्ट केलेला नसेल असा निवडणुकीच्या संबंधातील इतर तपशील हा, परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे असेल.

सदस्यत्वाचा राजीनामा आणि प्रासंगिक रिक्त पद भरणे.

**४८.** (१) पदसिद्धसदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्य आपल्या स्वतःच्या सहीने राजीनामा देऊ शकेल, कुलपतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती, कुलपतीच्या नावे पत्र लिहून राजीनामा देऊ शकेल आणि अन्य कोणताही सदस्य कुलगुरूच्या नावे पत्र लिहून राजीनामा देऊ शकेल. यथास्थिति, कुलपतीने किंवा कुलगुरूने राजीनामा स्वीकारल्यानंतर ती व्यक्ती सदस्य असण्याचे बंद होईल.

(२) एखाद्या प्राधिकरणावर किंवा मंडळावर नामनिर्देशित, निर्वाचित, नियुक्त किंवा स्वीकृत करण्यात आलेली व्यक्ती, त्या प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिली तर, तिने आपले सदस्यत्व सोडले असल्याचे मानण्यात येईल आणि ती ज्या अशा तिसऱ्या बैठकीस अनुपस्थित राहिली असेल त्या बैठकीच्या दिनांकापासून ती सदस्य असण्याचे बंद होईल.

प्राधिकरणाची बैठक.

**४९.** (१) या अधिनियमाद्वारे, अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, प्राधिकरणांच्या, मंडळांच्या किंवा विद्यापीठाकडून किंवा कोणत्याही प्राधिकरणाकडून घटित करण्यात आलेल्या समित्यांच्या, कोणत्याही असल्यास, बैठकींच्या कामकाजाच्या संबंधातील सर्व बाबी परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे असतील.

(२) प्राधिकरणाची किंवा मंडळाची बैठक, त्याच्या अध्यक्षाने ठरविलेल्या दिनांकास, त्याच्या सचिवाने दिलेल्या नोटिशीद्वारे बोलाविण्यात येईल.

(३) अन्यथा तरतूद केलेले असेल त्याखेरीज अन्य बाबतीत, बैठकीची गणपूर्ती सर्वसाधारणपणे विद्यमान सदस्यांच्या एक तृतीयांश इतक्या संख्येने होईल. बैठकीची गणपूर्ती होत नसेल तर, अध्यक्ष त्याच दिवशी किंवा नंतरच्या दिनांकास विशिष्ट वेळेपर्यंत बैठक स्थगित करील आणि अऐशा तहकुबीनंतर घेण्यात येणाऱ्या बैठकीसाठी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

(४) ज्या बाबतीत या [१][परिनियमांद्वारे] किंवा तद्न्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षपद, अध्यक्ष किंवा सभापती यांनी स्वीकारण्याची तरतूद नसेल किंवा ज्याबाबतीत अशा प्रकारे तरतूद करण्यात आलेला अध्यक्ष किंवा सभापती अनुपस्थित असेल व कोणत्याही अन्य व्यक्तीने अध्यक्षपद स्वीकारण्याची तरतूद करण्यात आलेली नसेल त्याबाबतीत, उपस्थित असलेले सदस्य, त्यांच्यातून एका व्यक्तीची बैठकीचे अध्यक्षपद भूषविण्यासाठी निवड करतील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३७(अ) अन्वये "या परिनिययाद्वारे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

(५) अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, कार्यसूचीवरील सर्व बाबी, प्रश्न, विषय किंवा प्रस्ताव यांवर उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल. अध्यक्षास मत असेल. समसमान मते पडतील त्याबाबतीत, अध्यक्षास निर्णायक मत असेल. सचिव हा सदस्य नसेल तर, त्यास विचारविमर्शात भाग घेण्याचा हक्क असेल. परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

[१][(६) प्राधिकरणाने कायम निमंत्रित म्हणून पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याला, प्राधिकरणाच्या बैठकींच्या सूचना मिळण्याचा, आणि तो संबंधित असलेल्या विषयाच्या विचारविमर्शात भाग घेण्याचा हक्क असेल ; परंतु मतदानाचा हक्क असणार नाही.]

**५०.** (१) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा इतर मंडळाच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त एखाद्या सदस्याचे पद, त्याचा नेहमीचा पदावधी संपण्यापूर्वी रिक्त होईल तेव्हा पोट-कलम (२) अन्वये घटित करण्यात आलेल्या स्थायी समितीकडून असे रिक्त पद एखाद्या सदस्यास नामनिर्देशित करून, शक्य तितक्या लवकर, भरण्यात येईल. अशा प्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती ही, अन्यथा त्याच प्रवर्गातून उक्त प्राधिकरणावर किंवा मंडळावर निवडून येण्यास पात्र असणारी व्यक्ती असेल. अशा प्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती ही, ज्याच्या पदावर तिचे नामनिर्देशन झाले असेल त्या सदस्याने, जर ते पद रिक्त झाले नसते तर, जितक्या मुदती करता ते पद धारण केले असते तितक्याच मुदतीकरता ते पद धारण करील. प्रासंगिक रिक्त पद व ते स्थायी समितीने भरणे.

[२][(२) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेली रिक्त पदे भरण्याकरिता असलेल्या स्थायी समितीची घटना पुढीलप्रमाणे असेल :—

(क) अधिसभेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले चार सदस्य, ज्यांपैकी एक अधिष्ठाता व एक शिक्षक असेल ;

(ख) व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले तीन सदस्य, ज्यांपैकी एक, व्यवस्थापन परिषदेच्या व्यवस्थापनाचा महिला प्रतिनिधी व एक शिक्षक असेल ;

(ग) विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले तीन सदस्य, ज्यांपैकी एक, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजातिमधील किंवा विमुक्त जाती/भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती चक्रिय आरक्षणाप्रमाणे असेल व एक शिक्षक असेल ; आणि

(घ) कुलपतींचे व्यवस्थापन परिषदेवरील नामनिर्देशित सदस्य.]

(३) स्थायी समितीचा सभापती, तिचे सदस्य, आपल्यामधून निवडून देतील.

(४) स्थायी समितीचा पदावधी अधिसभेच्या पदावधी बरोबरच समाप्त होईल.

## प्रकरण पाच

## परिनियम, आदेश आणि विनियम

**५१.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, परिनियमांमध्ये पुढे दिलेल्या सर्व किंवा यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :— परिनियम.

(१) सन्मान्य पदव्या प्रदान करणे आणि दीक्षान्त समारंभ आयोजित करणे ;

(२) विद्यापीठ विभाग, परिसंस्था, संचालित महाविद्यालये, उच्च शिक्षण परिसंस्था, संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास परिसंस्था व वसतिगृह सुरू करणे व ती चालविणे ;

(३) विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(४) विद्यापीठाच्या प्राधिकरणांचे अधिकार व कर्तव्ये ;

(५) विद्यापीठ कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता व सेवा शर्ती यांचे नियमन करणारी तत्त्वे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३७(ब) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(६) विद्यापीठाची प्राधिकरणे, मंडळे किंवा समित्या यांच्या सदस्यांना निरर्ह ठरविण्यासाठी तरतुदी ;

(७) विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था आणि संचालित महाविद्यालये बंद करणे ;

(८) राज्य शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे, विद्यापीठाचे आणि संलग्न महाविद्यालयांचे (राज्य शासन किंवा केंद्र सरकार आणि स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून चालविली जाणारी महाविद्यालये किंवा परिसंस्था खेरीज करून) अध्यापक, अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या अर्हता, सेवा-प्रवेश, कार्यभार, आचारसंहिता, पदावधी, कर्तव्ये आणि सेवाशर्ती व तसेच त्यांचे नियतकालिक मूल्यमापन, निवृत्तिवेतन, उपदान आणि भविष्यनिर्वाह निधी यांची तरतूद आणि त्यांची सेवा समाप्त करण्याची रीत ;

(९) विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यापीठाच्या निधीचा वापर करणे ;

(१०) महाविद्यालयांच्या संलग्नीकरणाची किंवा महाविद्यालयांचे संलग्नीकरण काढून घेण्याची मानके ;

(११) राज्य शासनाच्या मान्यतेच्या अधीनतेने, विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांना स्वायत्त दर्जा देण्यासाठी मानके ;

(१२) व्यक्ती व संघटना यांच्याकडून मिळणारे विश्वस्त निधी, मृत्युपत्रित देणग्या, देणग्या, दाननिधी व अनुदाने स्वीकारणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(१३) राज्य शासनाच्या धोरणानुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाति आणि इतर मागवर्ग यांमधील व्यक्तीसाठी विद्यापीठातील, संलग्न महाविद्यालयातील आणि मान्यताप्राप्त परिसंस्थामधील अध्यापकाची, अधिकाऱ्यांची तसेच इतर कर्मचाऱ्यांची पुरेशा संस्थेतील पदे राखून ठेवण्याची तरतूद करणे ;

(१४) विद्यापीठातील कामाचे दिवस, प्रत्यक्ष शिक्षणाचे दिवस, रविवारखेरीज करून, इतर सुट्या, मोठी सुटी आणि सत्रे ;

(१५) राज्य शासन किंवा केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी चालविलेली महाविद्यालये किंवा परिसंस्था खेरीजकरून, विद्यापीठाने, संलग्न महाविद्यालयाने आणि मान्यताप्राप्त परिसंस्थाचे कसूरदार अध्यापक, अधिकारी आणि अन्य कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करणे ;

(१६) राज्य शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून, लोकहितास्तव विद्यापीठाने एखाद्या महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे व्यवस्थापन स्वतःकडे घेणे किंवा ते हस्तांतरित करणे आणि अशा प्रकारे व्यवस्थापन स्वतःकडे घेण्याच्या किंवा ते हस्तांतरित करण्याच्या शर्ती ;

(१७) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी विहित करण्यात यावयाची किंवा आवश्यक असेल अशी कोणतीही बाब.

परिनियम कसे करावयाचे.

**५२.** (१) अधिसभेला यात यानंतर तरतूद केलेल्या रीतीने नियम करता येतील, त्यात सुधारणा करता येतील किंवा त्यांचे निरसन करता येईल.

(२) अधिसभेला स्वतःहून किंवा व्यवस्थापन परिषदेकडून प्रस्ताव आल्यानंतर परिनियमाचा मसुदा विचारात घेता येईल. व्यवस्थापन परिषदेने प्रस्तावित केलेला नसेल त्या मसुद्याच्या बाबतीत, अधिसभा, त्यावर विचार करण्यापूर्वी व्यवस्थापन परिषदेचा अभिप्राय मिळवील :

परंतु व्यवस्थापन परिषदेने, तिला मसुदा मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आपला अभिप्राय पाठवला नाही तर, अधिसभेला त्या मसुद्यावर विचार करण्याच्या कामास प्रारंभ करता येईल.

(३) अधिसभेला आवश्यक वाटले तर, तिच्यापुढे विचारार्थ आलेल्या कोणत्याही परिनियमाच्या मसुद्याच्या संबंधात विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा, प्राधिकरणाचा किंवा मंडळचा अभिप्राय देखील मिळवता येईल :

परंतु, असा कोणताही मसुदा विद्याविषयक बाबींशी संबंधित असेल त्याबाबतीत, अधिसभा, त्यावर विचार करण्यापूर्वी विद्यापरिषदेचा अभिप्राय मिळवील.

(४) अधिसभेने संमत केलेला प्रत्येक परिनियम, कुलपतीकडे सादर करण्यात येईल. कुलपतीला त्या परिनियमाला अनुमती देता येईल किंवा तो रोखून ठेवता येईल किंवा फेरविचारासाठी तो अधिसभेकडे परत पाठवता येईल.

(५) अधिसभेने संमत केलेला कोणताही परिनियम, कुलपतीकडून अनुमती देण्यात येईपर्यंत विधिग्राह्य ठरणार नाही किंवा अंमलात येणार नाही.

(६) पूर्ववर्ती पोट-कलमांत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कुलपतीस, स्वतः होऊन किंवा राज्य शासनाशी विचारविनियम करून, तो विर्निदिष्ट करील अशा कोणत्याही बाबीच्यासंबंधात परिनियमांमध्ये तरतुदी करण्याविषयी विद्यापीठाला निदेश देता येईल आणि असे निदेश प्राप्त झाल्यापासून साठ दिवसांच्या आत, त्यांची अंमलबजावणी केली नाही तर, कुलपतीस, अशा निदेशांची अंमलबजावणी करणे तिला शक्य न झाल्याबद्दलची असमर्थता कळवली असे परिनियम करता येतील किंवा त्या परिनियमात योग्य अशा सुधारणा करता येतील.

**५३.** या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विहित केलेल्या शर्तींना अधीन राहून, व्यवस्थापन परिषदेला, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करण्याकरिता आदेश तयार करता येतील :-
— आदेश व त्यांचे विषय.

(एक) विद्यार्थ्यांना, पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी यांच्या अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यासंबंधीच्या शर्ती ;

(दोन) विद्यार्थ्यांना, विद्यापीठातील किंवा महाविद्यालयांमधील अशा अभ्यासक्रमांना उपस्थित राहता येण्यासाठी त्यांची नावनोंदणी करण्याकरिता आकारावयाची फी (शिकवणी फी व वसतिगृहाचा खर्च धरून)—ही फी शक्यतोवर एकाच स्थानिक क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांसाठी समान असेल—या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी यांच्या परीक्षांसाठी आकारावयाची प्रवेश फी आणि पदवीधरांसाठी नोंदणी फी ;

(तीन) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा निवास, त्यांची वर्तणूक व शिस्त या संबंधातील शर्ती आणि शिस्तभंगासाठी व पुढील बाबींसह गैरवर्तणुकीसाठी त्यांच्याविरुद्ध करण्यात येणारी कारवाई :—

(क) परीक्षेच्या वेळी गैरप्रकार करणे किंवा त्यांना अपप्रेरणा देणे ;

(ख) परीक्षांचा प्रभारी अधिकारी किंवा विद्यापीठाचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी यांनी केलेल्या कोणत्याही अधिकृत चौकशीस हजर राहण्यास किंवा साक्ष देण्यास नकार देणे ;

(ग) विद्यापीठात किंवा विद्यापीठाबाहेर गैरशिस्तीची किंवा इतर आक्षेपार्ह वर्तणूक ;

(चार) विद्यापीठाचे विभाग, महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांमधील अध्यापकांच्या अर्हता व त्यांचे वर्गीकरण ;

(पाच) परीक्षकांच्या नेमणुका व कर्तव्ये यांचे नियमन करणाऱ्या शर्ती ;

(सहा) परीक्षा व इतर चाचण्या घेणे आणि परीक्षकांनी उमेदवारांचे मूल्यमापन करण्याची किंवा त्यांची परीक्षा घेण्याची रीत ;

(सात) विद्यापीठाच्या अध्यापकांच्या संबंधातील मान्यता आणि विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांमध्ये शिकविण्यासाठी व्यक्तींना ज्या शर्तींच्या अधीन राहून, अर्हताप्राप्त म्हणून मान्यता देण्यात येईल त्या शर्ती ;

(आठ) महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, सभागृहे व वसतिगृहे यांची तपासणी ;

(नऊ) सभागृहे व वसतिगृहे यांची मान्यता ;

(दहा) विद्यापीठासाठी किंवा विद्यापीठाच्यावतीने संविदा किंवा करार करण्याची पद्धत ;

(अकरा) महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था यांनी विद्यार्थ्यांच्या बदलीसंबंधात अनुसरावयाचे व अंमलबजावणी करावयाचे नियम ;

(बारा) विद्यार्थी संघटना व महाविद्यालयांमधील इतर संघटना यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(तेरा) हा अधिनियम किंवा परिनियम याद्वारे किंवा तद्न्वये ज्यांच्यासाठी आदेशाद्वारे तरतूद करावयाच्या किंवा तरतूद करता येईल अशा अन्य सर्व बाबी ; आणि

(चौदा) सामान्यतः हा अधिनियम किंवा परिनियम यांद्वारे किंवा तद्न्वये व्यवस्थापन परिषदेला प्रदान केलेल्या अदिकारांचा वापर करण्यासाठी किंवा तिच्यावर लादलेल्या कर्तव्यांचे पालन करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या मते आवश्यक असलेल्या तरतुदी करण्यासंबंधातील सर्व बाबी.

आदेश व ते तयार करणे.

**५४.** (१) व्यवस्थापन परिषदेला, यात यापुढे दिलेल्या पद्धतीने आदेश तयार करता येतील, त्यात सुधारणा करता येतील किंवा ते निरसित करता येतील.

(२) व्यवस्थापन परिषद, लगतपूर्ववर्ती कलमाचे खंड (एक) ते (सात) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबी, किंवा विद्यापीठातील अध्यापन व परीक्षा यांचा दर्जा राखण्याशी संबंधित अन्य कोणतीही बाब यांबाबतचा कोणताही आदेशाचा मसुदा विद्यापरिषदेकडून प्रस्तावित करण्यात आल्याखेरीज, तो आदेश तयार करणार नाही.

(३) व्यवस्थापन परिषदेला पोट-कलम (२) अन्वये विद्यापरिषदेने प्रस्तावित केलेला कोणताही मसुद्यांत सुधारणा करण्याचा अधिकार असणार नाही. परंतु, ती, तो अमान्य करू शकेल किंवा व्यवस्थापन परिषद सूचना करील अशा कोणत्याही सुधारणांसह भागशः किंवा पूर्णतः विद्यापरिषदेकडे पुनर्विचारार्थ परत पाठवू शकेल.

(४) व्यवस्थापन परिषदेने तयार केलेले सर्व आदेश ती निदेश देईल अशा दिनांकापासून अंमलात येतील, परंतु, असा तयार केलेला प्रत्येक आदेश, दोन आठवड्यांच्या आत कुलपतीला सादर करण्यात येईल. कुलपतीस आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून चार आठवड्यांच्या आत त्याची अंमलबजावणी स्थगित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेला निदेश देण्याचा अधिकार असेल आणि तो, शक्य तितक्या लवकर, त्यावरील त्याचा आक्षेप व्यवस्थापन परिषदेला कळवील. त्याला, व्यवस्थापन परिषदेचा अभिप्राय मिळाल्यानंतर, आदेश स्थगित करण्यासंबंधातील आदेश मागे घेता येईल किंवा तो आदेश नामंजूर करता येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

**५५.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विहित केलेल्या शर्तींना आणि व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, विद्यापरिषदेला, हा अधिनियम, परिनियम किंवा आदेश याद्वारे किंवा त्याअन्वये ज्या सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी विनियमांद्वारे तरतूद करावयाची असेल किंवा करता येईल अशा, सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी आणि पूर्णपणे तिच्याशी संबंधित अशा अन्य सर्व बाबींसाठी तरतूद करण्याकरिता, हा अधिनियम, परिनियम व आदेश यांच्याशी सुसंगत असे विनियम करता येतील. विनियम व नियम.

(२) कोणत्याही प्राधिकरणास किंवा संस्थेस, व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वमान्यतेस अधीन राहून, पुढील बाबींसाठी, हा अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम यांच्याशी सुसंगत असे नियम करता येतील :—

(क) त्याच्या बैठकींचा दिनांक व वेळा आणि त्यात करावयाचे कामकाज यांची नोटीस देणे ;

(ख) बैठकींची पद्धत व गणपूर्तीसाठी आवश्यक असलेली सदस्यांची संख्या यांचे नियमन करणे, आणि अशा बैठकीच्या कार्यवृत्तांचा अभिलेख ठेवणे ;

(ग) केवळ असे प्राधिकरण किंवा संस्था यांच्याशी संबंधित अशा सर्व बाबींसाठी तरतूद करणे ;

(३) असे नियम व्यवस्थापन परिषदेला सादर करण्यात येतील व त्या परिषदेला, ते करणारे प्राधिकरण किंवा संस्था यांच्या हेतूबाबत खात्री करून घेतल्यानंतर व त्यावर विचार केल्यानंतर, तिला योग्य वाटेल, अशा पद्धतीने त्यात सुधारणा करता येईल किंवा ते रद्द करता येतील.

## प्रकरण सहा

## **महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद**

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद.

**५६.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद स्थापन करील.

[१][(२) महाराष्ट्र राज्य उच्चा शिक्षण परिषदेची रचना पुढीलप्रमाणे असेल :—

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| (२) | उच्च व तंत्र शिक्षण मंत्री | उपाध्यक्ष |
| (३) | उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री | सदस्य |
| (४) | महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले महाराष्ट्र विधानसभेचे दोन सदस्य. | सदस्य |
| (५) | महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींनी नामनिर्देशित केलेला महाराष्ट्र विधानपरिषदेचा एक सदस्य. | सदस्य |
| (६) | कुलपतीने नामनिर्देशित केलेले चार शिक्षण तज्ज्ञ किंवा शिक्षण प्रशासक, यांपैकी एक व्यवस्थापनाचा प्रतिनिधी असेल. | सदस्य |
| (७) | कुलपतीने, प्राचार्यांमधून नामनिर्देशित केलेला एक प्राचार्य | सदस्य |
| (८) | कुलपतीने, शिक्षकांमधून नामनिर्देशित केलेला एक शिक्षक | सदस्य |

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २(१) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

(९) कुलपतीने राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंमधून नामनिर्देशित केलेले तीन कुलगुरू. . . सदस्य

(१०) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग . . . . सदस्य

(११) सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग . . . . सदस्य

(१२) सचिव, नियोजन विभाग . . . . सदस्य

(१३) सचिव, वित्त विभाग . . . . सदस्य

(१४) सचिव, क्रीडा विभाग . . . . सदस्य

(१५) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य . . . . सदस्य

(१६) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य . . . . सदस्य-सचिव.]

(३) [१][महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद ही राज्य शासनाचे प्रभारी प्राधिकरण असेल आणि तिच्याकडे राज्य उच्च शिक्षणाचा प्रभार असेल व त्यास ती जबाबदार राहील. ही परिषद, नियोजन, संनियंत्रण, समन्वयन व मूल्यमापन करणारे प्राधिकरण असेल आणि] तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व व्यवसाय शिक्षण यांसह उच्च शिक्षणासाठी तज्ज्ञमंडळ म्हणून काम करील. ती राज्य शासनाला पुढील गोष्टींच्या बाबतीत सल्ला देईल :—

(क) समाजाचे एकूण अग्रक्रम, दृष्टीकोन व गरजा आणि उच्च शिक्षणाकडून असणाऱ्या अपेक्षा लक्षात घेऊन, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील निरनिराळ्या विषयांवर कार्यक्रम तयार करणे ;

(ख) विद्यापीठांमधील शिक्षणाचा दर्जा निश्चित करण्याच्या व त्यात एकरूपता राखण्याच्या संबंधात राज्य शासनाला सल्ला देणे ;

(ग) निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य व समन्वय यास चालना देण्यासंबंधात सल्ला देणे आणि एकीकडे विद्यापीठ व दुसरीकडे उद्योग आणि इतर संघटना यांच्यात आदान-प्रदान करण्यास कितपत वाव आहे ते पाहणे ;

(घ) उद्योग व इतर साधने यांच्यामधून उच्च शिक्षणासाठी अतिरिक्त साधनसंपत्ती उभारण्यासाठी मार्ग व साधने सुचवणे ;

(ङ) या अधिनियमाच्या तरतुदी पूर्ण करताना, विद्यापीठांनी हाती घेतलेल्या निरनिराळ्या आंतरविद्यापीठ कार्यक्रमांसंबंधात सल्ला देणे ;

(च) विद्यापीठाचे शिक्षक, महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्यापीठ विभागाचे शिक्षक यांच्यामध्ये अधिक सहकार्य व प्रतिसाद व अदलाबदल राहावी म्हणून असलेल्या कार्यक्रमांसंबंधात सल्ला देणे ;

[२][(छ) विद्यापीठांचा विकासविषयक कार्यक्रम विचारात घेणे व त्यास मान्यता देणे ;

(ज) उच्च शिक्षण क्षेत्रातील अध्यापन, संशोधन व विस्तार यासंबंधीच्या विविध कामांसाठी आंतरविद्यापीठ कार्यक्रम सुरू करणे ;

(झ) मागासवर्गांसाठी, ग्रामीण व आदिवासी समूहांसाठी, महिला व कोणत्याही अशा विनिर्दिष्ट गटांसाठी उच्च शिक्षण उपलब्ध करून देऊन प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी हाती घ्यावयाच्या उपाययोजना करण्याबाबत राज्य शासनास व विद्यापीठांना शिफारस करणे.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ३९(ब)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३९(ब)(दोन) अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

(४) पदसिध्द सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्यांचा पदावधी पाच वर्षे एवढा असेल.

(५) महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषदेची बैठक एका वर्षात किमान दोनदा घेण्यात येईल.

(६) या कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे, परिषदेला विद्यापीठांच्या कामकाजाच्या व्यवस्थापनातील कोणतीही कार्यकारी कामे पार पाडण्याचा अधिकार मिळणार नाही.

## प्रकरण सात

## अध्यापक आणि कर्मचारी

**५७.** (१) प्रत्येक विद्यापीठामध्ये, विद्यापीठाचे, महाविद्यालयाचे. परिसंस्थांचे व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी आणि व्यवहार्य असेल तेथवर, सहा महिन्यांच्या आत तक्रारींची सुनावणी करण्यासाठी व त्याबाबतीत निर्णय देण्यासाठी एक तक्रार निवारण समिती असेल आणि ही समिती व्यवस्थापन परिषदेला अहवाल देईल. तक्रार निवारण समिती.

(२) न्यायाधिकरणाच्या अधिकारितेत नसलेली गाऱ्हाणी किंवा तक्रारी स्वीकारणे व विचारात घेणे आणि तिला योग्य वाटेल अशी कारवाई करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेला अहवाल देणे हे, तक्रार निवारण समितीच्या दृष्टीने कायदेशीर असेल आणि अशा अहवालावरील व्यवस्थापन परिषदेचा निर्णय अंतिम असेल.

(३) तक्रार निवारण समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) प्रति-कुलगुरू, जेव्हा प्रति-कुलगुरू नसेल त्याबाबतीत, व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला व्यवस्थापन परिषदेचा सदस्य . . अध्यक्ष ;

(ख) व्यवस्थापन परिषदेने, तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले तिचे [१][दोन] सदस्य [२][त्यापैकी एक हा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचा किंवा विमुक्त जातीचा/भटक्या जमातीचा किंवा इतर मागासवर्गाचा, चक्रिय आरक्षणाप्रमाणे असेल] . . सदस्य ;

[३][(खक) अधिसभेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले दोन सदस्य, त्यापैकी एक सदस्य व्यवस्थापनाची महिला प्रतिनिधी व एक शिक्षक असेल . . सदस्य ;

(खख) विद्यापरिषदेने, तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले दोन सदस्य, त्यांपैकी एक प्राचार्य व एक शिक्षक असेल] . . सदस्य ;

(ग) कुलसचिव . . . . सदस्य-सचिव ;

(४) [४][ * * * * ] . . . . सदस्य ;

**५८.** (१) कलम ६६ च्या तरतुदींना अधीन राहून, कलम ५९ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात, विद्यापीठांचे कर्मचारी व त्यांची संबंधित विद्यापीठे यांच्यामधील आणि संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील कर्मचारी आणि त्यांची संबंधित व्यवस्थापने यांच्यामधील विवादांच्या अभिनिर्णयासाठी महाराष्ट्र राज्यातील [५][एक किंवा अधिक विद्यापीठांकरिता] एक किंवा अधिक विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणे असतील. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४० (अ)(एक)(अ) अन्वये "चार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४०(अ)(एक)(बी) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४०(अ)(दोन) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४०(ब) अन्वये हे पोट-कलम वगळण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४१ अन्वये "प्रत्येक विद्यापीठाकरिता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) अध्यापक आणि कर्मचारीवर्ग व विद्यापीठ, कोणत्याही संलग्न महाविद्यालयाचे किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचे (राज्य शासन, केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याद्वारे ज्या चालविण्यात येतात किंवा ज्यांचे व्यवस्थापन करण्यात येते त्याव्यतिरिक्त) व्यवस्थापन यांच्यात, कलम ५९ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गोष्टींशी संबंधित किंवा त्यातून उद्‌भवणाऱ्या विवादांच्या किंवा मतभेदांच्या अभिनिर्णयासाठी, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण या नावाने ओळखली जाणारी एक किंवा अधिक न्यायाधिकरणे घटित करील ;

(३) या न्यायाधिकरणात, राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात यावयाच्या केवळ एकाच व्यक्तीचा अंतर्भाव असेल.

(४) जर एखादी व्यक्ती,–

(क) ती उच्च न्यायालयाची न्यायाधीश नसेल किंवा राहिलेली नसेल ; किंवा

(ख) उच्च न्यायालयाची न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्ह नसेल,

तर ती, न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्त केली जाण्यास अर्हताप्राप्त असणार नाही :

परंतु असे की, खंड (ख) अन्वये नियुक्त करण्यात येणारी व्यक्ती ही, मुंबईच्या उच्च न्यायालयातील मुख्य न्यायमूर्तींनी शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेमधील असेल.

(५) न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी म्हणून होणारी एखाद्या व्यक्तीची नियुक्ती ही, पूर्ण वेळेकरता असेल आणि ती, राज्य शासन, प्रत्येक प्रकरणी, वेळोवेळी ठरवील अशा, परंतु एकूण तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी असेल.

(६) पीठासीन अधिकाऱ्याचे पारिश्रमिक आणि सेवेच्या इतर शर्ती या, राज्य शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे असतील.

(७) विद्यापीठ, या अधिनियमाखालील न्यायाधिकरणाची कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असा, लिपिकीय कर्मचारीवर्ग न्यायाधिकरणास उपलब्ध करून देईल.

(८) पीठासीन अधिकाऱ्यास व त्याच्याकडे असलेल्या कर्मचारीवर्गास अनुज्ञेय असलेले पारिश्रमिक, निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी अंशदान, रजा भत्ता आणि इतर भत्ते व सोयी यांसाठी होणारा सर्व खर्च हा, विद्यापीठ निधीतून भागविण्यात येईल.

(९) न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकाऱ्याचे पद तात्पुरते रिक्त होईल ते खेरीजकरून एरव्ही, ते पद रिक्त झाल्यास, राज्य शासन, शक्य तितक्या लवकर, परंतु, कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यांच्या आत, असे पद भरण्यासाठी दुसऱ्या अर्हताप्राप्त व्यक्तीची नियुक्ती करील. पूर्वीच्या पीठासीन अधिकाऱ्यासमोर प्रलंबित असेल असे कोणतेही कामकाज, त्याच्या उत्तराधिकाऱ्यास पद रिक्त झाले तेव्हा, ते कामकाज ज्या टप्प्यापर्यंत आले होते तेथून पुढे चालू ठेवता येईल व निकालात काढता येईल.

अपील करण्याचे अधिकार.

**५९.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा करारात काहीही अंतर्भूत असले तरी, विद्यापीठाने किंवा व्यस्थापनाने ज्यास बडतर्फ केले असेल किंवा पदावरून काढून टाकले असेल किंवा ज्याच्या सेवा अन्यथा समाप्त केल्या असतील किंवा ज्यास पदावनत केले असेल आणि जो व्यथित झाला असेल, अशा (राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून व्यवस्थापन करण्यात येत असलेले आणि चालविण्यात येत असलेल्या खेरीजकरून

इतर) कोणत्याही विद्यापीठातील [१][***] महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील कोणत्याही कर्मचाऱ्यास (मग तो अध्यापक असो किंवा अन्य कर्मचारी असो) अपील करण्याचा हक्क असेल व अशा कोणत्याही आदेशाविरुद्धचे अपील न्यायाधिकरणाकडे दाखल [२][करण्यात येईल] :

परंतु, एखाद्या बाबीचा निर्णय न्यायालयाकडून किंवा सक्षम अधिकारिता असणाऱ्या न्यायाधिकरणाकडून आधीच करण्यात आला असेल किंवा ती बाब या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला अशा न्यायालयासमोर किंवा न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असेल किंवा हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी कोणत्याही वेळी बडतर्फीचा, कामावरून काढून टाकण्याचा, अन्यथा सेवासमाप्तीचा किंवा पदावनतीचा आदेश व्यवस्थापनाने काढला असेल व ज्या बाबतीत अपील दाखल करण्याची मुदत टळून गेली असेल अशा कोणत्याही प्रकरणी, असे कोणतेही अपील न्यायाधिकरणाकडे दाखल करता येणार नाही.

(२) कर्मचाऱ्याकडून, यथास्थिति, बडतर्फीचा, कामावरून काढून टाकण्याचा, अन्यथा सेवा समाप्त केल्याचा किंवा पदावनतीचा आदेश त्यास मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत न्यायाधिकरणाकडे असे अपील दाखल करता येईल :

परंतु, असा आदेश या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी काढण्यात आला असेल त्याबाबतीत, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांची मुदत समाप्त झाली नसेल तर, असे अपील करता येईल.

(३) पोट-कलम (२) मध्ये काही अंतर्भूत असले तरीही, तीस दिवसांच्या उक्त मुदतीत अपील दाकल न करण्यास, अपीलकारास पुरेसे कारण होते याबद्दल, न्यायाधिकरणाची खात्री झाल्यास, न्यायाधिकरणास, त्याच्याकडे उक्त मुदतीनंतर करण्यात आलेले अपील दाखल करून घेता येईल.

(४) प्रत्येक अपीलासोबत चारशे रुपये फी भरण्यात येईल. ही फी परत करण्याजोगी असणार नाही व ती विद्यापीठ निधीमध्ये जमा करण्यात येईल :

परंतु, राज्य शासनाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी त्याला योग्य वाटेल, अशी सुधारणा फीमध्ये करणे कायदेशीर असेल.

**६०.** (१) अपीले दाखल करून घेणे, त्यांची सुनावणी करणे व ती निकालात काढणे या प्रयोजनांसाठी न्यायाधिकरणास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये अपील न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आले आहेत तेच अधिकार असतील व त्यास, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी, त्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्तीवर तहकूब करण्याचा देखील अधिकार असेल, तसेच या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्याला प्रदान करण्यात आले असतील असे इतर अधिकार असतील. (न्यायाधिकरणाचे सर्वसाधारण अधिकार व कार्यपद्धती.) (१९०८ चा ५.)

(२) न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी, न्यायाधिकरणाने आपले काम चालविण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती, तसेच, ज्या ठिकाणी व ज्यावेळी ते आपल्या बैठकी (Sittings) घेईल ते ठिकाण किंवा ती ठिकाणे व वेळ ठरवील.

(३) प्रत्येक अपिलाचा निर्णय, शक्य तितक्या लवकर, करण्यात येईल. न्यायाधिकरण प्रत्येक बाबतीत, त्यास अपील मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अपिलाचा निर्णय करण्याचा प्रयत्न करील. या कालावधीमध्ये एखादे अपील निकालात काढणे न्यायाधिकरणास शक्य झाले नाही तर, त्याबद्दलची कारणे न्यायाधिकरण आपल्या अभिलेखांमध्ये नमूद करून ठेवील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४२(अ) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४२(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

उचित अनुतोष व निदेश देण्याचे न्यायाधिकरणाचे अधिकार.

**६१.** (१) एखादे अपील मिळाल्यावर, दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिल्यानंतर, ते अपील, कलम ५९ चे पोट-कलम (१) विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबीशी संबंधित नाही, किंवा त्यांना चालविण्यायोग्य नाही किंवा विद्यापीठाच्या किंवा व्यवस्थापनाच्या आदेशांमध्ये हस्तक्षेप करण्यास पुरेसे कारण नाही याबाबत न्यायाधिकरणाचे समाधान झाल्यास त्यास ते अपील फेटाळता येईल.

(२) दोन्ही पक्षकारांस आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिल्यानंतर एखाद्या अपिलाबाबत, बडतर्फीचा, कामावरून काढून टाकण्याचा, अन्यथा सेवा समाप्तकरण्याचा किंवा पदावनतीचा आदेश त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या, कराराच्या किंवा सेवेच्या शर्तीच्या विरुद्ध किंवा अन्यथा अवैध किंवा अयोग्य होता, असा निर्णय न्यायाधिकरणाने दिला तर, न्यायाधिकरणास, यथास्थिति, विद्यापीठाचा किंवा व्यवस्थापनाचा आदेश अंशतः किंवा पूर्णतः रद्द करता येईल व यथास्थिति, विद्यापीठास किंवा व्यवस्थापनास पुढील निदेश देता येतील :—

(क) कर्मचाऱ्यास पुन्हा त्या पदावर किंवा न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील अशा खालच्या पदावर नेमणे ;

(ख) कर्मचाऱ्यास, त्याने पदावनतीपूर्वी धारण केलेला दर्जा किंवा न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील असा कोणताही खालचा दर्जा प्राप्त करून देणे ;

(ग) न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या वित्तलब्धीची थकबाकी कर्मचाऱ्यास देणे ;

(घ) यथास्थिति, बडतर्फी, कामावरून काढून टाकणे, अन्यथा सेवा समाप्त करणे किंवा पदावनती, याऐवजी न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील अशी त्यापेक्षा कमी शिक्षा देणे ;

(ङ) कर्मचाऱ्यांस पुन्हा कामावर न घेण्याचा निर्णय घेण्यात आला असेल अशा प्रकरणात किंवा कोणत्याही इतर योग्य प्रकरणात, कर्मचाऱ्यास गमवावी लागलेली नोकरी आणि त्यानंतर योग्य ती नोकरी मिळण्याची किंवा न मिळण्याची शक्यता या गोष्टी विचारात घेऊन, भरपाई म्हणून न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या सहा महिन्यांच्या वित्तलब्धीपेक्षा अधिक असेल इतकी रक्कम कर्मचाऱ्यास देणे ; किंवा

(च) प्रकरणातील परिस्थिती विचारात घेऊन, न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील असा अन्य अनुतोष (रिलिफ) कर्मचाऱ्यास देणे व अशा इतर शर्तीचे पालन करणे.

(३) न्यायाधिकरणाने ज्या कोणत्याही देय रकमा कर्मचाऱ्यांस देण्यासंबंधी निदेश दिले असतील अशा देय रकमा, यथास्थिति, विद्यापीठास किंवा व्यवस्थापनास देय असलेल्या अनुदानामधून कापून घेता येतील व सरळ त्या कर्मचाऱ्यांस देता येतील अशी शिफारस न्यायाधिकरणाने राज्य शासनाकडे करणे हे विधिसंमत असेल.

(४) पोट-कलम (२) अन्वये न्यायाधिकरणाने दिलेला कोणताही निदेश, दोन्ही पक्षकारांना लेखी कळवण्यात येईल व त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत यथास्थिति, विद्यापीठ किंवा व्यवस्थापन त्याचे पालन करील, असा कालावधी यथास्थिति, विद्यापीठास किंवा व्यवस्थापनास निदेश मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांपेक्षा कमी नाही इतका असेल.

न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असणे.

**६२.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये किंवा करारामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायाधिकरणाने दाखल करून घेतलेल्या आणि निकालात काढलेल्या कोणत्याही अपिलावरील न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि तो कर्मचारी व यथास्थिति, विद्यापीठ किंवा व्यवस्थापन यांवर बंधकारक असेल ; आणि न्यायाधिकरणाने निर्णय दिलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात, कोणत्याही न्यायालयात किंवा इतर कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा प्राधिकरणासमोर कोणताही दावा, अपील किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**६३.** जर विद्यापीठ, किंवा यथास्थिति, व्यवस्थापन हे न्यायाधिकरणाने कलम ६१ द्वारे दिलेल्या कोणत्याही निदेशाचे, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत, किंवा न्यायाधिकरणाकडून परवानगी देण्यात येईल, अशा आणखी कालावधीत पालन करण्यात कोणत्याही वाजवी कारणाशिवाय कसूर करील तर, व्यवस्थापनाला, अपराध सिद्ध झाला तर,— न्यायाधिकरणाच्या निदेशाचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल व्यवस्थापनाला शास्ती.

(क) पहिल्या अपराधासाठी, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल तिक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायाधिकरणांच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाच्या व विरुद्ध असलेल्या विशेष आणि पुरेशा कारणांच्या अभावी, हा द्रव्यदंड शंभर रुपयांपेक्षा कमी असणार नाही, आणि

(ख) दुसऱ्या आणि नंतरच्या अपराधासाठी दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायाधिकरणाच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाच्या, विरुद्ध असलेल्या विशेष व पुरेशा कारणाअभावी, हा दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही :

परंतु आणखी असे की, न्यायाधिकरणाने दिलेल्या निदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत किंवा न्यायाधिकरणाने मुभा दिलेल्या अशी आणखी कालावधीत, त्या निदेशाचे पालन करण्यात आले नाही, आणिी निदेशाचे उल्लंघन करणे चालू राहील त्याबाबतीत, अपराध सिद्ध झालेल्या व्यक्तीने असे उल्लंघन असा अपराध सिद्ध झाल्यानंतर जितके दिवस चालू ठेवले असेल त्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपये एवढ्या आणखी द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

(२) (क) या कलमाखालील अपराध करणारे विद्यापीठ, किंवा यथास्थिति, व्यवस्थापन एक संस्था असेल अशा बाबतीत, अपराध करण्यात आला होता अशा वेळी संस्थेची प्रभारी असलेली आणि संस्थेची कार्ये पार पाडण्यासाठी तिला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच संस्था यांना या अपराधासाठी दोषी मानण्यात येईल आणि त्या त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि तद्नुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र ठरतील :

परंतु कोणत्याही व्यक्तीने अपराध तिच्या नकळत करण्यात आला होता किंवा अपराध करण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(ख) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादा अपराध संस्थेकडून करण्यात आला असेल आणि तो अपराध, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या किंवा त्या संस्थेचा कोणताही अध्यक्ष, सभापती, सचिव, सदस्य, प्राचार्य किंवा व्यवस्थापक किंवा इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या संमतीने करण्यात आला आहे किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे झाला आहे किंवा त्याने केलेल्या कोणत्याही दुर्लक्षाशी त्याचा संबंध लावण्याजोगा आहे हे सिद्ध करण्यात आले तर, अशी व्यवस्थापन परिषद, अध्यक्ष, सभापती, सचिव, सदस्य, प्राचार्य किंवा व्यवस्थापक किंवा तिर संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांना त्या अपराधासाठी दोषी समजण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि तद्नुसार शिक्षा केली जाण्यास पात्र असतील.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनासाठी "संस्था" याचा अर्थ, संस्था नोंदणी अधिनियम, १८६०
१८६० चा २१. अन्वये नोंदणी करण्यात आलेली संस्था किंवा मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी करण्यात आलेले सार्वजनिक विश्वस्त मंडळ, किंवा इतर कोणताही निगमनिकाय, असा आहे.
१९५० चा मुंबई २९. त्यामध्ये जिच्या व्यवस्थापनाखाली एक किंवा अधिक महाविद्यालये किंवा परिसंस्था चालविण्यात येतात आणि जिला विद्यापीठाचे विसेषाधिकार प्रदान करण्यात येतात अशा संघटनेचा किंवा व्यक्तींच्या संस्थेचाही समावेश होतो—मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो.

विधी व्यवसायींना हजर राहण्यापासून वगळणे.

**६४.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या विधी व्यवसायीला न्यायाधिकरणापुढील कोणत्याही कार्यवाहीमध्ये कोणत्याही पक्षकाराच्या वतीने हजर राहण्याचा हक्क असणार नाही.

## प्रकरण आठ

## **प्रवेश, परीक्षा व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर बाबी**

प्रवेश

**६५.** राज्य शासनाच्या समाजाच्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या आरक्षण धोरणानुसार विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये यांमधील सर्व शिक्षणक्रमांना, राज्य शासनाने केलेले व **राजपत्रात** प्रसिद्ध केलेले किंवा विद्यापीठाने केलेले व विद्यापीठाच्या विद्यापीठ गॅझेटमध्ये प्रसिद्ध केलेले कोणतेही नियम असल्यास, त्यानुसार स्पर्धात्मक आधारावर प्रवेश देण्यात येईल :

परंतु असे की, संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने, राज्य शासनाने आदर्श नियम तयार केले असतील त्याबाबतीत, विद्यापीठ ते स्वीकारील आणि असे नियम, दरवर्षी एक ऑगस्टपेक्षा उशिरा सुरू होणार नाही अशा कोणत्याही विद्यासत्राच्या प्रारंभापूर्वी किमान सहा महिने अगोदर विद्यापीठ गॅझेटमध्ये, किंवा यथास्थिति, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील :

परंतु आणखी असे की, शिस्तीचे पालन करण्याच्या दृष्टीने संबंधित प्राधिकरणाला, एखाद्या विद्यार्थ्याला प्रवेश नाकारण्याचा अधिकार असेल.

प्रवेश न्यायाधिकरण.

**६६.** प्रत्येक विद्यापीठासाठी कलम ५८ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेले न्यायाधिकरण किंवा न्यायाधिकरणे ही, अशा विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील प्रवेशांशी संबंधित सर्व विवादांच्या अभिनिर्णयासाठी अशा कोणत्याही विद्यापीठासाठी असणारे न्यायाधिकरण किंवा न्यायाधिकरणेदेखील असतील. असे न्यायाधिकरण किंवा अशी न्यायाधिकरणे यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे प्रवेशविषयक विवादांसंबंधात अभिनिर्णय देतील.

तरतुदींसाठी अर्ज करणे.

**६७.** या अधिनियमाच्या कलम ५८ ची पोट-कलमे (३) ते (९), कलम ६० ची पोट-कलमे (१) व (२) आणि कलम ६२ आणि कलम ६३ ही, प्रवेशाशी संबंधित सर्व विवादांच्या अभिनिर्णयासाठी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

गाऱ्हाण्याची योग्य दाद मागण्यासाठी हक्क असणे.

**६८.** (१) विद्यापीठाने किंवा त्यांच्या संलग्न अथवा संचलित किंवा मान्यताप्राप्त महाविद्यालयाने किंवा परिसंस्थेने चालविलेल्या शिक्षणक्रमाला प्रवेश घेणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याचे या प्रवेशासंबंधात किंवा विद्यापीठाने, किंवा यथास्थिति, राज्य शासनाने केलेल्या प्रवेशाविषयक नियमांसंबंधात कोणतेही गाऱ्हाणे असेल तर, त्याला गाऱ्हाण्याची योग्य दाद मागण्यासाठी न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करण्याचा हक्क असेल.

(२) भावी विद्यार्थ्यांकडून, प्रवेश निश्चितीचा दिनांक किंवा त्याच्या प्रवेशाच्या अर्जावरील निर्णयाचा दिनांक यापैकी अगोदरचा असेल त्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत असे अपील दाखल करण्यात येईल :

परंतु असे की, अर्जदाराने उक्त कालावधीत अपील दाखल न करण्यासंबंधात योग्य कारण असल्याबाबत न्यायाधिकरणाची खात्री पटली तर, न्यायाधिकरणाला, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी संपल्यानंतर त्याच्याकडे करण्यात आलेले अपील दाखल करून घेता येईल.

(३) प्रत्येक अपिलाबरोबर रुपये ३०० एवढी फी भरण्यात येईल व ती परत करण्यात येणार नाही आणि विद्यापीठ निधीमध्ये जमा करण्यात येईल.

**६९.** (१) अपील, विद्यापीठाने, किंवा यथास्थिति, राज्य शासनाने केलेल्या प्रवेशविषयक नियमांच्या वैधतेविरूद्ध असेल त्याबाबतीत, प्राधिकरण, या नियमांची अंमलबजावणी १५ दिवसांसाठी तहकूब करण्यास सक्षम असेल आणि शक्य असेल तेथवर, उक्त कालावधीत ही बाब अंतिमरित्या निकालात काढण्यासंबंधात कार्यवाही करील. न्यायाधिकरणाचे अधिकार.

(२) भावी विद्यार्थ्यांनी वैयक्तिकरित्या केलेल्या अपिलाच्या बाबतीत, न्यायाधिकरण, विद्यापीठाला किंवा संबंधित, संलग्न अथवा संचालित अथवा मान्यताप्राप्त महाविद्यालयांच्या व परिसंस्थांच्या व्यवस्थापनाला, अपिलकाराच्या दाव्याचा अंतिम अभिनिर्णय करण्यात येईपर्यंत, त्या अपिलकारासाठी एक जागा तात्पुरती राखून ठेवण्याचा निदेश देण्यास सक्षम असेल.

**७०.** (१) अपील दाखल करण्यात आल्यानंतर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, न्यायाधिकरणाला असे वाटले की, अपिलकाराला योग्य प्रवेश नाकारण्याचा आदेश, नियमांचे उल्लंघन करून देण्यात आला होता किंवा अन्यथा अवैध अथवा अयोग्य होता तर, न्यायाधिकरणाला, यथास्थिति, विद्यापीठाचा किंवा व्यवस्थापनाचा अथवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाचा निर्णय पूर्णतः किंवा अंशतः रद्द करता येईल, आणि यथास्थिति, विद्यापीठ, व्यवस्थापन किंवा सक्षम प्राधिकरण यांना, अपिलकाराने ज्या विद्यापीठात, महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत प्रवेश मागितला असेल तेथे त्याला प्रवेश देण्याचा निदेश देता येईल. उचित अनुतोष व निदेश देण्याचा न्यायाधिकरणाचे अधिकार.

(२) नियमांच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या अपिलाच्या बाबतीत, न्यायाधिकरणाला, ते नियम विलोपित करता येतील किंवा विखंडित करता येतील, अथवा यथास्थिति, विद्यापीठ किंवा राज्य शासन यांना, न्यायाधिकरणाकडून निदेश देण्यात येईल अशा रीतीने नियमांमध्ये सुधारणा करण्याचा किंवा फेरबदल करण्याचा निदेश देता येईल.

(३) न्यायाधिकरणाने दिलेला कोणताही निदेश, दोन्ही पक्षकारांना लेखी कळविण्यात येईल आणि या निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, यथास्थिति, विद्यापीठ किंवा व्यवस्थापन किंवा सक्षम प्राधिकरण त्या निदेशाचे पालन करील.

**७१.** प्रत्येक विद्यासत्राच्या सुरुवातीस आणि कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या ३० ऑक्टोबरनंतरची नसेल त्यावेळी, विद्यापीठ, त्याने स्वतः किंवा त्याच्या अधिकारितेतील कोणतेही संलग्न महाविद्यालय आणि परिसंस्था यांनी चालविलेल्या प्रत्येक पाठ्यक्रमांसाठी अनुसूची तयार करील व ती प्रसिद्ध करील आणि त्या अनुसूचीचे काटेकोरपणे पालन करील. परीक्षा

**स्पष्टीकरण.—**"परीक्षेची अनुसूची" याचा अर्थ, परीक्षेचा भाग असलेल्या प्रत्येक प्रश्नपत्रिकेची वेळ, दिवस व दिनांक यांचा तपशील दिलेला तक्ता, असा आहे. त्यामध्ये प्रात्याक्षिक परीक्षांच्या तपशीलाचाही समावेश असेल :

परंतु असे की, विद्यापीठाला, त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे व परिस्थितीमुळे या अनुसूचीचे पालन करता आले नाही तर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, ते कुलपती व राज्य शासन यांना एक अहवाल सादर करील. या अहवालात प्रसिद्ध अनुसूचीचे पालन का करता आले नाही त्याची तपशीलवार कारणे नमूद करण्यात येतील.

**७२.** विद्यापीठ, त्याने घेतलेल्या प्रत्येक परीक्षेचा निकाल त्या विशिष्ट अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जाहीर करण्याचा आटोकाट प्रयत्न करील आणि कोणत्याही परिस्थितीत त्या अखेरच्या दिनांकापासून उशिरात उशिरा म्हणजे ४५ दिवसांच्या आत तो घोषित करील : निकाल जाहीर करणे.

परंतु असे की, पूर्वोक्त ४५ दिवसांच्या कालावधीच्या आत कोणत्याही परीक्षेचा निकाल घोषित करणे कोणत्याही कारणांमुळे विद्यापीठाला शक्य झाले नाही तर, ते, अशा विलंबाची तपशीलवार कारणे नमूद करून कुलपती व राज्य शासन यांना एक अहवाल सादर करील.

अनुसूचीचे पालन न केल्यामुळे परीक्षा अवैध ठरणार नाही.

**७३.** केवळ विद्यापीठाने यथास्थिति, कलम ७१ व ७२ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अनुसूचीचे पालन केले नाही केवळ याच कारणामुळे कोणतीही परीक्षा किंवा परीक्षेचा निकाल अवैध समजण्यात येणार नाही.

क्रीडा व अभ्यासेतर कार्यक्रम.

**७४.** क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर सर्व कार्यक्रम यांसाठी यथास्थिति, आपापल्या वर्गाचे, महाविद्यालयांचे किंवा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल यांची ही निवड, इतर कोणत्याही निकषावर न करता, खुल्या प्राविण्य स्पर्धेमधूनच सर्वस्वी गुणवत्तेच्या आधारावरच निश्चितपणे करण्यात यावी यासाठी विद्यापीठ, योग्य ते परिनियम, आदेश व विनियम तयार करील.

## प्रकरण नऊ

## समित्या

समित्या.

**७५.** (१) ग्रंथालय समिती.—(क) विद्यापीठाची ग्रंथालये व ग्रंथालय सेवा प्रशासित, आयोजित व परिरक्षित करण्यासाठी एक ग्रंथालय समिती असेल. या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) कुलगुरूंकडून नामनिर्देशित केले जाणारे विद्याशाखांचे तीन अधिष्ठाते ;

(तीन) कुलगुरूंकडून नामनिर्देशित केले जाणारे विद्यापीठ परिसंस्थांचे किंवा विभागांचे तीन विभाग प्रमुख ;

(चार) विद्यापरिषदेकडून तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले दोन अध्यापक ;

(पाच) कुलसचिव ;

(सहा) ग्रंथपाल—सचिव.

(ख) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त ग्रंथालय समितीच्या इतर सर्व सदस्यांचा पदावधी पाच वर्षांचा असेल आणि [१][दुसऱ्या लागोपाठच्या मुदतीसाठी] ते पात्र असणार नाहीत.

(ग) समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) ग्रंथालय आणि प्रलेखन सेवा योग्य प्रकारे आयोजित करण्यासाठी व चालू राहण्यासाठी व पुस्तकसंग्रह अद्ययावत ठेवण्यासाठी तरतूद करणे ;

(दोन) ग्रंथालय आणि प्रलेखन सेवांचे आधुनिकीकरण व त्यात सुधारणा करण्याची तरतूद करणे ;

(तीन) विद्यार्थी आणि इतर व्यक्ती यांच्याकडून उपयोग करून घेतल्या जाणाऱ्या ग्रंथालय सेवांबद्दलची फी आणि इतर आकार यांबाबत व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे ;

(चार) व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यासाठी ग्रंथालयाचा वार्षिक अर्थसंकल्प आणि ग्रंथालय विकासासंबंधीचे प्रस्ताव तयार करणे ;

(पाच) ग्रंथालयाच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल सादर करणे.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४३(अ) अन्वये " त्यानंतर पुन्हा नामनिर्देशित केले जाण्यासाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) वित्त व लेखा समिती.—(क) पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक वित्त व लेखा समिती असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) प्रतिकुलगुरू, कोणताही असल्यास ;

(तीन) उपसचिवांपेक्षा कमी दर्जा नसलेली, राज्य शासनाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(चार) लेखा व कोषागारे संचालक किंवा लेखा व कोषागारे [१][उपसंचालक] कमी दर्जा नसलेला त्यांचा प्रतिनिधी ;

(पाच) व्यवस्थापन परिषदेने तिच्या, सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती ;

(सहा) विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती ;

(सात) वित्त व लेखा अधिकारी—सचिव.

[२][(आठ) कुलसचिव आणि संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ हे कायम निमंत्रित असतील.]

(ख) समितीच्या बैठकीच्या गणपूर्तीची संख्या सहा एवढी असेल.

(ग) पदसिद्ध सदस्य खेरीजकरून, समितीच्या इतर सर्व सदस्यांचा पदावधी पाच वर्षांचा असेल [३][आणि दुसऱ्या लागोपाठच्या मुदतीसाठी ते पात्र असणार नाहीत.]

(घ) उपलब्ध तरतुदी विचारात घेऊन, लेख्यांची, वाढत्या खर्चाची आणि नवीन खर्च अंतर्भूत असलेल्या सर्व नवीन प्रस्तावांची तपासणी करण्याकरिता समिती वर्षातून किमान चार वेळा बैठक बोलावील.

(ङ) वित्त व लेखा अधिकाऱ्याने तयार केलेले विद्यापीठाचे वार्षिक लेखा विवरण व वित्तीय अंदाज (अर्थसंकल्प) विचारार्थ व शिफारशीसाठी आणि त्यानंतर व्यवस्थापन परिषदेस योग्य वाटेल अशी कार्यवाही करण्याकरिता व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यासाठी वित्त व लेखा समितीपुढे ठेवण्यात येतील.

(च) अर्थसंकल्प पुढील तीन वेगवेगळ्या भागांमध्ये तयार करण्यात येईल :—

(एक) परिरक्षण ;

(दोन) विकास ; आणि

(तीन) स्वतंत्र प्रकल्प किंवा योजना किंवा सहयोग कार्यक्रम अनुदाने.

(छ) समिती, पुढील अतिरिक्त कामे व कर्तव्ये पार पाडील :—

(एक) उत्पादक कामासाठी असलेल्या कर्जातून मिळणाऱ्या उत्पन्नासह विद्यापीठाचे उत्पन्न आणि साधनसंपत्ती यांवर आधारित अशा संपूर्ण वर्षाच्या आवर्ती व अनावर्ती खर्चाच्या मर्यादांची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे.

(दोन) विद्यापीठ भत्ता व साधनसंपत्तीची उत्पादक गुंतवणूक व त्यांचे व्यवस्थापन याबाबत व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे.

(तीन) विद्यापीठ विकासासाठी संभाव्य साधनसंपत्ती वाढवण्याच्या शक्यतांचा शोध घेणे व त्यांचा अवलंब करणे.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४३(ब) (एक) (१) अन्वये "सह संचालकांपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४३(ब) (एक) (२) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४३(ब) (दोन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(चार) व्यवस्थापन परिषदेने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाकडून विद्यापीठाच्या लेख्याची लेखापरीक्षा करून घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.

(पाच) विद्यापीठाच्या मालमत्तेच्या व निधीच्या प्रशासनाशी संबंधित बाबींवर व्यवस्थापन परिषदेला सल्ला देणे.

(सहा) वित्तीय बाबींच्या संबंधात, वेळोवेळी काढण्यात आलेल्या राज्य शासनाच्या आदेशांची योग्यप्रकारे अंमलबजावणी होत असल्याबद्दल सुनिश्चिती करणे.

(सात) व्यवस्थापन परिषद किंवा विद्यापरिषद किंवा विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण, मंडळ किंवा समिती अथवा कोणताही अधिकारी यांच्याकडून तिच्याकडे निर्दिष्ट केलेल्या वित्तीय बाबीसंबंधात सल्ला देणे.

(आठ) तिच्या निर्दशनास येईल अशी, वित्तीय बाबींसंबंधातील कोणतीही चूक किंवा अनियमितता कुलगुरूला कळविणे, त्यानंतर कुलगुरूला, बाबींसंबंधीच्या गंभीरतेचे निर्धारण केल्यानंतर सत्वर योग्य ती कारवाई करता येईल किंवा ती व्यवस्थापन परिषदेकडे पाठवता येईल.

(ज) समितीचे इतर अधिकार व कर्तव्ये आणि तिच्या बैठकीची कार्यपद्धती, विनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(झ) विद्यापीठाचे, महाविद्यालयांचे व परिसंस्थांचे वार्षिक लेखे, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून, लेखापरीक्षा करण्यासाठी उपलब्ध असतील.

(३) खरेदी समिती.—(क) ज्यामध्ये प्रत्येक बाबीचे स्वतंत्र मूल्य एका वेळी एक लाख रुपयांपेक्षा अधिक असेल अशा, विद्यापीठाच्या खरेदीच्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक खरेदी समिती असेल.

(ख) या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) कुलगुरूने नामनिर्देशित केलेले विद्यापीठ परिसंस्थांचे किंवा विभागांचे तीन प्रमुख ;

(तीन) व्यवस्थापन परिषदेने, तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले दोन सदस्य ;

(चार) कुलसचिव ;

(पाच) वित्त व लेखा अधिकारी.

(ग) वित्त व लेखा अधिकारी, साधारणपणे, खरेदी समितीचा सचिव म्हणून काम करील. ज्या कालावधीमध्ये वित्त व लेखा अधिकारी नसेल त्या कालावधीत किंवा त्यांच्या अनुपस्थितीत कुलसचिव हा, समितीचा सचिव म्हणून काम करील.

(घ) खरेदी समिती ज्यांच्यासाठी खरेदी करावयाची आहे त्या विद्यापीठ परिसंस्थांच्या किंवा विभागांच्या प्रमुखांना आमंत्रित करील.

(ङ) पदसिद्ध सदस्य खेरीजकडून, समितीचे इतर सर्व सदस्य दोन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करतील.

(च) समितीचे अधिकार व कर्तव्ये आणि तिच्या बैठकांची कार्यपद्धती विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) विद्याविषयक सेवा युनिटांसाठी समित्या.–(क) विद्यापीठाच्या प्रत्येक विद्याविषयक सेवा युनिटांची एक समिती असेल. या समितीची मुख्य जबाबदारी तिच्या प्रभाराखालील सेवा आयोजित करणे, त्यांवर देखरेख करणे आणि त्या चालू ठेवणे, ही असेल.

(ख) अशा युनिटाच्या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) अधिष्ठात्यांनी त्याच्यामधून नामनिर्देशित केलेला एक अधिष्ठाता ;

(तीन) युनिटाच्या सेवांचा वापर करणाऱ्या विद्यापीठ परिसंस्थांचे किंवा विभागांचे तीनहून अधिक नसतील इतके विद्यापरिषदेने नामनिर्देशित केलेले प्रमुख ;

(चार) युनिटला वित्तपुरवठा करणारी जर कोणतीही एजन्सी असल्यास, तिची एक नामनिर्देशित व्यक्ती ;

(पाच) विद्यापीठ कर्मचारी खेरीजकरून, संबंधित विद्याविषयक सेवांचे विशेष ज्ञान असलेला, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला एक तज्ज्ञ ;

(सहा) संबंधित विद्याविषयक सेवा युनिटाचा प्रमुख किंवा संचालक—सचिव.

(ग) नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी पाच वर्षांचा असेल.

(घ) समित्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांच्या बैठकांची कार्यपद्धती विहित केल्याप्रमाणे असेल.

(ङ) समिती वर्षातून किमान दोनदा आपल्या बैठका घेईल.

विद्यापीठ अध्यापकांची निवड व नेमणूक.

**७६.** (१) या अधिनियमाच्या, परिनियमांच्या आणि आदेशांच्या तरतुदींच्या अधीन राहून, कुलगुरू, विद्यापीठ अनुदान आयोगाची सेवाप्रवेश योजना अंमलात येईपर्यंत गुणवत्ताक्रमानुसार आणि निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे, विद्यापीठ अध्यापकांची नेमणूक करील.

(२) विद्यापीठ अध्यापकांची नेमणूक करण्यासाठी शिफारस करण्याकरिता असलेल्या निवड समितीत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) कुलगुरू किंवा कुलगुरूने निदेश दिल्यावर प्रतिकुलगुरू—अध्यक्ष ;

(ख) कुलपतीने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(ग) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता ;

(घ) विद्यापीठ विभागाचा प्रमुख किंवा संबंधित [१][कुलगुरूने नामनिर्देशित केलेला प्रशालेचा किंवा बहुविध-ज्ञानशाखा परिसंस्थेचा] प्रमुख ;

(ङ) विद्यापीठाशी ज्या व्यक्ती संबंधित नसतील अशा आणि ज्या विषयासाठी अध्यापकाची निवड करावयाच असेल त्या विषयाचे ज्यांना विशेष ज्ञान आहे अशा, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या सहापेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींच्या नामिकेमधून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल्या [२][किमान] तीन तज्ज्ञ व्यक्ती ;

(च) कुलपतीने नामनिर्देशित केलेली अनुसूचित जातीमधील किंवा अनुसूचित जनजाती, [३][विमुक्त जाती व भटक्या जमाती] मधील किंवा इतर मागासवर्गातील एक व्यक्ती ;

[४][(छ) संचालक, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४४(अ) अन्वये "परिसंस्थेचा" या मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४४(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४४(क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४४(ड) अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

(ज) संचालक, तंत्र शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली सहसंचालकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती ] :

परंतु, खंड (घ) मध्ये विहित केलेला प्रपाठक असलेला प्रमुख, अधिव्याख्यात्याच्या पदावरील निवड करण्यासाठी असलेल्या निवड समितीचा सदस्य असेल.

(३) कुलसचिव, समितीचा सचिव म्हणून काम करील.

(४) निवडीद्वारे भरावयाच्या विद्यापीठाच्या अध्यापकांच्या प्रत्येक पदाची, त्यासाठी लागणारी विहित किमान अर्हता आणि अतिरिक्त अर्हता, वित्तलब्धी आणि भरावयाच्या पदांची संख्या, अशा पदांपैकी, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाति किंवा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तीसाठी राखीव असतील अशा पदांची संख्या, यांचा तपशील आणि जाहिरातीस अनुसरून, अर्जदारांना ज्या मुदतीत आपले अर्ज सादर करता येतील अशी कुलगुरूनी ठरवून द्यावयाची वाजवी मुदत यांसह रीतसर व मोठ्या प्रमाणात जाहिरात देण्यात येईल.

(५) प्रत्येक निवड समितीच्या बैठकीचा दिनांक, प्रत्येक सदस्यास त्यासंबंधी निदान तीस दिवसांची नोटीस देता येईल अशा रीतीने निश्चित करण्यात येईल आणि प्रत्येक उमेदवाराचा तपशील, प्रत्येक सदस्यास बैठकीच्या दिनांकापूर्वी निदान सात दिवस आधी मिळू शकेल अशा रीतीने त्याच्याकडे पाठविण्यात येईल.

(६) प्रत्येक निवड समितीच्या बैठकीची चार सदस्यांनी गणपूर्ती होईल. त्यापैकी निदान दोन सदस्य पोट-कलम (२) च्या खंड (इ) अन्वये नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती असतील :

परंतु, निवड समितीस, प्राध्यापकाच्या पदासाठी, ज्यांनी अर्ज केला असेल आणि जे तिच्या पुढे उपस्थित झाले असतील अशा उमेदवारांऐवजी, ज्यांनी अर्ज केला नसेल किंवा तिच्यापुढे उपस्थित राहिल्या नसतील, परंतु, ज्या यथोचितरित्या अर्हताप्राप्त असतील आणि त्यांच्या नावे अपवादात्मकरित्या उच्च अशी विद्याविषयक कामगिरी नमूद असेल किंवा विषेशीकरणामध्ये कार्यनिपुणता असेल किंवा असाधारण प्रकारचे विद्याविषयक योगदान असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तींच्या नावांची तसे लेखी नमूद करून नेमणुकीसाठी शिफारस करता येईल.

(७) प्रत्यक्ष प्रतिकूल परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीच्या विनंती अर्जावरून किंवा स्वाधिकारे आवश्यक असेल किंवा आवश्यक ठरली असेल अशी, चौकशी करून किंवा अशी चौकशी केल्यानंतर, ज्या अध्यापकांच्या नियुक्तीवर परिणाम होण्याची शक्यता असेल अशा व्यक्तीकडून मिळविण्यात आलेली किंवा मिळालेल्या स्पष्टीकरणांबाबत कुलपतीची अशी खात्री पटली की, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने केलेली विद्यापीठाच्या अध्यापकाची नियुक्ती त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार नव्हती तर, कुलपती, अशा अध्यापकाच्या सेवाशर्तीसंबंधीच्या करारामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आदेशाद्वारे त्या अध्यापकाला एक महिन्याची नोटीस देऊन किंवा अशा नोटिशीच्या ऐवजी एक महिन्याचे वेतन दिल्यानंतर, त्याची नियुक्ती समाप्त करण्याचा निदेश कुलगुरूला देऊ शकेल आणि कुलगुरू ताबडतोब त्यानिदेशाचे पालन करील व नव्याने निवड करण्यासाठी उपाय योजील. जिची नियुक्ती अशाप्रकारे समाप्त करण्यात आलेली असेल ती व्यक्ती, त्याच पदासाठी पुन्हा अर्ज करण्यास पात्र असेल.

(८) लगतपूर्ववर्ती पोट-कलमान्वये कुलपतीने काढलेला कोणताही आदेश अंतिम असेल आणि त्या आदेशाची एक प्रत, तो मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत कुलगुरूकडून संबंधित अध्यापकास देण्यात येईल.

(९) कोणत्याही व्यक्तीच्या सेवासमाप्तीनंतरच्या कोणत्याही कालावधीसाठी तिला विद्यापीठ निधीमधून वेतन किंवा भत्त्याच्या रूपाने कोणतेही प्रदान करण्यात येणार नाही याबाबत, खात्री करून घेणे हे कुलगुरूचे कर्तव्य असेल आणि असे कोणतेही प्रदान प्राधिकृत करणारा किंवा करणारा कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी, अशा प्रदान केलेल्या रकमेची विद्यापीठाकडे प्रतिपूर्ती करण्यास पात्र असेल.

**७७.** [१][विद्यापीठाच्या अध्यापकांच्या तात्पुरत्या रिक्त पदावर नेमणूक करावयाची असेल त्याबाबतीत, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीसाठी पद रिक्त राहणार असेल तर, कलम ७६ च्या तरतुदींना अनुसरून, निवड समितीच्या शिफारशीनुसार नेमणूक करण्यात येईल. निवड समितीची तीन सदस्यांनी गणपूर्ती होईल. त्यापैकी एक व्यक्ती, खंड (चार) खालील तज्ज्ञ व्यक्ती असेल] : विद्यापीठाच्या अध्यापकांची तात्पुरती रिक्त पदे भरणे.

परंतु, अध्यापनाच्या दृष्टीने, ते रिक्त पद ताबडतोब भरणे आवश्यक आहे याबद्दल कुलगुरूची खात्री झाल्यास, त्यास, पुढीलप्रमाणे घटित केलेल्या स्थानिक निवड समितीच्या शिफारशींवरून एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तींची नेमणूक करता येईल आणि अशा नेमणुकीसंबंधी तो व्यवस्थापन परिषदेस कळवील :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता ;

(तीन) संबंधित विभाग प्रमुख, [२][* * *] ;

(चार) कुलगुरूने नामनिर्देशित केलेली एक तज्ज्ञ व्यक्ती ; मात्र विभाग प्रमुख हा, अधिष्ठाताही असेल तर, कुलगुरू, एका व्यक्तीऐवजी दोन व्यक्तींची नेमणूक करील :

[३][(पाच) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाति किंवा विमुक्त जाती/भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गातील एक सदस्य ;

(सहा) संचालक, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, सह आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती ; आणि

(सात) संचालक, तंत्र शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, सह आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती] :

परंतु आणखी असे की, पूर्वोक्त एक वर्ष संपण्यापूर्वी कुलगुरू [४][कलम ७६ च्या] तरतुदीस अनुसरून, नेमणूक करून पद भरण्यासाठी उपाययोजना करील.

**७८.** संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य किंवा विद्यापीठ परिसंस्थांचे किंवा विद्यापीठाकडून चालवण्यात येणारी पदव्युत्तर केंद्रे किंवा उपकेंद्रे यांचे संचालक किंवा प्रमुख यांची निवड करण्यासाठी असलेल्या निवड समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :— संचालित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची नियुक्ती व निवड.

(क) कुलगुरू—अध्यक्ष ;

(ख) कुलपतीने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(ग) विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल्या दोन तज्ज्ञ व्यक्ती व विद्यापरिषदेने नामनिर्देशित केलेली एक तज्ज्ञ व्यक्ती ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४५(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४५(ब) (एक) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४५(ब) (दोन) अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४५(क) अन्वये “निकटपूर्ववर्ती परिनियमाच्या” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(घ) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती किंवा विमुक्त जाती/भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गातील चक्रिय आरक्षणाप्रमाणे एक सदस्य ;

(ङ) संचालक, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती ;

(च) संचालक, तंत्र शिक्षण किवा त्याने नामनिर्देशित केलेली, सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती].

विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी आणि संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांसाठी, अध्यापकांसाठी आणि इतर कर्मचाऱ्यांसाठी निवड समित्या.

**७९.** (१) (क) खालील पदांच्या नेमणुकीसाठी योग्य उमेदवारांची शिफारस करण्यासाठी निवड समिती असेल :—

(एक) कुलसचिव ;

(दोन) परीक्षा नियंत्रक ;

(तीन) वित्त व लेखा अधिकारी ;

(चार) ग्रंथपाल ;

(ख) निवड समितीत,—

(एक) कुलगुरू किंवा कुलगुरूच्या निर्देशावरून प्रतिकुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल दोन सदस्य ;

(तीन) व्यवस्थापन परिषदेचा सदस्य नसेल असा, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला अधिष्ठाता ;

(चार) जे विद्यापीठाशी आणि संलग्न महाविद्यालयाशी किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेशी संबंधित नाहीत असे, परंतु पदे भरावयाच्या संबंधित क्षेत्राबाबत ज्यांना विशेष ज्ञान आहे असे कुलगुरूने नामनिर्देशित केलेल दोन तज्ज्ञ ;

(पाच) अनुसूचित जातीमधील किंवा अनुसूचित जनजातिमधील किंवा इतर मागासवर्गातील कुलगुरूने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(सहा) कुलसचिव, एखाद्या पदाकरिता स्वतःच उमेदवार असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, तो निवड समितीचा सदस्य-सचिव म्हणून काम पाहील.

(२) निवड समिती आणि विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांच्या नेमणुकीची पद्धत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) संलग्न महाविद्यालयंचे प्राचार्य, अध्यापक आणि इतर कर्मचारी यांच्यासाठी निवड समिती व त्यांच्या नेमणुकीची पद्धत परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) कोणत्याही संलग्न महाविद्यालयाचे व्यवस्थापन, विहित, कार्य पद्धतीनुसार अध्यापकांची व इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यापूर्वी, इतर महाविद्यालयांमध्ये सामावून घेण्यासाठी विद्यापीठाने ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तीच्या सूचीमध्ये कोणती योग्य व्यक्ती उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत, विद्यापीठ व उच्च शिक्षण संचालक यांच्याकडून खात्री करून घेईल आणि अशी व्यक्ती उपलब्ध असेल तर, व्यवस्थापन त्या व्यक्तीची नेमणूक करील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४६ अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

**८०.** या अधिनियमान्वये घटित करण्यात आलेल्या समित्यांशिवाय, विद्यापीठाच्या प्राधिकरणांना, नेमून दिलेल्या कोणत्याही विशिष्ट कामाकरिता योग्य अटी व निर्देश यांसह समिती घटित करता येईल व अशा समितीमध्ये अशी समिती घटित करणाऱ्या प्राधिकरणाच्या सदस्यांचा आणि तसेच ते प्राधिकरण नामनिर्देशित करील अशा अन्य व्यक्तींचाही समावेश असेल. समित्या.

प्रकरण दहा

**परवानगी, संलग्नीकरण व मान्यता**

**८१.** (१) संलग्नीकरणासाठी किंवा मान्यतेसाठी अर्ज करणारे व्यवस्थापन आणि ज्यांचा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला संलग्नीकरण किंवा मान्यता प्रदान करण्यात आली आहे असे व्यवस्थापन पुढीलप्रमाणे हमी देईल आणि तिचे अनुपालन करील :— संलग्नीकरण आणि मान्यता यांकरिता शर्ती.

(क) अधिनियम आणि त्याखालील परिनियम, आदेश, विनियम यांच्या तरतुदीचे आणि विद्यापीठाच्या स्थायी आदेशांचे आणि विदेशांचे पालन करण्यात येईल ;

(ख) कलम ८५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे संलग्न महाविद्यालयांकरिता तरतूद केलेली एक वेगळी स्थानिक व्यवस्थापन समिती असेल ;

(ग) अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विद्यापीठाद्वारे आणि राज्य शासनाद्वारे वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल ;

(घ) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अद्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक असलेल्या इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, पुस्तके वास्तविक, अध्यापन व संशोधनासाठी आवश्यक असणारी साधन सामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यांसारख्या योग्य व पर्याप्त सुविधा असतील ;

(ङ) महाविद्यालयाची किंवा परिसंस्थेची वित्तीय साधने, अशा प्रकारे असतील की, ज्यामुळे त्याच्या सततच्या देखभालीसाठी आणि कामकाजासाठी योग्य ती तरतूद करता येईल. ;

(च) संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या अध्यापन व अध्यापनेतर कर्मचाऱ्यांची संख्या व अर्हता आणि संलग्न महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि वित्तलब्धी, या, विद्यापीठाने विहित केल्याप्रमाणे असतील आणि त्या, अभ्यासाचे पाठ्यक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन यांच्याकरिता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असतील ;

(छ) संलग्न करून घ्यावयाच्या महाविद्यालयाच्या सर्व अध्यापन व अध्यापनेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आणि सुविधा या, परीक्षा घेण्यासाठी [१][व मूल्यमापन करण्यासाठी] आणि विद्यापीठाच्या इतर कार्यक्रमांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील ;

(ज) अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम यांच्या तरतुदींन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, कुलपती, कुलगुरू आणि विद्यापीठाचे इतर अधिकारी यांनी दिलेले निदेश, आणि आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल ;

(झ) विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल किंवा त्यांचे हस्तांतरण करण्यात येणार नाही ;

(ञ) विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय, महाविद्यालय किंवा परिसंस्था बंद करण्यात येणार नाही ;

(ट) कलम ९२ अन्वये महाविद्यालये किंवा परिसंस्था यांचे संलग्नीकरण रद्द करण्यात किंवा मान्यता काढून घेण्यात आल्यास किंवा ती बंद करण्यात आल्यास महाविद्यालये किंवा परिसंस्था व त्यांची, राज्य शासनाने किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने सहायक अनुदान म्हणून दिलेल्या

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ यांच्या कलम ४७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

रकमेमधून बांधण्यात किंवा निर्माण करण्यात आलेल्या इमारती व साधन सामग्रीसह सर्व भत्ता राज्य शासनाकडे निहित असेल.

(२) दुसऱ्या विद्यापीठाचा भाग असलेल्या कोणत्याही महाविद्यालयाचा, मूळ विद्यापीठाद्वारे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात आल्याशिवाय संलग्नीकरणासाठी विचार केला जाणार नाही.

परवनागी संबंधीची कार्यपद्धती.

**८२.** [१][(१) विशेषतः विद्यापीठाच्या अधिकारितेमधील सेवारहित आणि न्यून विकसित क्षेत्राच्या गरजांचा योग्य तो विचार करून, उच्च शिक्षणाच्या सुविधांचे समन्याय वाटप होण्याची सुनिश्चिती होईल अशा रीतीने, उच्चर शिक्षणाच्या शैक्षणिक विकासाकरिता परिसंस्थांची आणि महाविद्यालयांची स्थाने निश्चित करण्यासाठी विद्यापीठ एक सम्यक योजना तयार करील आणि ती राज्य उच्च शिक्षण परिषदेकडून मान्य करून घेईल. अशी योजना, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाकडून तयार करण्यात येईल आणि व्यवस्थापन परिषदेमार्फत ती योजना विद्यापरिषद आणि अधिसभा याच्यापुढे ठेवण्यात येईल आणि आवश्यक असल्यास, प्रत्येक वर्षी ती अद्ययावत करण्यात येईल.]

(२) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासंबंधीचा कोणताही अर्ज, जर अशा योजनेशी सुसंगत नसेल तर, विद्यापीठाकडून विचारात घेतला जाणार नाही.

(३) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्याच्या अगोदरच्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(४) पूर्वोक्त विहित कालमर्यादेत मिळालेल्या अशा सर्व अर्जांची, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने ते अर्ज व्यवस्थापन परिषदेला उचित वाटतील अशा शिफारशींसह, (संबद्ध कारणांनी यथोचितरित्या पुष्टी देऊन) [२][त्या वर्षाच्या मे महिन्याच्या पहिल्या दिवशी किंवा त्यापूर्वी] राज्य शासनाकडे पाठवण्यात येतील.

(५) विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जापैकी राज्य शासन, त्याला त्याच्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार उचित व योग्य वाटतील अशा संस्थांना परवानगी देऊ शकेल व तसे करताना ते राज्य शासनाची अर्थसंकल्पीय साधनसंपत्ती, नवीन परिसंस्था सुरू करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता आणि उच्च शिक्षणाच्या परिसंस्थांच्या स्थान निश्चयना संबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम विचारात घेईल :

परंतु, अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून, राज्य शासन, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी आलेल्या, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या अशा कोणत्याही अर्जाला मान्यता देऊ शकेल :

[३][परंतु आणखी असे की, २०११-२०१२ च्या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरू करण्याचे प्रस्तावित केलेल्या [४][वर्षाच्या १५ जून] किंवा त्यापूर्वी विद्यापीठाला राज्य शासनाकडून अशी परवानगी मिळाल्याचे कळविण्यात येईल. त्यानंतर परवानगी प्राप्त झाल्यास विद्यापीठाकडून तिचा अंमलपुढील शैक्षणिक वर्षातच करण्यात येईल.]

क्रमांक ३५ याच्या कलम ८२ ची सुधारणा.

[४][(५अ) पोट-कलम (५) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षाकरिता, राज्य शासन, अशी परवानगी दिल्याबाबत विद्यापीठाला २० ऑगस्ट २०११ रोजी किंवा त्यापूर्वी कळवील आणि विद्यापीठ अशी परवानगी त्याच शैक्षणिक वर्षात अंमलात आणील.]

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४८(अ) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २(क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी हे मजकूर दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

(६) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याची परवानगी देण्यासाठी राज्य शासन, कोणताही अर्ज विचारासाठी थेट दाखल करून येणार नाही.

**८३.** (१) कलम ८२ अन्वये राज्य शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर विद्यापीठाची विद्यापरिषद पोट-कलम (२) मध्ये दिलेल्या विहित कार्यपद्धतीचे अनुसरण करून आणि नवीन महाविद्यालयाने किंवा परिसंस्थेने कराराविष्ट शर्तीचे पालन केलेले आहे काय आणि कोणत्या मर्यादेपर्यंत पालन केलेले आहे हे विचारात घेतल्यानंतर, त्या महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास मंजुरी देण्याबाबत विचार करील. यासंबंधातील विद्यापरिषदेचा निर्णय अंतिम असेल. संलग्नीकरण करण्यासाठी कार्यपद्धती.

(२) संलग्नीकरणास, मंजुरी मिळण्याबाबतचा अर्ज विचारत घेण्याच्या प्रयोजनासाठी, विद्यापरिषद, तिने या प्रयोजनासाठी घटित केलेल्या समितीकरवी चौकशी करण्याची व्यवस्था करील.

(३) विद्यापरिषद पुढील बाबतीत निर्णय घेईल :—

(क) सलग्नीकरणास मंजुरी द्यावयाची किंवा नाकारावयाची ;

(ख) पूर्णतः संलग्नीकरणास मंजुरी द्यावयाची किंवा अंशतः संलग्नीकरणास मंजुरी द्यावयाची ;

(ग) विषय, पाठ्यक्रम व प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(घ) संलग्नीकरणास मंजुरी देताना किंवा मंजुरी देण्यासाठी कराराविष्ट करता येतील अशा कोणत्याही असल्यास, त्या शर्ती.

(४) कुलसचिव विद्यापरिषदेचा निर्णय, संलग्नीकरणाचा अर्ज मंजूर करण्यात आला असेल तर, पुढील माहितीसह व्यवस्थापनाला कळवील आणि एक प्रत, संचालक, उच्च शिक्षण यास पाठवील :—

(क) संलग्नीकरणासाठी मान्यता देण्यात आलेले विषय आणि अभ्यासक्रम ;

(ख) प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(ग) ज्या शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून, मान्यता देण्यात आलेली असेल त्या शर्ती.

[१][(५) कलम ८२, त्याच्या पोट-कलम (५) च्या दुसऱ्या परंतुकाव्यतिरिक्त निर्देशिलेली कार्यपद्ध्ती, योग्य त्या फेरफारांसह, नवीन पाठ्यक्रम आणि जादा विद्याशाखा सुरू करण्यासंबंधीच्या परवानगीच्या बाबतीत लागू होईल. विद्यमान महाविद्यालयांमध्ये आणि परिसंस्थांमध्ये नवीन विषय आणि जादा विभाग सुरू करण्यासंबंधीच्या परवानगीची कार्यपद्धती ही, राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.]

(६) विद्यापीठाकडून महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला प्रथम संलग्नता देण्यात आल्याखेरीज कोणत्याही विद्यार्थ्याला महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत प्रवेश देण्यात येणार नाही.

(७) पोट-कलमे (१) ते (४) मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, योग्य त्या फेरफारांसह, वेळोवेळी संलग्नीकरण चालू ठेवण्याचा विचार करण्याच्या बाबतीत लागू होईल.

**८४.** (१) कमीत कमी पाच वर्षे संशोधन किंवा विशेष अभ्यासक्रम यांसाठी सक्रिय असलेल्या व मान्यतेची मागणी करत असलेल्या परिसंस्थेचे व्यवस्थापन, खालील बाबींच्यासंबंधातील पूर्ण माहितीसह विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे अर्ज करील :— परिसंस्थांना मान्यता देण्याची कार्यपद्धती.

(क) व्यवस्थापनाची घटना व तिचा कर्मचारीवर्ग ;

(ख) ज्या विषयांसाठी व पाठ्यक्रमांसाठी मान्यता मागत आहे ते विषय व पाठ्यक्रम ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४९ अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(ग) ज्याकरिता तरतूद केली आहे अशी जागा, साधनसामग्री व विद्यार्थ्यांची संख्या ;

(घ) संशोधनासाठी मार्गदर्शन करण्यास मान्यताप्राप्त किंवा या प्रयोजनासाठी विद्यापीठाकडून मान्यता मिळण्यास योग्य असलेल्या परिसंस्थेचा कायम, अभ्यागत, मानसेवी कर्मचारीवर्ग, त्यांचा अनुभव, परिसंस्थेत केलेल्या संशोधनाचा पुरावा, परिसंस्थेद्वारा प्रकाशित केलेली प्रकाशने, अहवाल, आद्याक्षरमुद्रा, पुस्तके ;

(ङ) आकारण्यात येणारी फी किंवा आकारण्याचा प्रस्ताव असलेली फी आणि इमारती, साधनसामग्री व निरंतर परिरक्षण यांसाठी व परिसंस्था सतत चालू ठेवण्यासाठी व तिच्या कार्यक्षम कामकाजासाठी केलेल्या भांडवली खर्चासाठी केलेली तरतूद ;

(२) असा अर्ज विचारात घेण्यापूर्वी, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ त्यास आवश्यक वाटेल अशी, आणखी कोणतीही माहिती मागवू शकेल.

(३) जर महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने अर्ज विचारात घेण्याचे ठरवले तर, त्यास संबंधित विषयाचे किंवा क्षेत्राचे विशेष ज्ञान असेल अशा सक्षम व्यक्तीद्वारे किंवा व्यक्तीद्वारे स्थानिक चौकशी करवून घेण्याचा निदेश देता येईल, अशा चौकशचा अहवाल विचारात घेतल्यानंतर व त्यास आवश्यक वाटत असेल तर, अशा प्रकारची आणखी चौकशी करून, महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळ अर्ज पूर्णतः अथवा अंशतः मंजूर करण्याचा किंवा नाकारण्याचा प्रस्ताव विद्यापरिषदेस सादर करील.

(४) विद्यापरिषद, उक्त मंडळाने सादर केलेल्या प्रस्तावावर विचार करून तो मंजूर करील किंवा नाकीरल. विद्यापरिषदेचा याबाबतचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

संलग्न महाविद्यालयाची स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समिती.

**८५.** (१) प्रत्येक संलग्न महाविद्यालयासाठी किंवा परिसंस्थेसाठी एक स्वतंत्र स्थानिक व्यवस्थापन समिती असेल व त्यात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) व्यवस्थापनाचा अध्यक्ष किंवा सभापती [1][किंवा त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती]—अध्यक्ष ;

(ख) व्यवस्थापनाचा सचिव किंवा त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती ;

(ग) व्यवस्थापनाने नामनिर्देशित केलेल त्या भागातील निरनिराळ्या कार्यक्षेत्रांचे प्रतिनिधीत्व करणार तीन स्थानिक सदस्य ;

(घ) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अध्यापकांनी निवडून दिलेले तीन अध्यापक ;

(ङ) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अध्यापकेतर कर्मचारीवर्गाने निवडून दिलेला एक अध्यापकेतर कर्मचारी ;

(च) प्राचार्य, सदस्य-सचिव [2][म्हणून] ;

[3][(छ) व्यवस्थापनाचा एक प्रतिनिधी] ;

(२) शासनाद्वारे किंवा स्थानिक प्राधिकरणाद्वारे व्यवस्थापन केले जाणाऱ्या किंवा चालवण्यात येणाऱ्या महाविद्यालायासाठी किंवा परिसंस्थेकरिता स्थानिक सल्लागार समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) महाविद्यालय किवा परिसंस्था याच्या स्वरूपानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, संचालक, उच्च शिक्षण किंवा संचालक, तंत्र शिक्षण, किंवा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,

---

[1] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५०(अ) एक अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५०(अ) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५०(अ) (तीन) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

किंवा यथास्थिति, संचालक, समाजकल्याण याने नामनिर्देशित केलेला सहसंचालक किंवा उप संचालक ;

(दोन) संबंधित संचालकाने नामनिर्देशित केलेल्या, वेगवेगळ्या कार्यक्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या तीन व्यक्ती ;

(तीन) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अध्यापकांनी निवडून दिलेले तीन अध्यापक ;

(चार) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी निवडून दिलेला एक अध्यापकेतर कर्मचारी ;

(पाच) प्राचार्य, सदस्य-सचिव.

(३) स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समितीच्या वर्षातून किमान दोनदा बैठका होतील.

(४) निवडून दिलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा पदावधी पाच वर्षांचा असेल.

[१][अशा सदस्यांच्या कार्यालयात कोणतेही पद रिक्त झाल्यास, तीन महिन्यांच्या आत ते पद भरण्यात येईल आणि अशा प्रकारे नियुक्त झालेला सदस्य, जर पद रिक्त झाले नसते तर, आधीच्या सदस्याने उरलेल्या जेवढ्या मुदतीकरिता ते पद धारण केले असते, तेवढ्या मुदतीकरता तो त्या पदावर राहील.]

(५) स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समितीचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) अंदाजपत्रक व वित्तीय विवरणपत्रे तयार करणे ;

(ख) अध्यापकीय व इतर पदे निर्माण करण्यासाठी व्यवस्थापनाला शिफारस करणे ;

(ग) शिक्षणाचा कार्यक्रम ठरवणे व अंतर्गत मूल्यमापन करणे आणि महाविद्यालयातील अभ्यासाच्या प्रगतीविषयी चर्चा करणे ;

(घ) महाविद्यालयातील अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी व्यवस्थापनाकडे शिफारस करणे ;

(ङ) महाविद्यालयाच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद न केलेल्या अशा नवीन खर्चाचे प्रस्ताव तयार करणे ;

(च) निरनिराळ्या वर्गाची प्रवेशक्षमता, वेळापत्रके तयार करणे, अध्यापनाच्या उपलब्ध कार्यभाराचे वाटप करणे यासंबंधात आणि प्राचार्याकडून तिच्याकडे विचारार्थ पाठवण्यात येतील त्या महाविद्यालयाचे अंतर्गत व्यवस्थापन व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शिस्त यांच्याशी संबंधित अशा इतर बाबींविषयी प्राचार्याला सल्ला देणे ;

(छ) कोणताही निरीक्षण अहवाल असल्यास, त्यावर वचार करणे आणि त्यावर शिफारशी करणे ;

(ज) स्थानिक चौकशी समितीचे कोणताही अहवाल असल्यास त्यावर विचार करणे आणि त्यांवर शिफारशी करणे ;

(झ) ३० जून रोजी संपणाऱ्या वर्षासाठी समितीने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल तयार करणे आणि तो व्यवस्थापनास, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस व संबंधित संचालकास सादर करणे ;

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५०(ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(ञ) व्यवस्थापनाकडून व विद्यापीठाकडून सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे व अशा इतर अधिकारांचा वापर करणे ;

संलग्नीकरण किंवा मान्यता चालू ठेवणे.

**८६.** संलग्न महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस, ज्यांच्यासाठी संलग्नीकरणास मंजुरी देण्यात आली आहे किंवा मान्यता देण्यात आली आहे त्या अभ्यास पाठ्यक्रमांचे संलग्नीकरण किंवा मान्यता पुढे चालू ठेवण्यासाठी, अशा संलग्नीकरणाच्या किंवा मान्यतेच्या समाप्तीच्या दिनांकापूर्वी सामान्यतः सहा महिने अगोदर अर्ज करता येईल. संलग्नीकरण किंवा मान्यता पुढे चालू ठेवण्यासंबंधात लागू असेल तेथवर, परिनियमांमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे विद्यापीठे पालन करतील.

संलग्नीकरण किंवा मान्यता याच्या व्याप्तीमध्ये वाढ करणे.

**८७.** संलग्न महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस अभ्यासाच्या जादा पाठ्यक्रमांकरिता संलग्नीकरणासाठी किंवा मान्यतेसाठी अर्ज करता येईल. विद्यापीठ, कलमे ८१, [१][८२], ८३ आणि ८४ यांमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे, ती जेथवर लागू असेल तेथवर, पालन करील.

स्थायी संलग्नीकरण व मान्यता.

**८८.** कमीत कमी सहा वर्षे संलग्न महाविद्यालय [२][किंवा परिसंस्था] किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था असलेल्या संलग्न महाविद्यालयाला [२][किंवा परिसंस्था] किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेला स्थायी संलग्नीकरणासाठी किंवा मान्यतेसाठी अर्ज करता येईल. महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ अर्जावर विचार करील, त्याची छाननी करील आणि विद्यापरिषदेकडे त्या बाबतीत शिफारशी करील. संलग्नीकरणाच्या किंवा मान्यतेच्या सर्व शर्ती, संलग्न महाविद्यालय [२][किंवा परिसंस्था] किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था समाधानकारकपणे पूर्ण करीत आहे याबद्दल आणि तिने, विद्यापीठाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेला उच्च शैक्षणिक व प्रशासकीय दर्जा प्राप्त केलेला आहे याबद्दल विद्यापरिषदेची खात्री पटली तर, विद्यापरिषद, त्या महाविद्यालयाला, किंवा यथास्थिति, परिसंस्थेला कायमचे संलग्नीकरण किंवा मान्यता देईल.

स्वायत्त विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था.

**८९.** (१) स्वायत्त दर्जा मिळविण्यासाठी, विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था विद्यापीठाकडे अर्ज करू शकेल. व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषदेच्या शिफारशीवरून स्वायत्त दर्जा प्रदान करून शकेल.

(२) स्वायत्त विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, विहित केल्याप्रमाणे त्याचे प्राधिकरण किंवा मंडळ घटित करू शकेल आणि अधिकारांचा वापर करू शकेल व कामे पार पाडू शकेल व विद्यापीठाचे प्रशासकीय, विद्याविषयक, वित्तीय आणि इतर कार्यक्रम पार पाडू शकेल.

(३) स्वायत्त विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था स्वतःचा अभ्यास पाठ्यक्रम विहित करू शकेल, स्वतःच्या अध्यापन पद्धती विकसित करू शकेल आणि तिथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा व चाचणी परीक्षा घेऊ शकेल. आणि स्वतःच्या पदव्या किंवा प्रमाणपत्रे देऊ शकेल. स्वायत्त विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, विद्याव्यासंग व गुणोत्कर्ष करण्यास पोषक अशा बौद्धिक वातावरणाचा विकास व जोपासना करण्याकरिता आवश्यक असलेले अध्यापक व विद्यार्थी यांचे शैक्षणिक स्वातंत्र्य व विद्याव्यासंग या गोष्टींना चालना देण्याचे उद्दिष्ट समोर ठेऊन काम करील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची तपासणी व अहवाल.

**९०.** (१) महाविद्यालयाचा किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा द्रर्जा ठरवणे विद्यापीठाला शक्य व्हावे म्हणून विद्यापीठ निदेश देईल असे अहवाल, विविरपत्रे व इतर तपशील संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था सादर करील.

(२) कुलगुरू, त्याने त्याबाबतीत नियुक्त केलेल्या एका किंवा अधिक समित्यांकडून प्रत्येक विद्यापीठ विभागाची किंवा परिसंस्थेची, संलग्न महाविद्यालयाची किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेची, प्रत्येक तीन वर्षांतून किमान एकदा तपासणी करण्याची व्यवस्था करील, आणि त्या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ किंवा कुलगुरूने नामनिर्देशित केलेला अधिष्ठाता—अध्यक्ष ;

(ख) विद्यापरिषदेकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशी, विद्यापीठाशी संबंध नसलेल एक तज्ज्ञ व्यक्ती ;

(ग) व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशित करण्यात द्यावयाची एक तज्ज्ञ व्यक्ती ;

[१][(घ) अधिसभेकडून नामनिर्देशित करण्यात यावयाची एक तज्ज्ञ व्यक्ती] ;

परंतु, अशा समितीतील कोणताही सदस्य हा, संबंधित महाविद्यालयाच्या, परिसंस्थेच्या व्यवस्थापनाशी संबंधित असणार नाही.

(३) समिती, तिचा अहवाल कुलगुरूकडे विचारार्थ आणि [२][* * * *] आवश्यक असेल अशी आणखी कार्यवाही करण्यासाठी सादर करील.

संलग्नीकरण किंवा मान्यता काढून घेणे.

**९१.** (१) जर संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, कलम ८१ मध्ये तरतूद केलेल्या संलग्नीकरणाच्या किंवा मान्यतेच्या शर्तीचे अनुपालन करण्यात किंवा कलम ८५ मध्ये तरतूद केल्यानुसार स्थानिक व्यवस्थापन किंवा सल्लागार समितीला यथोचितरित्या कार्य करण्यास मोकळीक देण्यात किंवा अधिनियमान्वये काढलेल्या निदेशांनुसार कार्यवाही करण्यात कसूर करील किंवा विद्यापीठाच्या हितसंबंधाला किंवा त्याने निर्धारित केलेल्या दर्जास बाधा पोहचेल अशा रीतीने, महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था चालवीत असेल तर, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, संलग्नीकरण किंवा मान्यता याद्वारे महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस प्रदान करण्यात आलेले विशेषाधिकार अंशतः किंवा पूर्णतः का काढून घेण्यात येऊ नयेत किंवा त्यात का फेरबदल करण्यात येऊ नयेत, याबाबतची कारणे दाखवा नोटीस व्यवस्थापनाला पाठवू शकेल.

(२) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, उपरोल्लिखित कारवाई ते का सुचवीत आहे याबद्दलच्या कारणांचा उल्लेख करील, व नोटिशीची एक प्रत महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख यांच्याकडे पाठवील. नोटिशीच्या उत्तरादाखल व्यवस्थापनाने किती मुदतीत आपले लेखी निवेदन सादर केले पाहिजे ती मुदतही ते, त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करील, ही मुदत तीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही.

(३) असे लेखी निवेदन मिळल्यावर, किंवा पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यावर, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, असे विशेषाधिकार काढून घेण्याबाबतच्या किंवा त्यात फेरबदल करण्याबाबतच्या प्रस्तावासह किंवा त्या प्रस्तावाशिवाय नोटीस किंवा कोणतेही लेखी निवेदन असल्यास, ते निवेदन विद्यापरिषदे पुढे मांडील.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५३(अ) अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५३(ब) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

(४) विद्यापरिषद, महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन, कुलगुरूकडे, याबाबतीत करावयाच्या कार्यवाहीची शिफारस करील आणि त्यानंतर कुलगुरू, त्या शिफारशीची अंमलबजावणी करील.

महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे.

**९२.** (१) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीखेरीज, एखाद्या महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनास, महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(२) महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन, आधीच्या वर्षाच्या १ ऑगस्टला किंवा त्यापूर्वी, (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था) बंद करण्यासंबंधीची सर्व कारणे नमूद करून व इमारती व साधनसामग्री यांच्या रूपात असलेली मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजारमूल्य आणि त्यास एकतर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून, राज्य शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्तपुरवठा संस्थांकडून आतापर्यंत मिळालेली अनुदाने यांचा निर्देश करून विद्यापीठाकडे अर्ज करील.

(३) असा अर्ज मिळाल्यावर, ते महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे याबद्दल मूल्यमापन करण्यासाठी विद्यापरिषद, तिला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करील. आवश्यक ते सहाय्य, देऊन किंवा विद्यापीठाने ते महाविद्यालय किंवा परिसंस्था ताब्यात घेऊन किंवा अन्य व्यवस्थापनाकडे ती हस्तांतरित करून, महाविद्यालय किंवा परिसंस्था बंद करण्याची बाब टाळता येईल किंवा कसे याचीही तपासणी विद्यापरिषदेस करता येईल.

(४) विद्यापरिषदेने, महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्याची शिफारस करण्याचे ठरविल्यास विद्यापरिषद, व्यवस्थापनांकडून वसूल करावयाच्या नुकसानभरपाईच्या किंवा भरपाईच्या रकमेचे प्रमाण आणि विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन किंवा इतर सार्वजनिक वित्तपुरवठा संस्था यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या पैशांचा वापर करून निर्माण करण्यात आलेल्या मत्ता, विद्यापीठाकडे किंवा इतर व्यवस्थापनांकडे हस्तांतरित करण्यात याव्यात किंवा कसे व कमी करण्यात आलेले अध्यापक व कर्मचारीवर्ग यांना द्यावयाची नुकसानभरपाई याबाबतीत अहवाल तयार करील व तो व्यवस्थापन परिषदेला सादर करील.

(५) त्यानंतर, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वसहमतीने व राज्य शासनाच्या मान्यतेने, संलग्न महाविद्यालयाला किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेला, ते महाविद्यालय किंवा ती मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे ते ठरवील.

[१][(६) विद्यापीठ, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने आणि यासंबंधात विहित केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर, ते महाविद्यालय किंवा ती मान्यताप्राप्त परिसंस्था ताब्यात घेईल किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करील.]

(७) महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत आधीच प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने, महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्याची प्रक्रिया टप्याटप्याने करण्यात येईल व पहिल्या वर्षाचे वर्ग प्रथम बंद करण्यात येतील आणि कोणालाही नव्याने प्रवेश दिला जाणार नाही. (महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था) टप्याटप्याने बंद करण्याची पद्धती ही, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

[२][(८) महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्याची पोट-कलम (१) ते (७) मध्ये निर्देशिलेली कार्यपद्धती, विद्याशाखा किंवा विषय बंद करण्यासाठीही, योग्य त्या फेरफारासह, लागू होईल.]

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५४(अ) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५४(ब) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले

## प्रकरण अकरा

## **नावनोंदणी, पदव्या व दीक्षांत समारंभ**

**९३.** सर्व पदव्युत्तर शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण आणि संशोधन कार्य विद्यापीठाकडून, संलग्न महाविद्यालयांकडून आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून सामान्यतः विद्यापीठ क्षेत्रात आणि विहित करण्यात आलेल्या रीतीने चालवण्यात येईल. पदव्युत्तर अध्यापन व संशोधन.

**९४.** विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नावनोंदणी होण्यासाठी व्यक्तीकडे, विहित करण्यात येतील अशा अर्हता असतील आणि विहित करण्यात येतील अशा शर्तीची ती पूर्तता करील. विद्यार्थ्यांची नावनोंदणी.

**९५.** (१) विद्यापीठ विभाग व विद्यापीठाकडून चालविण्यात येणाऱ्या परिसंस्था व महाविद्यालये यांमधील विद्यार्थ्यांशी संबंधित अशी शिस्त व शिस्तभंगाची कार्यवाही यासंबंधातील सर्व अधिकार, कुलगुरूकडे निहित असतील. शिस्तविषयक अधिकार आणि विद्यार्थ्यांमधील शिस्त.

(२) कुलगुरूस, आदेशाद्वारे, अधिनियमाखालील त्यांचे सर्व किंवा कोणतेही अधिकार, त्यास योग्य वाटेल त्यानुसार, त्याबाबतीत ती नामनिर्देशित करील अशा इतर अधिकाऱ्यांकडे सोपविता येतील.

(३) कुलगुरूस, आपल्या अधिकारांचा वापर करून, आदेशाद्वारे कोणत्याही विद्यार्थ्यांची किंवा विद्यार्थ्यांची हकालपट्टी करण्यात यावी किंवा विनिर्दिष्ट मुदतीसाठी त्याला किंवा त्यांना काढून टाकण्यात यावे, किंवा महाविद्यालयातील, परिसंस्थेतील किंवा विद्यापीठाच्या विभागातील एका किंवा अनेक अभ्यासक्रमांसाठी विनिर्दिष्ट मुदतीकरिता प्रवेश देऊ नये किंवा तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात यावी, किंवा विभाग, विद्यापीठाकडून चालविण्यात येणारे महाविद्यालय किंवा परिसंस्था यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षेस किंवा परीक्षांना बसण्यास पाच वर्षांहून अधिक नसेल एवढ्या विनिर्दिष्ट मुदतीसाठी मनाई करण्यात यावी किंवा तो किंवा ते विद्यार्थी ज्या परीक्षेला किंवा परीक्षांना बसला असेल किंवा बसले असतील, त्या परीक्षेचा किंवा परीक्षांचा त्या विद्यार्थाचा किंवा विद्यार्थ्यांचा निकाल रद्द करण्यात यावा, असा निदेश देता येईल :

परंतु, संबंधित विद्यार्थ्याला एख वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी काढून टाकण्यात आले असेल तर, कुलगुरू, त्याला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देईल.

(४) कुलगुरूच्या अधिकारांना कोणत्याही प्रकारे बाध येऊ न देता, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख आणि विद्यापीठ विभाग प्रमुख यांना त्यांच्या प्रभाराखालील विद्यार्थ्यांच्याबाबतीत योग्य ती शिस्त राखण्यासाठी आवश्यक असतील अशा स्रव अधिकाऱ्यांचा वापर करण्याचा प्राधिकार असेल.

(५) कुलगुरू, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची शिस्त व योग्य वर्तणूक यांच्या बाबतीत नियम करील आणि ते नियम, विद्यापीठाची सर्व संचालित महाविद्यालये व विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था यांच्या विद्यार्थांना लागू होतील आणि प्रत्येक विद्यार्थाला अशा नियमांची एक प्रत पुरविण्यात येईल.

(६) विद्यापीठाकडून चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयांचे प्राचार्य आणि परिसंस्थाचे प्रमुख यांना, त्यांना आवश्यक वाटतील त्यानुसार, कुलगुरूने केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे, शिस्त व योग्य वर्तणूक यासंबंधीचे पूरक नियम तयार करता येतील आणि [१][ते महाविद्यालयाच्या निर्देश पुस्तिकेमध्ये देखील प्रसिद्ध करण्यात येतील.] प्रत्येक विद्यार्थ्यांला अशा पूरक नियमांची प्रत पुरविण्यात येईल.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(७) प्रवेशाच्या वेळी प्रत्येक विद्यार्थी, तो स्वतः, कुलगुरूच्या आणि विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांच्या आणि प्राधिकरणे अथवा मंडळे यांच्या आणि संचालित महाविद्यालयांची व परिसंस्थांची प्राधिकरणे किंवा मंडळे यांच्या शिस्तविषयक अधिकारितेच्या अधीन असेल आणि कुलगुरूने त्याबाबतीत केलेल्या नियमांचे आणि संचालित महाविद्यालयाने प्राचार्य व विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख यांनी केलेले पूरक नियम, जेथवर लागू होतील तेथवर, त्यांचे पालन करील व ते त्याला बंधनकारक राहतील अशा अर्थाच्या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करील.

(८) विद्यापीठाकडून चालविण्यात येत नसेल असा संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या विद्यार्थ्यांविरुद्ध करावयाच्या शिस्तभंगविषयक कारवाईशी संबंधित सर्व अधिकार, संलग्न महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख यांच्याकडे निहित असतील आणि पूर्वोक्त पोट-कलमाखाली कोणतेही नियम करण्यात आलेले असल्यास, त्या नियमांसह त्या पोट-कलमाच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, अशा महाविद्यालयांना, परिसंस्थांना व त्यातील विद्यार्थ्यांना लागू असतील.

पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी.

**९६.** (१) व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरू आणि प्रदान करता येतील.

(२) कुलपतीस, नैतिक अधःपाताचा ज्यात अंतर्भाव होतो अशा अपराधाबद्दल न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला दोषी ठरविले असेल तर, [१][किंवा लबाडीने अशी पदवी किंवा पदविका किंवा प्रमाणपत्र किंवा अन्य कोणतीही विद्याविषयक उपाधी मिळवली आहे असे आढळून आले असेल तर,] व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद यांनी केलेल्या आणि अशा प्रत्येक प्राधिकरणाच्या सभेस हजर असणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने—अशा बहुमतामध्ये अशा प्रत्येक प्राधिकरणाच्या निम्म्यापेक्षा कमी नसतील इतके सदस्य असतील,—पुष्टी दिलेल्या शिफारशीवरून, पदवी किंवा पदविका किंवा प्रमाणपत्र अथवा कोणतीही विद्याविषयक अन्य विशेषोपाधी कायमची किंवा कुलपतीस योग्य वाटेल अशा मुदतीसाठी काढून घेता येईल. संबंधित व्यक्तीस, स्वतःच्या बचावाची संधी दिल्याखेरीज या कलमान्वये अशी कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

सन्मान्य पदवी.

**९७.** (१) व्यवस्थापन परिषदेच्या, कोणत्याही व्यक्तीस, कोणतीही चाचणी परीक्षा किंवा परीक्षा देण्यास भाग न पाडता, केवळ तिचे श्रेष्ठ स्थान, नैपुण्य व सार्वजनिक सेवा यामुळे सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी मिळण्यास ती पात्र व योग्य आहे, याच केवळ कारणांवरून त्या व्यक्तीला अशी पदवी किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी प्रदान करण्याबाबत विचार करता येईल. व अधिसभेकडे तशी शिफारस करता येईल, आणि अशा शिफारशीला, अधिसभेच्या सभेला हजर असणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतक्यां,—एकूण सदस्यसंख्येच्या निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या—बहुमताने पुष्टी मिळाली तर, ती शिफारस यथोचितरित्या संमत करण्यात आली असल्याचे मान्यात येईल :

परंतु, कुलगुरूने कुलपतीची पूर्वमान्यता मिळवलेली असल्याखेरीज, व्यवस्थापन परिषद, त्यासंबंधीचा कोणताही प्रस्ताव विचारार्थ स्वीकारणार नाही किंवा विचारात घेणार नाही.

(२) व्यवस्थापन परिषदेस, अधिसभेच्या प्रस्तावावर निर्णय घेता येईल, मात्र, कुलगुरूने कुलपतीची पूर्वमान्यता मिळवलेली असल्याखेरीज, अधिसभा, त्यासंबंधीचा कोणताही प्रस्ताव विचारार्थ दाखल करून घेणार नाही किंवा विचारात घेणार नाही.

दीक्षांत समारंभ.

**९८.** विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा, पदव्या, पदव्युत्तर पदविका प्रदान करण्याकरिता किंवा इतर कोणत्याही प्रयोजनांकरिता परिनियमाद्वारे विहित करण्यात आलेल्या रीतीने, विद्यावर्षातून किमान एकदा करण्यात येईल.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**९९.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदीस अधीन राहून, पुढील व्यक्तींना, विद्यापीठाकडून ठेवण्यात येणाऱ्या नोंदणीकृत पदवीधरांच्या किंवा नोंदणीकृत पदवीधर असल्याचे मानण्यात येणाऱ्या व्यक्तीच्या नोंदवहीत आपली नावे नोंदवायचा हक्क असेल, त्या व्यक्ती अशा,— नोंदणीकृत पदवीधर.

(क) विद्यापीठाच्या पदवीधर असलेल्या व्यक्ती ;

[१][(ख) ज्यामधून नवीन तत्सम विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे त्या मूळ विद्यापीठाच्या पदवीधर असलेल्या व्यक्ती ;

परंतु, मूळ विद्यापीठामध्ये नोंदणीकृत पदवीधर म्हणून ज्यांची नोंदणी झाली आहे परंतु, जे नवीन विद्यापीठाच्या अधिकारितेत राहात आहेत अशा पदवीधरांना नवीन विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी करण्याकरिता, नवीन विद्यापीठाकडे अर्ज करावा लागेल आणि नवीन विद्यापीठामध्ये एकदा नोंदणी झाल्यावर ते आपोआप मूळ विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर म्हणून असण्याचे बंद होईल.]

(२) जी व्यक्ती,—

(क) विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल ;

(ख) अमुक्त नादार असेल ;

(ग) ज्यात नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असेल अशा एखाद्या अपराधाबद्दल जिला न्यायालयाकडून दोषी ठरविण्यात आले असेल ;

(घ) महाराष्ट्र राज्यात कायद्याद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर असेल,

ती व्यक्ती, पदवीधरांच्या नोंदवहीत आपल्या नावाची नोंद करून घेण्यास किंवा नोंदणीकृत पदवीधर असण्यास अर्ह असणार नाही.

(३) नोंदणीकृत पदवीधर होऊ इच्छिणारी प्रत्येक व्यक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात कुलसचिवांकडे अर्ज करील आणि अशी फी भरील.

(४) कुलगुरू, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, एखाद्या व्यक्तीस नोंदणीकृत पदवीधर असण्याचा हक्क आहे किंवा कसे याबाबत निर्णय देईल. एखाद्या व्यक्तीस नोंदणीकृत पदवीधराच्या नोंदवहीत आपल्या नावाची नोंद करून घेण्याचा किंवा नोंदणीकृत पदवीधर असण्याचा हक्क आहे किंवा कसे, किंवा, ती, नोंदणीकृत पदवीधर होण्यास अर्हताप्राप्त नाही किंवा कसे याबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास, यांचा निर्णय कुलगुरू, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(५) कलम २५, पोट-कलम (२), खंड (द) अन्वये अधिसभेच्या सदस्यांच्या निवडणुकीकरिता नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदलेल्या व्यक्तींमधून निर्वाचन गणाची रचना करण्यात येईल आणि त्या प्रयोजनांसाठी, एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करून, विहित केल्याप्रमाणे मतदार यादी तयार करण्यात येईल. या नोटिशीद्वारे, अशा मतदार यादीमध्ये नावनोंदणी करण्यास इच्छुक असणाऱ्या नोंदणीकृत पदवीधरांना अशा नावनोंदणीसाठी विहित नमुना भरणे आवश्यक करण्यात येईल.

**१००.** (१) व्यवस्थापन परिषदेच्या मते, ज्यात नैतिक अध:पाताचा अंतर्भाव होतो अशा गंभीर स्वरूपाच्या असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल न्यायालयाने कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविले असेल तर, कुलपतीस, व्यवस्थापन परिषदेने केलेल्या व तिच्या सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या दोन तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने,—अशा बहुमतात तिच्या निम्म्याहून कमी नसीतल इतक्या सदस्यांचा समावेश असेल—पुष्टी दिलेल्या शिफारशीवरून, अशी कोणत्याही व्यक्तीचे नाव कुलपतीत योग्य वाटेल अशा मुदतीसाठी, पदवीधराच्या नोंदवहीतून काढून टाकता येईल. पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकणे.

---

[१] सन २००० हा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५७ अन्वये हे उपखंड दाखल करण्यात आला.

(२) संबंधित व्यक्तीस, परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे बचावासाठी आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याखेरीज, या कलमान्वये कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

प्रकरण बारा

**विद्यापीठ निधी, लेखे व लेखापरीक्षा**

वार्षिक वित्तीय अंदाज. **१०१.** (१) आगामी वर्षाकरिता विद्यापीठाचे वार्षिक वित्तीय अंदाज (अर्थसंकल्पवित्तीय वर्ष सुरू होण्यापूर्वी कमीत कमी दोन महिने पूर्वी वित्त व लेखा समितीच्या निदेशाअन्वये वित्त व लेखा अधिकाऱ्यांकडून तयार करण्यात येतील.

(२) त्यानंतर, वित्त व लेखा अधिकारी, व्यवस्थापन परिषदेने, [१][आणि अधिसभेने] मान्य केलेल्या वित्तीय अंदाजांच्या प्रती कुलपती, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद व राज्य शासन यांना पाठवील.

(३) राज्य शासनाचे जे वित्तीय वर्ष असेल तेच विद्यापीठाचे वित्तीय वर्ष असेल.

विद्यापीठ निधी. **१०२.** (१) विद्यापीठ, पुढील निधी स्थापन करील :—

(क) सर्वसाधारण निधी ;

[२][(ख) वेतन निधी,—

(एक) फक्त शासनाने मान्यता दिलेल्या सर्व पदांकरिता ;

(दोन) इतर सर्व पदांकरिता, स्वतंत्रपणे ;] ;

(ग) विश्वस्त निधी ;

(घ) विकास व कार्यक्रम निधी ;

(ङ) आकस्मिकता निधी ;

(च) विद्यापीठाच्या मते, स्थापन करणे आवश्यक असेल असा तर कोणताही निधी.

(२) पुढील रकमा सर्वसाधारण निधीचा भाग असतील, किंवा त्यामध्ये त्यांचा भरणा करण्यात येईल :—

(क) राज्य शासन किंवा केंद्र सरकार किंवा विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून मिळालेले वेतनेत्तर अंशदान किंवा अनुदान ;

(ख) फी व आकार यांच्या उत्पन्नासह, अन्य कोणत्याही मार्गाने विद्यापीठाला मिळणारे सर्व उत्पन्न ;

(ग) राज्य शासनाच्या परवानगीने बँकांकडून किंवा अन्य कोणत्याही अभिकरणाकडून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा ;

(घ) अन्य कोणत्याही मार्गाने किंवा अभिकरणाकडून मिळालेल्या रकमा.

(३) वेतन निधीमध्ये, राज्य शासन, केंद्र सरकार किंवा विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून वेतन व भत्ते यांच्या पूर्णतः किंवा अंशतः प्रदानापोटी मिळालेल्या सर्व रकमांचा समावेश होईल. वेतन व भत्ते देण्याच्या प्रयोजनांव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी या निधिमधील कोणत्याही रकमेचा वापर करण्यात येणार नाही.

(४) विश्वस्तव्यवस्था, मृत्यूपत्रित देणग्या, स्थायीदाने, अर्थसहाय्य व तत्सम अनुदाने यांपासून मिळणारे सर्व उत्पन्न किंवा पैसा यांचा मिळून विश्वस्त निधी होईल.

(५) (क) विद्यापीठाच्या विकास व कार्यक्रम निधीमध्ये, राज्य शासनाकडून मिळालेली सर्व मूलभूत विकास अनुदाने, विकास व संशोधन यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेली सर्व

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५९(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

अंशदाने आणि केंद्र सरकारची निधी पुरविणारी इतर अभिकरणे, संयुक्त राष्ट्रे व त्यांच्या संलग्न संस्था, इतर आंतरराष्ट्रीय अभिकरणे, उद्योग, बँका व वित्त संस्था किंवा कोणतीही व्यक्ती यांच्याकडून मिळालेली अनुदाने यांचा समावेश होईल ;

(ख) विद्यापीठाच्या इतर कोणत्याही निधीमध्ये या निधीमधील कोणत्याही रकमेचे विनियोजन करण्यात येणार नाही किंवा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी ती खर्च करण्यात येणार नाही.

(ग) कार्यक्रमांच्या उद्दिष्टांशी सुसंगत असेल अशा रीतीने विकास व कार्यक्रम निधीचा वापर करण्यात येईल. यांसाठी एक उचित संहिता स्वीकृत करण्यात येईल व त्यात, व्यवस्थापन परिषदेने मंजूर करावयाच्या व मान्यता द्यावयाच्या खर्च व लेखापरीक्षा यासंबंधात वित्तव्यवस्था करणाऱ्या अभिकरणाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात येईल.

(६) विद्यापीठाच्या लेख्यांमध्ये एका स्वतंत्र लेखाशीर्षाखाली विद्यापीठाचा, एक आकस्मिकता निधी असेल व त्या लेखाशीर्षाखाली तो निधी ठेवील. कोणताही अनपेक्षित खर्च भागविण्याच्या प्रयोजनांसाठीच केवळ त्याचा वापर करण्यात येईल.

[१][(७) पूर्वोक्त प्रयोजनांसाठी जिचा ताबडतोब किंवा नजिकच्या दिनांकाला वापर करणे शक्य नसेल अशी, या निधीच्या जमाखाती असलेली अतिरिक्त रक्कम, राज्य शासनाचा ज्यात वित्तीय सहभाग आहे अशा महामंडळाच्या समभागांमध्ये किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या युनिटस्‌मध्ये, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रांमध्ये किंवा भारतीय औद्योगिक विकास बँकेच्या किंवा आय.सी.आय.सी.आय.च्या बंधपत्रांमध्ये किंवा वेळोवेळी व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही पद्धतीनुसार गुंतविण्यात येईल.]

**१०३.** (१) दरवर्षी, किमान एकदा आणि कोणत्याही परिस्थितीत वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत, व्यवस्थापन परिषदेने, विद्यापीठाची कोणतीही प्राधिकरणे किंवा त्यांचे व्यवहार यांमध्ये ज्यांच्या भागीदारांचा कोणताही हितसंबंध असणार नाही अशा सनदी लेखापालांच्या भागीदारी संस्थांमधून नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून विद्यापीठाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल. वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

(२) लेखापरीक्षा झालेले लेखे विद्यापीठाद्वारे प्रसिद्ध केले जातील व त्यांची एक प्रत लेखापरीक्षकांच्या अहवालासह कुलपतीस, राज्य शासनास सादर केली जाईल आणि असे लेखापरीक्षा झालेले लेखे मिळाल्यानंतर, अधिसभा ते लेखे विचारात घेईल आणि त्यांवर तिला योग्य वाटेल असा ठराव संमत करील.

[२][(२क) राज्य शासन, त्याला प्राप्त झालेले विद्यापीठाचे लेखापरीक्षा केलेले वार्षिक लेखे राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.]

(३) राज्य शासनास, ठराविक कालांतरांनी, विद्यापीठाच्या लेख्यांची चाचणी लेखापरीक्षा किंवा पूर्ण लेखापरीक्षा राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांमार्फत करवून घेता येईल.

**१०४.** [३][(१)] विद्यापीठाचे वार्षिक अहवाल विद्यापीठाकडून तयार करण्यात येतील आणि प्रसिद्ध करण्यात येतील व व्यवस्थापन परिषदेद्वारे मान्य करण्यात आलेले असे अहवाल, कुलपती, राज्य शासन व अधिसभा यांना सादर करण्यात येतील अधिसभेस, तिच्या बैठकीत वार्षिक अहवालावर विचार करता येईल व तिला योग्य वाटतील, अशा शिफारशी करता येतील. व्यवस्थापन परिषद, अधिसभेच्या शिफारशींवर योग्य ती कार्यवाही करील व केलेली कार्यवाही ही अधिसभेला कळवील. वार्षिक अहवाल.

[३][(२) राज्य शासन, त्याला प्राप्त झालेला विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.]

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, याच्या कलम ५९(ब) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम १२ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये मूळ मजकुराला पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला आणि अशा नव्याने क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण तेरा

### श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाकरिता विशेष तरतुदी

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाकरिता विशेष तरतुदी.

**१०५.** (१) हा अधिनियम व परिनियम यांच्या इतर तरतुदींबरोबरच, या कलमात दिलेल्या तरतुदी, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठास लागू होतील.

(२) या अधिनियमाद्वारे विद्यापीठाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर ज्या प्रादेशिक मांमध्ये करण्यात येईल, त्या प्रादेशिक सीमांमध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश असेल :

परंतु, विद्यापीठास, त्यास आणि राज्य शासनास लादणे योग्य वाटेल अशा शर्ती व निर्बंध यांस अधीन राहून, संबंधित शासनाची मान्यता घेऊन, अन्य कोणत्याही प्रदेशातील कोणत्याही महिला शिक्षण परिसंस्थेला विद्यापीठाचे विशेषाधिकार देता येतील.

(३) महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागातील किंवा अन्य प्रदेशातील कोणत्याही विद्यार्थीनीस, विद्यापीठाची खाजगी विद्यार्थीनी म्हणून नाव नोंदवता येईल किंवा विद्यापीठाच्या पत्रव्यवहार पाठ्यक्रमासाठी किंवा अन्य कोणत्याही बाह्य पदवी किंवा पदविका पाठ्यक्रमासाठी प्रवेश घेता येईल.

(४) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही संस्थेने, संघटनेने किंवा मंडळाने केवळ विद्यार्थीनींसाठी सुरू केलेल्या किंवा चालवलेल्या महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाने संलग्न करून घ्यावे किंवा मान्यता द्यावी अशी मागणी करणाऱ्या त्या संस्थेने, संघटनेने किंवा मंडळाने, ज्या कोणत्याही अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रात, यथास्थिति, ते महाविद्यालय किंवा तो परिसंस्था स्थित असेल किंवा त्याक्षेत्रात येत आहे त्या क्षेत्रातील विद्यापीठाची परवानगी मागण्याची आवश्यकता नाही. अशा कोणत्याही संस्थेकडून, संघटनेकडून किंवा मंडळाकडून अर्ज आल्यानंतर विद्यापीठास, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या कोणत्याही अन्य विद्यापीठाच्या क्षेत्रात ते महाविद्यालय किंवा परिसंस्था स्थित असेल किंवा त्याक्षेत्रात येत आहे त्या क्षेत्रातील विद्यापीठाची परवानगी न मागता, राज्य शासनाच्या पूर्व, यथास्थिति, संलग्न करून घेता येईल किंवा मान्यता देता येईल.

(५) विद्यापीठास, महिलांच्या शिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्याबाहेर कोणत्याही प्रदेशात, संबंधित शासनाच्या मंजुरीने, महाविद्यालय किंवा संशोधन परिसंस्था सुरू करता येईल किंवा चालवता येईल.

(६) विद्यापीठाने संलग्नता दिलेली किंवा मान्यता दिलेली कोणतीही शैक्षणिक परिसंस्था, विद्यापीठाच्या व राज्य शासनाच्या परवानगीने खेरीज इतर बाबतीत, कायद्याद्वारे स्थापित अन्य कोणत्याही विद्यापीठाशी कोणत्याही प्रकारे संबंध ठेवणार नाही किंवा त्या विद्यापीठाचे कोणतेही विशेषाधिकारांची मागणी करणार नाही.

(७) या विद्यापीठाच्या अधिसभेचे पुढीलप्रमाणे अतिरिक्त सदस्य असतील :—

(क) कुलगुरूने नामनिर्देशित केलेले, महाराष्ट्र राज्यातील महिला शैक्षणिक संघटना किंवा मंडळे यांचे दोन प्रतिनिधी ;

(ख) कुलगुरूने नामनिर्देशित केलेले, गुजरात राज्यातील महिला शैक्षणिक संघटना किंवा मंडळे यांचे दोन प्रतिनिधी ;

(ग) कुलगुरूने नामनिर्देशित केलेले, अन्य प्रदेशातील महिला शैक्षणिक संघटना किंवा मंडळे यांचे एक प्रतिनिधी ;

[१][(८) परिनियमांचा किंवा आदेशांचा किंवा विनियमांचा मसुदा तयार करण्याचे किंवा प्रशाला तंत्रनिकेतन, इत्यादी चालविणे यांसारखे अन्य कार्यक्रम हाती घेण्याचे अधिकार विद्यापीठाला असतील.

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ६० अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(९) परीक्षा मंडळे किंवा विद्यापीठाच्या समित्या यांच्या कोणत्याही सदस्यांची, अपवादात्मक परिस्थितीत, तशी लेखी नोंद घेऊन, मंडळाच्या लेखी मान्यतेखेरीज, प्राश्निक, परीक्षक, नियामक, निर्देशी म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.]

प्रकरण चौदा

**संकीर्ण**

**१०६.** (१) विद्यापीठाच्या हितसंबंधाचे योग्य प्रकारे रक्षण करण्यात येत आहे याबद्दल खात्री करून घेणे हे, विद्यापीठाच्या प्रत्येक प्राधिकरणाचे किंवा मंडळाचे आणि अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल. नुकसानीबद्दल प्राधिकरणे आणि अधिकारी जबाबदार असणे.

(२) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा मंडळाने किंवा अधिकाऱ्याने सद्‌भावनेने केलेली असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत केलेली कोणतीही कृती ही, हा अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्या तरतुदींशी सुसंगत नसेल अशा कोणत्याही कृतीमुळे अथवा त्याने हेतुपुरस्सर हयगय किंवा कसूर करून त्या तरतुदींशी सुसंगत अशी कृती न केल्यामुळे विद्यापीठाचे कोणतेही नुकसान किंवा हानी झाल्याचे आढळून आले तर, परिनियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार, असे नुकसान किंवा हानी त्या प्राधिकरणाकडून किंवा मंडळाकडून किंवा त्यांच्या संबंधित सदस्यांकडून, संयुक्तपणे किंवा पृथकपणे, किंवा यथास्थिति, संबंधित अधिकाऱ्याकडून वसूल केली जाण्यास पात्र असेल.

**१०७.** (१) खाजगी महाविद्यालयाचा अध्यापक हा, त्यास राज्य विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा किंवा संसदेचा सदस्य म्हणून निवडून देण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आलेला आहे केवळ याच कारणावरून असा अध्यापक असण्याचे चालू राहण्यासाठी निरर्ह ठरणार नाही. राज्य विधानमंडळाचे आणि संसदेचे सदस्यत्व.

(२) राज्य विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा किंवा संसदेचा सदस्य म्हणून निवडून देण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आलेला अध्यापक हा, त्याचा विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या किंवा संसदेच्या सदस्यत्त्वाचा कालावधी बिनपगारी आणि बिनभत्ता रजा म्हणून मानला जाण्यास हक्कदार असेल.

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेला अध्यापक त्याच्या विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या किंवा संसदेच्या सदस्यत्त्वाचा कालावधी निवृत्तिवेतन, सेवाज्येष्ठता व वेतनवाढी यांच्या प्रयोजनासाठी हिशेबात घेतला जाण्यास देखील हक्कदार असेल.

**१०८.** (१) हा अधिनियम किंवा कोणताही परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम यांच्या कोणत्याही तरतुदींच्या अर्थउकलीसंबंधात किंवा विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ याचा सदस्य म्हणून, एखादी व्यक्ती यथोचितरित्या निवडून आली आहे किंवा तिची नेमणूक करण्यात आली आहे किंवा तिला नामनिर्देशित या स्वीकृत करण्यात आले आहे किंवा सदस्य असण्यास ती हक्कदार आहे किंवा काय यासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, कुलगुरू, प्रतिकूल परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा मंडळाने विनंतीअर्ज केल्यावरून किंवा स्वाधिकारे, ती बाब कुलपतीकडे विचारार्थ पाठवील आणि कुलपती, त्याला आवश्यक वाटेल असा सल्ला त्यावर घेतल्यानंतर, त्या प्रश्नांचा निर्णय करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल : अर्थउकली संबंधातील प्रश्न आणि विद्यापीठ प्राधिकरण किंवा मंडळ, इत्यादिच्या घटने-संबंधातील विवाद.

परंतु, अधिसभेच्या पंचवीसपेक्षा कमी नसतील एवढ्या सदस्यांनी सहीनिशी मागणी केल्यानंतर कुलगुरूकडून कुलपतीकडे असा निर्देश केला जाईल.

**१०९.** (१) विद्यापीठाने किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यानी, प्राधिकाऱ्यानी किंवा मंडळानी सद्‌भावनापूर्वक केलेल्या सर्व कृती आणि काढलेले सर्व आदेश, या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, अंतिम असतील ; आणि त्यानुसार, सद्‌भावनापूर्वक आणि हा अधिनियम व परिनियम, कृती व आदेश यांचे संरक्षण.

आदेश, विनियम व नियम यांच्या तरतुदींना अनुसरून केलेल्या किंवा काढलेल्या किंवा केल्याचे किंवा काढल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, विद्यापीठाविरुद्ध किंवा त्याच्या अधिकाऱ्यांविरुद्ध प्राधिकरणांविरुद्ध किंवा मंडळांविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही, किंवा तो चालवण्यात येणार नाही किंवा त्यांच्याकडून कोणत्याही नुकसानभरपाईची मागणी करण्यात येणार नाही.

अधिकार सोपवणे.

**११०.** हा अधिनियम आणि परिनियम यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास आदेशाद्वारे, परिनियम, आदेश, विनियमन व नियम करण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त, त्यांचे अन्य अधिकार, त्यांच्या नियंत्रणाखालील कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे, आणि अशा रीतीने सोपविलेल्या अधिकारांच्या वापराबद्दलची अंतिम जबाबदारी ही, उक्त अधिकार सोपविणाऱ्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे निहित असण्याचे चालू राहील या शर्तीस अधीन राहून, सोपविता येतील.

कृती व कार्यवाही ही रचनेतील दोष, रिक्त पदे, कार्यपद्धतीतील नियमबाह्यता, इत्यादी, केवळ या कारणावरून विधिअग्राह्य नसणे.

**१११.** अधिसभेची किंवा व्यवस्थापन परिषदेची किंवा विद्यापरिषदेची किंवा विद्यापीठाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणाची किंवा कोणत्याही मंडळाची किंवा कुलगुरूच्या नियुक्तीसाठी कुलपतीने नियुक्त केलेल्या समितीसह अन्य समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ पुढील कारणावरून विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही :—

(क) अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या, मंडळाच्या किंवा समितीच्या सदस्यांपैकी कोणतेही सदस्य हे, निर्वाचित, नियुक्त, किंवा नामनिर्देशित झालेले नाहीत किंवा स्वीकृत करण्यात आलेले नाहीत किंवा इतर कोणत्याही कारणामुळे त्यांच्या घटनेच्या वेळी पदे धारण करण्यास किंवा त्यांच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्यास उपलब्ध नाहीत किंवा कोणतीही व्यक्ती एकापेक्षा अधिक नात्यांनी सदस्य आहे किंवा त्यांच्या घटनेमध्ये इतर काही दोष आहे किंवा त्याच्या सदस्यांपैकी एका किंवा अधिक सदस्यांची पदे रिक्त आहेत ;

(ख) अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या, मंडळाच्या किंवा समितीच्या कार्यपद्धतीत विचाराधीन विषयाच्या गुणावगुणांस ज्यामुळे बाधा पोहचत नाही अशी कोणतीही नियमबाह्यता आहे ;

आणि अशा कृतीच्या किंवा कार्यवाहीच्या कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे किंवा अधिकाऱ्यापुढे केवळ अशाच कारणावरून हरकत घेण्यात येणार नाही.

प्रकरण पंधरा

**नवीन विद्यापीठे स्थापन करणे.**

नवीन विद्यापीठ घटित करताना बाबींसाठी तरतुदी करण्याकरिता आदेश काढणे.

**११२.** कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणतेही नवीन विद्यापीठ घटित केली जाईल तेव्हा, राज्य शासनास, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आलेल्या एका किंवा त्याहून अधिक आदेशांद्वारे पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) विद्यापीठाचा पहिला कुलगुरू आणि अन्य अधिकारी यांची नियुक्ती आणि ज्या पदावधीसाठी त्यांची नियुक्ती केली जाईल तो पदावधी ;

(ख) त्यास योग्य वाटेल अशा पद्धतीने पहिली व्यवस्थापन परिषद आणि विद्यापरिषद यांची घटना आणि ज्या मुदतीसाठी त्या काम करतील ती मुदत ;

(ग) ते विनिर्देश करील अशा फेरफारांसह असे परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम चालू ठेवणे किंवा लागू करणे ;

(घ) आधीच्या विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर म्हणून राहावयाचे की नवीन विद्यापीठाकडे नोंदणी करून घ्यावयाची यासंबंधात, त्या वेळच्या विद्यमान कोणत्याही विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांनी विकल्पाचा वापर करणे ;

(ङ) अधिनियमान्वये घटित करण्यात आलेल्या विद्यमान विद्यापीठांची अधिसभा, व्यवस्थापन परिषद आणि अन्य प्राधिकरणे, मंडळे आणि समित्या यांचे सदस्यत्त्व चालू ठेवणे किंवा खंडित करणे ;

(च) विद्यमान विद्यापीठाची प्राधिकरणे किंवा मंडळे, समित्या यांच्या सदस्यांचे सदस्यत्व खंडित केल्यामुळे रिक्त झालेली पदे भरणे ;

(छ) ज्या नवीन विद्यापीठाला क्षेत्र जोडण्यात आले आहे त्या नवीन विद्यापीठाच्या महाविद्यालयांचे संलग्नीकरण आणि परिसंस्थांची मान्यता पुढे चालू ठेवणे आणि ज्यामधून निराळे करण्यात आले आहे त्या विद्यमान विद्यापीठाने हे संलग्नीकरण आणि मान्यता खंडित करणे ;

(ज) विद्यमान विद्यापीठांच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांची नवीन विद्यापीठाकडे बदली आणि अशा कर्मचाऱ्यांना लागू होणाऱ्या अटी व शर्ती किंवा राज्य शासनास योग्य वाटतील असे, अंतिम लाभ देऊन विद्यमान विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करणे :

परंतु, अशा प्रकारे बदली करण्यात आलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्तींमध्ये, त्याचे नुकसान होईल अशा प्रकारे बदल केले जाणार नाहीत ;

(झ) मत्तांचे म्हणजेच जंगम किंवा स्थावर मालमत्ता यांचे, तसेच हक्क, संपादित केलेले कोणत्याही प्रकारचे हितसंबंध आणि असा आदेश काढण्यात येण्यापूर्वी पत्करलेली दायित्वे आणि बंधने यांचे हस्तांतरण ; आणि

(ञ) राज्य शासनास योग्य वाटतील अशा अन्य पूरक, आनुषंगिक आणि परिणामस्वरूप तरतुदी.

प्रकरण सोळा

**संक्रमणात्मक तरतुदी**

विद्यापीठाचे विद्यमान अधिकारी व कर्मचारी असणे चालू राहणे.

**११३.** या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकाला विद्यमान विद्यापीठाचा अधिकारी किंवा कर्मचारी (मग तो अध्यापन कर्मचारी असो किंवा अन्य कर्मचारी असो) म्हणून पद धारण करणारी प्रत्येक व्यक्ती, अशा दिनांकाच्या लगतपूर्वी, तिला लागू असलेल्या अटंवर व शर्तींवरच पद धारण करण्याचे चालू ठेवील आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करतील आणि कर्तव्ये पार पाडतील.

प्राधिकरण घटित करणे.

**११४.** (१) विद्यमान विद्यापीठाच्या प्रत्येक प्राधिकरणाची, व्यवहार्य असेल त्याप्रमाणे, शक्य तितक्या लवकर, परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार पुनर्घटना करण्यात येईल, अशा प्रत्येक प्राधिकरणाचा कुलगुरू, अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून पुनर्घटना करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, अशा कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून पद धारण करणारी प्रत्येक व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकाला उक्त पद धारण करण्याचे चालू ठेवील आणि असे सदस्य असलेले प्राधिकरण, ज्या दिनांकाला ते प्राधिकरण पुनर्रचित करण्यात आल्याचे समजण्यात येईल तो दिनांक किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेला सहा महिन्यांचा कालावधी

समाप्त होईल तो दिनांक, यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापर्यंत, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील आणि कर्तव्ये पार पाडील.

(३) ज्या दिनांकाला कोणतेही प्राधिकरण पुनर्घटित करण्यात आल्याचे समजण्यात येईल, तो दिनांक किंवा सहा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्याचा दिनांक, यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकाला, या कलमानुसार जो पदावर असण्याचे चालू राहिला असेल अशा, विद्यमान विद्यापीठाच्या प्रत्येक सदस्याने आपले पद रिक्त केले असल्याचे समजण्यात येईल.

निरसन व व्यावृत्ती.

**११५.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला व तेव्हांपासून,—

(क) मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९७४ ; १९७४ चा महा. २२.

(ख) पुणे विद्यापीठ अधिनियम, १९७४ ; १९७४ चा महा. २३.

(ग) शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ ; १९७४ चा महा. २४.

(घ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९७४ ; १९७४ चा महा. २५.

(ङ) [१][राष्ट्रसंत तुकडोजी महाराज] नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९७४ ; १९७४ चा महा. २६.

(च) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९७४ ; १९७४ चा महा. २७.

(छ) [१][संत गाडगेबाबा] अमरावती विद्यापीठ अधिनियम, १९८३ ; आणि १९८३ चा महा. ३७.

(ज) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ ; १९८९ चा महा. २९.

निरसित होतील.

(२) उक्त अधिनियमाचे निरसन करण्यात आले असले तरीही,—

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, विद्यमान विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती, अशा प्रारंभानंतर, तत्सम विद्यापीठाची कुलगुरू होईल आणि ती विद्यामान विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून असल्याचे चालू राहिले असते तर, असा कुलगुरू म्हणून तिचा पदावधी ज्यावेळी संपला असता तोपर्यंत, उक्त पद धारण करण्याचे चालू राहील. मात्र, पूर्वोक्ताप्रमाणे तिचा पदावधी, समाप्त होण्यापूर्वी मृत्यूमुळे, राजीनामा दिल्यामुळे किंवा अन्यथा ती व्यक्ती कुलगुरू असण्याचे बंद झाले तर, ती गोष्ट वेगळी आणि ती व्यक्ती, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तत्सम विद्यापीठाच्या कुलगुरूला प्रदान करण्यात आणि त्याच्यावर सोपविण्यात आलेल्या अनुक्रमे सर्व अधिकारांचा वापर करण्याचे व सर्व कर्तव्ये पार पाडण्याचे चालू ठेवील ;

(दोन) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही विद्यमान विद्यापीठाला संलग्न असलेली सर्व महाविद्यालये या अधिनियमान्वये तत्सम विद्यापीठाकडून त्यांचे संलग्नीकरण काढून घेण्यात येत नसेल तोपर्यंत, या अधिनियमान्वये तत्सम विद्यापीठाला संलग्न असल्याचे समजण्यात येईल ;

(तीन) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाचे कोणतेही विशेषाधिकार मिळण्यास हक्कदार होत्या अशा इतर सर्व शैक्षणिक परिसंस्था, तत्सम विद्यापीठाचे त्याच प्रकारचे विशेषाधिकार मिळण्यास हक्कदार असतील ;

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(चार) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाची सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता आणि सर्व हक्क, कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, अधिकार व विशेषाधिकार, तत्सम विद्यापीठाकडे हस्तांतरित होतील आणि कोणत्याही आणखी हस्तांतरणपत्राशिवाय, ते तत्सम विद्यापीठाकडे निहित होतील आणि ज्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी तत्सम विद्यापीठ घटित करण्यात आले आहे त्याच प्रयोजनांसाठी व उद्दिष्टांसाठी त्यांचा वापर करण्यात येईल ;

(पाच) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाने स्वीकारलेली किंवा त्याला मिळालेली व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्याने धारण केलेली सर्व धर्मदाने ही, तत्सम विद्यापीठाने या अधिनियमान्वये स्वीकारली असल्याचे किंवा त्यास ती मिळाली असल्याचे किंवा त्याने ती धारण केली असल्याचे मानण्यात येईल व ज्या शर्तीवर अशी धर्मदाने स्वीकारली असतील किंवा ती मिळाली असतील किंवा धारण केली असतील अशा सर्व शर्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी विसंगत असल्या तरीही, या अधिनियमान्वये विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल ;

(सहा) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी पत्करलेली आणि कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या नावे वैधरीत्या अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे व बंधने यांची तत्सम विद्यापीठाकडून फेड व पूर्ती करण्यात येईल ;

(सात) ज्यात विद्यमान विद्यापीठाच्या नावाने कोणतेही मृत्यूपत्रित दान, देणगी, आबंधन (ट्रम) अथवा विश्वस्त निधी अंतर्भूत असेल असे, उक्त अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी करण्यात आलेले कोणतेही इच्छापत्र, विलेख, अथवा इतर दस्तऐवज याचा अन्वयार्थ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिवशी व त्या दिवसापासून, त्यात जणू काही विद्यमान विद्यापीठाच्या नावाऐवजी तत्सम विद्यापीठाचे नाव अंतर्भूत करण्यात आलेले असावे, अशा प्रकारे लावण्यात येईल ;

(आठ) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाबद्दलचे कोणत्याही अधिनियमितितील अथवा कोणत्याही अधिनियमितीअन्वये काढण्यात आलेल्या इतर लेखांतील सर्व निर्देश हे, तत्सम विद्यापीठाबद्दलचे निर्देश आहेत, असा त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(नऊ) उक्त अधिनियमांन्वये वैधरित्या करण्यात आलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या, परीक्षकांच्या नेमणुका या, तत्सम विद्यापीठाकरिता, या अधिनियमान्वये व या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ करण्यात आलेल्या आहेत असे समजण्यात येईल आणि या अधिनियमान्वये नवीन नेमणुका करण्यात येईपर्यंत, असे परीक्षक आपले पद धारण करण्याचे व कृती करण्याचे चालू ठेवतील ;

(दहा) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या संबंधात जे उक्त अधिनियमान्वये विद्यापीठाचे मान्यताप्राप्त अध्यापक होते असे अध्यापक, या अधिनियमान्वये आणि अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, तत्सम विद्यापीठाचे मान्यताप्राप्त अध्यापक असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये नवीन मान्यता दिल्या जाईपर्यंत, ते असे मान्यताप्राप्त अध्यापक म्हणून असण्याचे चालू राहतील ;

(अकरा) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी ज्या नोंदणीकृत पदवीधरांची नावे विद्यमान विद्यापीठाने ठेवलेल्या पदवीधरांच्या नोंदवहीत नमूद करण्यात आली होती असे नोंदणीकृत पदवीधर हे, या अधिनियमान्वये व या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, तत्सम विद्यापीठाचे नोंदणकृत पदवीधर असल्याचे मानण्यात येईल व अशा प्रकारे ठेवण्यात आलेली नोंदवही व त्यात ज्यांची नावे नमूद करण्यात आली आहेत असे नोंदणीकृत पदवीधर, तत्सम विद्यापीठाद्वारे ठेवण्यात आलेली नोंदवही असण्याचे व त्यात नमूद केलेले नोंदणीकृत पदवीधर असण्याचे चालू राहतील ;

(बारा) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या संबंधात उक्त अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व परिनियम आणि आदेश, जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या परिनियमांद्वारे ते अधिक्रमित करण्यात अथवा त्यांच्यात फेरबदल करण्यात येईलपर्यंत, या अधिनियमान्वये तत्सम विद्यापीठाच्या यथास्थिति, अधिसभेकडून किंवा व्यवस्थापन परिषदेकडून त्या विद्यापीठाच्या संबंधात करण्यात आले असल्याचे समजण्यात येईल ;

(तेरा) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद किंवा विद्याशाखा किंवा अन्य प्राधिकरणे यांनी केलेले सर्व विनियम आणि नियम, जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि या अधिनियमांखालील विनियम किंवा नियम यांद्वारे ते अधिक्रमित करण्यात अथवा त्यांच्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, या अधिनियमान्वये तत्सम विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेकडून, विद्यापरिषदेकडून, विद्याशाखेकडून, किंवा यथास्थिति, अन्य प्राधिकरणाकडून करण्यात आल्याचे समजण्यात येईल ;

(चौदा) उक्त अधिनियमान्वये कोणतीही प्रमाण संहिता विहित करण्यात आली असल्यास, ती या अधिनियमान्वये विहित करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार (उक्त प्रमाण संहितेखाली येणाऱ्या विषयांच्या संबंधात करण्यात आलेल्या परिनियमांद्वारे, आदेशांद्वारे किंवा विनियमांद्वारे) ही प्रमाण संहिता अधिक्रमित करण्यात येईतोपर्यंत, ती अंमलात असण्याचे चालू राहील ;

(पंधरा) उक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकरणाकडून काढण्यात आलेल्या सर्व नोटिसा व आदेश, जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि या अधिनियमान्वये ते अधिक्रमित करण्यात अथवा त्यांच्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते तत्सम प्राधिकरणाकडून काढण्यात आल्याचे समजण्यात येईल ;

(सोळा) विद्यमान विद्यापीठ अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये घटित करण्यात आलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अस्तित्वात असलेले महाविद्यालय न्यायाधिकरण हे, राज्य शासनाकडून अशा विद्यापीठासाठी या अधिनियमान्वये विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण घटित करण्यात येईतोपर्यंत असे महाविद्यालय न्यायाधिकरण म्हणून काम करण्याचे चालू ठेवील आणि अशा विद्यापीठासाठी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण घटित करण्यात आल्याच्या दिनांकास अशा महाविद्यालय न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असलेले सर्व वाद किंवा बाबी किंवा अपिले, अशा विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित होतील आणि असे विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण त्यांच्या संबंधात कार्यवाही करून ती निकालात काढील :

परंतु, या कलमाद्वारे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये करण्यात आलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले कोणतेही परिनियम, आदेश, विनियम, नियम व काढण्यात आलेल्या कोणत्याही नोटिसा अथाव आदेश हे या अधिनियमान्वये असे परिनियम, आदेश, विनियम, नियम करण्याचा अथवा नोटिस अथवा आदेश काढण्याचा अधिकार, वेगळे प्राधिकरण अथवा मंडळ किंवा अधिकारी यांच्याकडे विहित आहे या, अथवा त्याचा विषय हा, या अधिनियमान्वये करावयाच्या दुय्यम विधिविधानाच्या अथवा लेखाच्या केवळ वेगळ्या स्वरूपात अनुज्ञेय आहे केवळ या कारणावरून, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत आहे असे समजण्यात येणार नाही.

[1][2][**११५क.** या अधिनियमात किंवा त्याखाली तयार केलेल्या परिनियमांत किंवा नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र यांमधील पदवी पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्षाकरिता प्रवेश देण्याच्या प्रयोजनांसाठी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ यांचे क्षेत्र हे, २००२-२००३ शैक्षणिक वर्ष धरून, दोन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता, एकच विद्यापीठ क्षेत्र म्हणून समजण्यात येईल.] ]. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ क्षेत्रांमध्ये अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र या पाठ्यक्रमात प्रथम वर्षाकरिता प्रवेश देण्यासाठी तात्पुरती तरतूद.

**११६.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यात कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, परिस्थितीची गरज असेल त्याप्रमाणे, परंतु या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, परंतु या अधिनियमाची उद्दिष्टे व प्रयोजने यांच्याशी विसंगत नसेल अशी, कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल. अडचणी दूर करणे.

**अनुसूची**

[कलमे ३(१) व ६(१) पहा]

**भाग एक**

| | विद्यमान विद्यापीठाचे नाव (१) | या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या तत्सम विद्यापीठाचे नाव (२) | विद्यापीठ क्षेत्र (३) |
|---|---|---|---|
| १. | [3][मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९७४ (सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२) अन्वये घटित करण्यात आलेले मुंबई विद्यापीठ.] | [4][मुंबई विद्यापीठ] | जिल्हे—<br>(१) [5][मुंबई शहर]<br>(२) [6][मुंबई उपनगर]<br>(३) रायगड<br>(४) ठाणे<br>(५) रत्नागिरी<br>(६) सिंधुदुर्ग. |
| २. | पुणे विद्यापीठ अधिनियम, १९७४ (सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३) अन्वये घटित करण्यात आलेले पुणे विद्यापीठ. | पुणे विद्यापीठ | जिल्हे—<br>(१) पुणे<br>(२) अहमदनगर<br>(३) नाशिक. |

[1] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम २ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.
[2] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.
[3] जी.एन.एच. व टी.ई. व इ. क्र. यूआरटी १४९४/(१४९)/९४/युएनआय-३, दिनांक ७ सप्टेंबर १९९४ द्वारे हे दाखल करण्यात आले.
[4] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या अनुसूची, नोंद ५ द्वारे “बॉम्बे विद्यापीठ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[5] वरील अधिनियमाच्या अनुसूची, नोंद ५ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
[6] वरील अधिनियमाच्या अनुसूची, नोंद ५ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

**अनुसूची**

| | विद्यमान विद्यापीठाचे नाव<br>(१) | या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या तत्सम विद्यापीठाचे नाव<br>(२) | विद्यापीठ क्षेत्र<br>(३) |
|---|---|---|---|
| ३. | शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ (सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) अन्वये घटित करण्यात आलेले शिवाजी विद्यापीठ. | शिवाजी विद्यापीठ | जिल्हे—<br>(१) कोल्हापूर<br>(२) सांगली<br>(३) सातारा<br>(४) सोलापूर |
| ४. | मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९७४ (सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०) अन्वये घटित करण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. | [१][जिल्हे—<br>(१) औरंगाबाद<br>(२) जालना<br>(३) बीड<br>(४) उस्मानाबाद] |
| ५. | नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९७४ (सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६) अन्वये घटित करण्यात आलेले [२][राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.] | [२][राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.] | जिल्हे—<br>(१) नागपूर<br>(२) भंडारा<br>(३) चंद्रपूर<br>(४) गडचिरोली<br>(५) वर्धा |
| ६. | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९७४ (सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७) अन्वये घटित करण्यात आलेले श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ. | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ. | महाराष्ट्र राज्य. |
| ७. | अमरावती विद्यापीठ अधिनियम, १९८३ (सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) अन्वये घटित करण्यात आलेले [३][संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ.] | [३][संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ.] | जिल्हे—<br>(१) अमरावती<br>(२) अकोला<br>(३) बुलढाणा<br>(४) यवतमाळ<br>[१][(५) वाशिम] |

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ६१(अ) (एक) द्वारे ही उपनोंद दाखल करण्यात आली.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम २(क) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(ख) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

**अनुसूची**

| | विद्यमान विद्यापीठाचे नाव | या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या तत्सम विद्यापीठाचे नाव | विद्यापीठ क्षेत्र |
|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) |
| ८. | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ (सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९) अन्वये घटित करण्यात आलेले उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ. | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ. | जिल्हे— (१) जालना (२) धुळे [१][(३) नंदूरबार] |

**भाग दोन**

[कलम ३(२) पहा]

| नवीन विद्यापीठाचे नाव | विद्यापीठ क्षेत्र |
|---|---|
| (१) | (२) |
| [२][१ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ | जिल्हे— (१) नांदेड (२) परभणी (३) लातूर] [३][(४) हिंगोली] |

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ६१(अ) (दोन) द्वारे ही उपनोंद दाखल करण्यात आला.

[२] जी.एन.एच. आणि टी.ई. आणि इ.क्र. यूआरटी १४९४/(१४९)/९४/यूएनआय-३, दिनांक ७ सप्टेंबर १९९४ अन्वये ही नोंद, समाविष्ट करण्यात आली.

[३] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ६१(ब) द्वारे ही उप-नोंद दाखल करण्यात आली.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : २३६३ २६ ९३    २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८    २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : ६१ २५ ८०८, ६१ २८ ९२०

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : ५२ २६ १५ सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१.
  दूरध्वनी : ३३ १४ ६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : ६५ ०३ ९५ व ६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**